
वृषाली जोशी

# विश्वकथा१



# विश्वकथा १

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

# विश्वकथा १

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

विश्वकथा १

लेखक : विविध आंतरराष्ट्रीय

अनुवादिका : वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २५ सप्टेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अनुवादिकेची ओळख



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून व सात पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग

कॉलेजमध्ये प्राचार्यपद

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके


सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा,


कविता करण्याचा

व शब्दकोडी बनवण्याचा छंद

संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९

चलभाष ९९२१७४६२४५









http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dorian_gray_oscar_wilde_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saki_vrishali_joshi.pdf


वृषाली जोशी यांची ई साहित्यने प्रकाशित केलेली आजवरची पुस्तके.





http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shakespere_stories_vrishali_joshi.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mejavaanipurvi_and_other_stories_somerset_maughm_vrishali_joshi.pdf




http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_1a_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_2_vrishali_joshi.pdf




http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_h_3_vrishali_joshi.pdf

# प्रस्तावना

जगातील गाजलेल्या काही कथांचा या पुस्तकात अनुवाद केला आहे. अँटनी चेखॉव्ह, मॅक्झीम गॉर्की व अलेक्झांडर पुष्किन या तीन रशियन लेखकांच्या कथा यात आहेत. चुंबन या कथेतून चेखॉव्ह एका लाजऱ्या बुजऱ्या तरुणाच्या जीवनातील अनपेक्षित प्रसंगाने उठलेली मानसिक आंदोलने चित्रित करतो. पुष्किनने त्याच्या पिस्तुलाचा नेम या कथेतून मिलिट्री जीवनाचा खाक्या रंगवला आहे. तर रशियातील कामगारांची होणारी पिळवणूक आपल्याला गॉर्कीच्या सव्वीस माणसे व एक मुलगी या कथेतून वाचायला मिळते. अर्नेस्ट हेमिंग्वे व ओ हेन्री या दोन अमेरिकन लेखकांच्या कथा यात आहेत. ओ हेन्रीने त्याच्या अशीही शाळामधून प्रेमाचा त्रिकोण मांडला आहे. तर हेमिंग्वेने दुसऱ्या देशात या कथेत जायबंदी मिलिट्री ऑफिसर्सबद्दल लिहिले आहे मेर व साकी या दोन इंग्लिश लेखकांच्या कथाही यात आहेत. कर्तव्यदक्ष गृहीणीसारखा प्रेमळ व कुटुंबवत्सल मिस्टर ग्रिप्प याची भेट मेर आपल्याला त्याच्या डुलकी या कथेतून घडवतो. तर साकीची मावळतीची वेळ ही कथा त्याच्या खास शेवटाला कलाटणी देण्याच्या शैलीने लिहिलेली आहे. एकूण काय तर माणसे जगातील कुठल्याही भागात रहात असली तरी त्यांची विचारप्रणाली व भावभावना यात फार फरक नसतो.

# अनुक्रम


सव्वीस माणसे व एक मुलगी - मॅक्झीम गॉर्की

पिस्तुलाचा नेम - अलेक्झांडर पुष्किन

दुसऱ्या देशात - अर्नेस्ट हेमिंग्वे

मावळतीची वेळ - साकी

डुलकी - वॉल्टर डी ल मेर

चुंबन - अॅन्टनी चेखॉव्ह

अशीही शाळा - ओ हेन्री

# Twenty Six Men and a Girl

## By

## Maxim Gorky

### सव्वीस माणसे व एक मुलगी



आम्ही सव्वीसजण होतो. सकाळपासून रात्रीपर्यंत, दमट तळघरात, आम्ही पिठाचा गोळा तयार करत असू व त्याची कुरकुरीत गोड बिस्किटे बनवत असू. आमच्या तळघराच्या खिडक्या, म्हणजे खणलेले खड्डे होते. त्याना ओलसर शेवाळयाने भरलेल्या विटा, बसवलेल्या होत्या. त्या खिडक्याना बाहेरून, लोखंडी चौकट बसवलेली होती. त्यातून आमच्यापर्यंत, सूर्यप्रकाश येणे शक्य नव्हते. कारण त्याच्या काचा, पीठाने माखलेल्या असत. आमच्या मालकाने, खिडक्याना बाहेरून लोखंडी

चौकट बसवण्याचे कारण असे होते, की आम्हाला बाहेरच्या कोणाला, भिकाऱ्याना किंवा आमच्या काम नसलेल्या भुकेल्या मित्रांना, घासभर अन्न देता येऊ नये. मग ते उपाशी राहिले तरी चालेल. आमचा मालक आम्हाला, ठग म्हणे व जेवणात, चांगल्या मासाऐवजी आम्हाला घाणेरडे, वास येणारे व कुजलेले, कच्चे मास देत असे.

काजळी व कोळीष्टके लागलेले, अंगावर येऊ पाहणारे छत व त्याखाली दगडी तळघरात राहणे, हे आयुष्य ठप्प करणारे व त्रासदायक होते. त्या जाड भिंतींवरील चिखलाचे डाग व आमच्या कामासाठी लागणारे अडकवलेले साचे – हे बघत आमचे आयुष्य चालले होते. सकाळी पुरेशी झोप न होता आलेले, मंद व बेदरकार असे आम्ही, पाच वाजता उठत असू. आम्ही झोपलेले असताना आमच्या काही सहकाऱ्यांनी, पिठाचा लगदा, तयार केलेला असे. सकाळी सहापासून आम्ही बाकावर बसून, त्याची बिस्किटे तयार करायला लागत असू. सकाळपासून रात्रीचे दहा वाजेपर्यंत, आमच्यापैकी काहीजण बाकावर बसून, हातांनी तो ताणला जाणारा, लगदा मळत असू. मध्येमध्ये आम्ही शरीर आखडू नये म्हणून, उठून थोडी हालचाल करत असू. त्याच वेळी काहीजण, पिठात पाणी घालून लगदा तयार करायचे काम करत. दिवसभर, मोठ्या कष्टाने, बॉयलरमधले पाणी, रटरट आवाज करत उकळत असे. शेगडीतले कोळसे हळूवारपणे, पण रागारागाने वरखाली केले जात. तापलेल्या विटांवरील घसरणाऱ्या लगद्याचे ढीग, लक्ष देऊन भाजले जात. सकाळपासून रात्रीपर्यंत, शेगडीतील लाकडे धगधगत असत. त्यांच्या जांभळट लालसर ज्वाळा तिथे नाचून, जणू आम्हाला, चिडवून दाखवत असत. शेगडी म्हणजे जणू परीकथेतील एखाद्या राक्षसाचे, भीषण डोके वाटे. त्याच्या आ वासलेल्या तोंडातून धगधगत्या ज्वाळा निघत असून, तो त्याचे उष्ण फूत्कार, जणू आमच्यावर सोडत असल्यासारखे वाटे. त्याच्या तोंडाच्या वर असलेल्या दोन काळया खड्ड्यांच्या भोकांनी, ( तथाकथित झरोक्यांनी ) तो आमचे अथक श्रम बघत असे. ते डोळ्यांसारखे असलेले निर्दय, भावनारहित खड्डे! ते नेहमीच आमच्याकडे मलूल डोळ्यांनी बघत असत, जसे काही ते आम्हाला माणसे न समजता, उच्च ज्ञानापासून वंचित असणारे गुलाम समजून, आम्हाला तुच्छ लेखत आहेत.

दिवसामागून दिवस, पिठाच्या खकाण्यात, उबग आणणाऱ्या धुळीत, गच्च कुबट वातावरणात, आम्ही लगदा मळून, त्याची बिस्किटे बनवत असू. ती आमच्या घामाने भिजत. आम्हाला आमच्या कामाची, भयंकर चीड येत असे. आम्ही तयार केलेली बिस्किटे, आम्ही कधीच खात नसू. त्यापेक्षा काळा पाव खाणे, आम्ही पसंत करत असू. लांब बाकावर एकमेकांसमोर बसून, नऊ इकडे व नऊ तिकडे असे आम्ही, आमचे हात व बोटे यंत्रासारखी फिरवत असू. तासनतास ते करायला आम्ही इतके सरावलो होतो, की आम्ही काय हालचाल करत आहोत, ह्याची आमची जाणीवच गोठून गेली होती. आम्ही एकमेकाना इतके ओळखू लागलो होतो, की दुसऱ्याच्या चेहऱ्यावरील सुरकुतीही, आम्ही समजून घेत असू. आमच्याजवळ बोलण्यासारखे काहीही नसे. आम्हाला त्याची सवय झाली होती. -- जेव्हा आम्ही  खेकसून ओरडत नसू तेव्हा. -- तेव्हा आम्ही कायमची शांतता पाळत असू. मालकाला आमच्या काही चुका सापडत -- पण अर्धमृत माणसाच्या हातून चुका तरी काय होणार? तो एक पुतळा झाला असेल तर? रोजच्या अति काबाडकष्टांनी त्याच्या संवेदनाच, गोठून गेल्या असतील तर? ज्यांचे खूप काही बोलून झाले आहे, त्यांच्यासाठी शांतता, ही भयंकर गंभीर गोष्ट आहे. पण ज्याना बोलण्यासारखेच काही नाही, ज्यांनी अजून बोलायला सुरवातच केलेली नाही, त्यांच्यासाठी शांतता हा साधा सोपा व्यवहार आहे.

कधीतरी आम्ही गात असू आणि त्याची सुरवात अशी होईः अचानक कामाच्या मध्ये, एकजण म्हाताऱ्या घोड्यासारखा, जड सुस्कारा टाके. तो खालच्या पट्टीत, ते लांबलचक गाणे म्हणायला सुरवात करे. गाणाऱ्याच्या जड हृदयाचे ओझे हलके करणारे असे ते, कडू गोड गाणे असे. तो एकटा गात असे व आम्ही बाकीचे शांतपणे त्याचे एकाकी गाणे, ऐकत असू. गवताळ प्रदेशातील फांद्या पेटवून केलेली लहानशी शेकोटी, जशी हिवाळ्यातील दमट रात्री, ओथंबलेल्या जड करड्या ढगांनी विझते, तसे त्याचे गाणे, त्या तळघराच्या छताखाली हळूहळू संपे. नंतर त्या गायकाबरोबर अजून एकजण गाऊ लागे. आता दोन मृदु आवाजातील करूण रस, त्या दुष्ट, पापी, अरुंद खोलीत, भरून राहत असे. आणि अचानक, अनेक आवाज ते गाणे एकत्रितपणे

गाऊ लागत. एखाद्या लाटेसारखा तो आवाज उसळे. अधिकाधिक मोठा होत, आमच्या दगडी तुरुंगाच्या जाड, दमट भिंती फोडून बाहेर पडे. --

आता आम्ही सव्वीसजण गात असताना, सरावाने हळूहळू आमचे सूर जुळले. आमच्या मोठ्या आवाजाने खोली भरून गेली. तिथे ते सूर गुदमरू लागले. दगडी भिंतीवर आपटले, किंकाळया मारू लागले. शोक करू लागले. अपार पीडा, चिडचिडेपणा, जुन्या जखमा व खोलवरच्या यातना प्रगट करू लागले. आमचे हृदय मोकळे होऊ लागले – गायकाचे जड, दबलेले उसासे -- एकजण मध्येच गाणे म्हणायचे थांबला व सहकाऱ्यांचे आवाज ऐकू लागला. आणि पुन्हा एकवार सर्वांच्यात आवाज मिसळून गाऊ लागला. दुसरा ‘आहा’ अशी करूण किंकाळी मारून, डोळे मिटून गाऊ लागला. तो चालत असलेल्या, लांबवरच्या सूर्य प्रकाशात न्हाणाऱ्या रस्त्यासारखा, त्याला बहुतेक, आमच्या आवाजाचा महापूर भासला असावा.

शेगडीची ज्योत फडफडते. भट्टीच्या विटांवर कोळसे वरखाली करणाऱ्याचा झारा, आपटला जातो. बॉयलर मधले पाणी गुणगुणते. शांत हसू हसत, आगीचा झगझगीत उजेड भिंतीवर पडतो. -- आणि गाण्यातील उसन्या शब्दात, आम्ही आमची उदास दुःखे व सूर्यप्रकाशापासून वंचित झालेली जगण्याची रडगाणी, आगीला अर्पण करतो. अशा त्या दगडी घरात आम्ही सव्वीसजण जगतो. आयुष्याच्या ओझ्याने आम्ही इतके वाकलेले असतो, की या दगडी इमारतीचे तिन्ही मजले आमच्या खांद्यावर जणू आम्ही वाहतो आहोत असे आम्हाला वाटते --

पण तरी गाण्यांशिवाय अजून काहीतरी, सूर्यप्रकाशाची उणीव भरून काढणारे असे छान, आमच्या आयुष्यात होते. या घराच्या दुसऱ्या मजल्यावर, एक सोनेरी कडांचे दुकान होते. तिथे काम करणाऱ्या अनेक मुलींबरोबर, तान्या नावाची एक सोळा वर्षांची नोकरदार मुलगी रहायची. रोज सकाळी, गुलाबासारखा टवटवीत चेहरा व हसरे निळे डोळे असलेली तान्या, पॅसेजपासून कामाच्या खोलीपर्यंत जाणाऱ्या दारामागून, अवतीर्ण होई. “छोट्या कैद्यानो, मला थोडी बिस्किटे द्या.” असा मंजुळ, किणकिणता आवाज, आमच्या कानावर येई. हा ओळखीचा आवाज

ऐकून, आम्ही सर्वजण वळून बघत असू. आणि सहज चांगलेपणे, आनंदाने, त्या निरागस मुलीचा हसरा चेहरा बघत असू. तिच्या नाकावरील काचेवर दाबला गेलेला, ओळखीचा चष्मा बघून आम्ही आनंदित होत असू. तिच्या गुलाबी ओठांमधून चमकणारे तिचे पांढरे शुभ्र दात, हसताना सुंदर दिसत. एकमेकाना ढकलत, आम्ही दार उघडायला धावत असू. मग ती आत येई -- ॲप्रन घातलेली -- इतकी आनंदी आणि सुंदर! ती हसत हसत मान थोडी कलती ठेऊन, आमच्यासमोर उभी राही. तिच्या काळया केसांची एक जाड बट खांद्यावरून छातीवर रुळत राही. आणि आम्ही घाणेरडे, काळे, वेडेवाकडे गुलाम – माना मागे टाकून, वर तिच्याकडे बघत, (कारण, दार चार पायऱ्या खोल होते.) तिला शुभ सकाळ, म्हणत असू. हे आमच्या सवयीचे नसलेले शब्द ,फक्त तिच्यासाठी राखून ठेवलेले असत. तिच्याशी बोलताना आमचे शब्द मृदु बनत. आमचे आपापसातील विनोद थांबत. ती आमच्याबरोबर असताना, सर्व कसे आम्हाला उत्कृष्ट ठेवावे लागे. सर्वात जास्त  खरपूस भाजली गेलेली व कुरकुरीत बिस्किटे हळूवारपणे, तिच्या ॲप्रनमध्ये टाकली जात.

आम्ही नेहमी तिला दटावत असू, “मालकासमोर, जाऊ नकोस.” यावर ती एक लबाड हसू फेके व “अच्छा, कैद्यानो.” असे आनंदाने म्हणत एखाद्या उंदरासारखी गुप्त होई.

आणि एवढेच -- ती जाऊन बराच वेळ झाला, की आम्ही तिच्याबद्दल आनंदाने आपापसात बोलत असू. कालपरवा बोललेल्या गोष्टी, आम्ही परत बोलत असू. ती, आम्ही व सर्व परिसर कालपरवासारखाच असे -- एखाद्या माणसाने त्याच त्याच परिसरात, जराही बदल न होता काम करत राहणे, हे फार उदास करणारे व त्रासदायक असते. त्याच्या आत्म्याच्या विनाशात, याचा शेवट झाला नाही, तर मग त्याच्या भोवतालचा तोचतोचपणा, वाढत जातो. तो जितका जास्त जगतो, तितका तो असहनीय होत जातो. आम्ही बायकांबद्दल नेहमी इतके गचाळ व उबग येईल असे बोलत असू, की आमच्या निर्लज्ज व टोकेरी शब्दांची आम्हालाच लाज वाटे. पण याचे काही आश्चर्य नव्हते. कारण आम्हाला माहिती असलेल्या बायका, त्यांच्याबद्दल नम्र

शब्द बोलायच्च्या लायकीच्च्या नव्हत्या. पण तान्याच्च्या बाबतीत, आम्ही कधीही, असे बोलत नसू. तिने कधीही आमचे मोठे मोठे विनोद, ऐकले नाहीत. आमच्च्यापैकी कुणी तिच्च्याकडे बोट दाखवायला, धजत नसे. याचे कारण बहुधा असे असावे, की ती आमच्याबरोबर, जास्त वेळ रहात नसे -- स्वर्गातून एखादी चांदणी पडावी, तशी ती आमच्यासमोर क्षणभर चमकून, गुप्त होई. कदाचित ती फार छोटीशी व सुंदर होती, म्हणूनही असेल. आणि लोक अडाणी व गचाळ असले तरीही, सौदर्याला नेहमीच मान दिला जातो. शिवाय, रटाळ काम करून आम्ही, मूर्ख बैलाच्च्या स्थितीला पोचेलेलो असलो तरी, त्याच वेळी आम्ही सर्व माणसांसारखी, माणसेच होतो. आणि कसली तरी पूजाभक्ती केल्याशिवाय जगू शकत नव्हतो. त्या अंधाऱ्या, कुबट खोलीत आम्ही रहात होतो व त्या इमारतीत डझनावारी लोक होते तरी, आमच्याकडे तिच्याशिवाय कोणीच -- लक्ष देत नसे. त्यामुळे तिच्याहून चांगले, आमच्यासाठी कुणीच नव्हते. थोडक्यात, ती, आमच्यासाठी महत्वाची गोष्ट होती -- आम्ही तिला, आमची समजत असू. अशी कुणी, की जिचे आस्तित्व आमच्या बिस्किटांवर अवलंबून होते. तिला ताजी बिस्किटे देणे, हे आम्ही आमचे कर्तव्य समजत असू. हा आमचा त्या आदर्श प्रतिमेसाठीचा, पवित्र उपचार होऊन बसला. दर दिवशी आमची व तिची जवळीक वाढत गेली. बिस्कीटांशिवाय, आम्ही तान्याला खूप उपदेशाचे डोस पाजत असू. जसे की, जास्त गरम कपडे घाल. जिन्यातून वरखाली सारखी धावाधाव करू नकोस. लाकडाचे जड भारे उचलू नकोस. ती हसून आमचा उपदेश ऐके. मोठ्याने हसून उत्तर देई, पण कधीच तो पाळत नसे. पण त्यामुळे आम्ही, नाराज होत नसू – आमची एवढीच इच्छा असे, की आम्ही तिची किती काळजी करतो, हे तिला समजावे. वेगवेगळया मागण्यांसाठी ती वारंवार, आमच्याकडे येत असे. उदा. बर्फाच्या घराचे जड दार उघडून देण्यासाठी, किंवा एखादे लाकूड तोडून देण्यासाठी -- त्यात आम्हाला आनंद वाटे व थोडा गर्वदेखील. आम्ही ते किंवा कुठलेही दुसरे काम तिला करून देत असू. पण एकदा आमच्यातल्या एकाने, तिला त्याचा शर्ट दुरुस्त करायला सांगितला, तेव्हा ती रुबाबाने नकार देत शिंकली व बोलली, ‘अजून काय? अजून काय काय कल्पना आहेत?”

आम्ही त्या गरीब बिचाऱ्याला बरेच चिडवले. आणि त्यानंतर आम्ही तिला आमच्यासाठी, कधीही काही करायला सांगितले नाही. आम्ही तिच्यावर प्रेम करत होतो -- या एका शब्दात, सर्व काही आले. माणसाला नेहमी कुणावर तरी भरभरून, प्रेम करायला आवडते. मग त्या व्यक्तीचे नुकसान होवो, ती व्यक्ती गाळात जावो, किंवा त्याच्या जवळच्या व्यक्तीला ते, विषाप्रमाणे भासो. कारण त्याचे प्रेम असलेल्या व्यक्तीला, तो कदाचित मानही देत नसतो. आम्हाला दुसरे कुणीच नसल्याने आम्ही तान्यावरच प्रेम करत असू.

कुठल्यातरी कारणाने, आमच्यापैकी कुणी ना कुणी अचानक विचार करू लागे. "आपण या मुलीला, इतका मान का देतो? तिच्यात एवढे काय आहे? तिच्यासाठी आपण एवढे का, उद्दीपित होतो?"

असे म्हणण्याचे धाडस करणाऱ्यावर, आम्ही चवताळून धाऊन जात असू -- आम्हाला प्रेम करायला कुणीतरी हवे असे. ते आम्हाला गवसले होते. आणि म्हणून आम्ही, तिच्यावर प्रेम करत असू. आम्ही सव्वीसजण तिच्यावर निष्ठापूर्वक, न ढळणारे असे, प्रेम करत असू. ती आमच्यासाठी एक पवित्र गोष्ट होती आणि त्याविरुद्ध जो आवाज उठवेल, तो आमचा शत्रू होता. तिच्यावर प्रेम करणे, कदाचित आमचा शहाणपणा नसेलही पण आम्हा सव्वीसजणांना जे प्यारे होते, ते त्यातील प्रत्येकाला पवित्र वाटले पाहिजे, असा आमचा आग्रह होता.

आमचे प्रेम, आमच्या द्वेषापेक्षा जास्त वजनदार नव्हते -- आणि असेही असेल, की काही शिष्ट लोक असे समजत, की आमचा द्वेष प्रेमापेक्षा जास्त पसरणारा आहे -- पण जर असे असेल, तर ते प्रेम, आमच्यापासून दूर निघून का जात नव्हते?

या बिस्कीटांच्या कारखान्याव्यतिरिक्त, आमच्या मालकाची बेकरीदेखील होती. ती तिथेच, भिंतीपलीकडे होती. पण तिथे काम करणारे चौघे, आमच्याशी फटकून असत. त्यांचे काम व ते स्वतःही आमच्यापेक्षा स्वच्छ असत. ते आमच्या तळघरात, कधीच येत नसत. जेव्हा ते व आम्ही कधी समोरासमोर येत असू तेव्हा, ते कुत्सितपणे हसत. आम्ही पण कधी, बेकरीत जात नसू. कारण आम्ही त्यांचा छान

पाव चोरू या भीतीने, असे करायला आमच्या मालकाने त्याना बंदी केली होती. आम्हाला ते चौघे आवडत नसत. आम्ही त्यांचा द्वेष करत असू. त्यांचे काम आमच्यापेक्षा कमी कष्टाचे होते. त्याना पैसे व खाणेही जास्त चांगले मिळे. त्यांची कामाची जागाही हवेशीर व उजेडाची होती. ते स्वच्छ व आरोग्यसंपन्न होते -- असा त्यांच्यात व आमच्यात खूप फरक होता. आम्ही पिवळसर करडे, दिसत असू. आमच्यापैकी तिघाना सिफिलीस होता. आणि बऱ्याच जणांना खरुज होती. आणि एकजण संधीवाताने बेजार होता. सुट्ट्यांमध्ये व फुरसतीच्या वेळात ते, जाकीट व करकर आवाज करणारे बूट घालत. त्यांच्यापैकी काहीजण हार्मोनिका नावाचे वाद्य वाजवत. ते कवायत करत बागेत जात. तर आम्ही मळकट चिंध्या, पांघरत असू व लाकडी तळव्याचे किंवा झाडांच्या सालीपासून बनवलेले बूट, घालत असू. बागेत जायला आम्हाला, पोलिसांचा विरोध होता -- त्यामुळे आम्हाला ते लोक, आवडायची शक्यता कमी होती.

एक दिवस आम्ही असे ऐकले, की त्याच्या प्रमुखाला दारूचे व्यसन लागले आहे आणि त्याला मालकाने, काढून टाकले असून त्याच्या जागी, दुसऱ्या एकाला घेतले आहे. तो सैनिक होता. तो हातात, सोन्याची साखळी असलेले घड्याळ व सॅटीनचा कोट घालतो, असे आम्ही ऐकले. इतका नखरेल माणूस कोण आहे, हे बघायला आम्ही अधीर झालो व एकामागून एक सतत, अंगणात धाऊ लागलो. पण तो आपण होऊन, आमच्या तळघरातील खोलीचे दार लाथेने ढकलून, ते तसेच उघडे टाकत, उंबरठ्यावर अवतीर्ण झाला व हसत हसत आम्हाला म्हणाला, “देव आपल्याला मदत करो. मित्रानो तुम्ही कसे आहात?” धुराच्या ढगांसारखी थंड हवा आत घुसली व त्याच्या पायाभोवती, गोल फिरू लागली. तो तिथे उभे राहून आमच्याकडे, खाली बघत होता. त्याच्या नीटनेटक्या, छानशा ठेवलेल्या मिशांमागे, त्याचे मोठे पिवळे दात, चकाकत होते. त्याचा कोट खरच वेगळाच होता – निळा आणि त्यावर फुले असलेला व चकाकीने झळकत होता. बटने बहुधा लाल दगडाची किंवा कसलीतरी बनवलेली होती. घड्याळाच्या बाबतीत ऐकलेले खरे होते. --

हा सैनिक देखणा होता. उंच व दणकट दिसणारा, लाल गाल असलेला आणि त्याच्या मोठ्या, तेजस्वी डोळयात सरळ, मित्रत्वाचे भाव असलेला, असा होता. त्याच्या  डोक्यावर, कडक इस्त्रीची पांढरी टोपी होती. पायात चकचकीत पॉलिश केलेले फॅशनेबल बूट, व्यवस्थित स्वच्छ ॲप्रन मधून डोकावत होते.

आमच्या फोरमनने त्याला नम्रपणे, दार लावायला सांगितले. त्याने घाई न करता, तसे केले. आणि मग आमच्या मालकाबद्दल, प्रश्न विचारायला सुरवात केली. आम्ही सगळे एकाच वेळी, सांगू लागलो की तो खलनायक, फसव्या, छळणारा व लबाड व चोर माणूस आहे. त्याच्याबद्दल जेवढे वाईट सांगणे शक्य आहे, पण इथे लिहिणे शक्य नाही, तेवढे सर्व सांगायची, आम्हाला घाई झाली होती. सैनिकाने ऐकले, मिशीला पिळ दिला. आमच्याकडे तेजस्वीपणे व मित्रत्वाने शोधक नजर टाकली,

त्याने अचानक ताशेरा झाडला, “तसेही, तुमच्यासाठी इथे भरपूर मुली आहेत.”

आमच्यापैकी काहीजण वेगवेगळया प्रकारे, गालातल्या गालात हसले. काहीजण जोराने हसले व काहीजणांनी सैनिकाला हे स्पष्ट केले की, आमच्या येथे नऊ मुली आहेत.

डोळे मिचकावत, सैनिकाने विचारले, “मग तुम्ही त्यांचा, पुरेपूर उपयोग करून घेत असाल?”

पुन्हा आम्ही चोरट्यासारखे हसलो, जोरात नव्हे -- आमच्यापैकी बऱ्याचजणांना, आपणही त्याच्यापेक्षा काही कमी नाही, असे दाखवायची इच्छा होत होती, पण तेवढे धैर्य त्यांच्यात नव्हते. एकजणाने हळू आवाजात शेरा मारला, ”आम्ही असे कसे काय -- “

सैनिकाने आम्हाला जवळून बघून, खात्रीपूर्वक म्हटले, “हो. आणि तसेही तुमच्यासाठी, ते जरा जास्तच होते. तुम्ही त्यातले, दिसत नाही. खरे तर तुमच्याबद्दल -- तसे वाटत नाही -- हावभाव -- स्टाईल -- आणि बायका पुरुषांच्या रुबाबावर प्रेम

करतात. व्यवस्थित व नीटनेटके पुरुष त्याना आवडतात, जसे त्यांनी असायला पाहिजे तसे. अजून काय तर शक्ती. त्याना वज्रमूठ हवी असते."

सैनिकाने त्याचा उजवा हात खिशातून बाहेर काढला व आम्हा सर्वांना दाखवला. त्याच्या शर्टाचे हात वर केलेले होते. त्याच्या दंडापासून कोपरापर्यंत, त्याच्या गोऱ्या, शक्तिशाली हातावरची सोनेरी लव, चकाकत होती. "पाय, छाती -- सर्व काही मजबूत पाहिजे. कपडे नीटनेटके पाहिजेत. मग तुमच्याबद्दलचे मत, चांगले होते. उदाहरणार्थ, माझ्याकडे पहा. सगळया बायका माझ्या प्रेमात पडतात. मला त्याना, आमंत्रण द्यावे लागत नाही की खाणाखुणा कराव्या लागत नाहीत -- एका वेळी पाचपाचजणी माझ्या गळयात पडतात."

तो एका पिठाच्या पोत्यावर बसला. बायका कशा त्याच्या प्रेमात पडतात व तो कसा त्यांच्या बाबतीत दिलदार असतो, हे विस्ताराने सांगणे, त्याने चालू ठेवले. नंतर तो गेला. त्याच्यामागे दाराचा करकर आवाज झाला आणि आम्ही सगळे खूप वेळ शांत होतो. त्याचा व त्याच्या गोष्टींचा, विचार करत होतो. मग सगळे एकदम बोलायला लागले. आणि हे सहज होते की तो सगळयाना आवडू लागला. तो इतका मोहक होता -- तो सरळ इथे आला. बसून आमच्याशी बोलला. सहसा, येथे कोणी येत नसे. कोणीच कधी आमच्याशी मित्रासारख्या, गप्पा मारल्या नव्हत्या. आम्ही त्याच्याबद्दल, त्याच्या उद्याच्या घवघवीत यशाबद्दल बोललो. एरवी आम्हाला अंगणात कुणी भेटले तरी, आमच्या बाजूने ओठ वाकडे करून, दुर्लक्ष करून निघून जात किंवा आम्ही जणू तिथे नाहीच आहोत, असे आमच्या आरपार बघत रहात. त्यांचे नखरेल कपडे बघून आम्हाला त्यांच्याबद्दल, कौतुकच वाटे. तथापि आम्ही मुलींबद्दल जे बोलत असू, ते त्या मुलीनी ऐकले असते, तर त्या लाजेने व संकोचाने वेड्या झाल्या असत्या.

अचानक फोरमन काळजीने बोलला, "पण त्याने, लहानशा तान्याला बिघडवायला नको." हे ऐकून सर्वजण मूकस्तंभासारखे, शांत झाले. कसे कोणास ठाऊक, पण आम्ही, तान्याबद्दल विसरलो होतो.

त्या देखण्या सशक्त सैनिकाला पाहून, आम्ही तान्याला विसरलो होतो. मग तिथे तावातावाने वादविवाद सुरु झाला. काहीजण म्हणाले तान्यांने अशा गोष्टीकडे लक्ष द्यायला नको. दुसरे कोणी म्हणाले, ती त्या सैनिकाला सहन करू शकणार नाही. तिसरे कोणी म्हणाले, त्याने जर तान्याला त्रास दिला, तर आम्ही त्याच्या बरगड्याच मोडू. आम्ही सर्वांनी तो व तान्या यांच्यावर लक्ष ठेवायचे ठरवले. आणि तान्याला त्याच्यापासून सावध रहाण्याची सूचना केली -- अशा तऱ्हेने वादविवाद संपला.

एक महिना गेला. बेकरीत सैनिकाचे काम चालू होते. तो डौलात इकडेतिकडे वावरत होता. आणि आम्हाला वेळोवेळी येऊन भेटत होता. मुलींच्याबाबत त्याने, काही बढाया मारल्या नाहीत. फक्त स्वतःच्या मिशा पिरगळल्या व मस्तीने ओठांवर जीभ फिरवली.

तान्या रोज सकाळी, आमच्याकडे बिस्कीटांसाठी येत होती. व आमच्याशी नेहमीप्रमाणे आनंदाने व हसून खेळून वागत होती. जेव्हा आम्ही तिच्याकडे, सैनिकाचा विषय काढला तेव्हा, ती त्याला 'बटबटीत डोळयांचे वासरू' म्हणाली व इतर काही विनोदी नावे ठेवली. त्यामुळे आम्ही, निर्धास्त झालो. त्या सैनिकाच्या भपक्याला, तान्याने सहजतेने तोंड दिल्याचे बघून, आम्हाला तान्याचा अभिमान वाटू लागला. तरीही तिचे त्याच्याबद्दलचे मत ऐकून आम्ही, जागे झालो आणि तिच्या वागण्यावरून धडा घेऊन, आम्ही देखील त्याला, तुच्छ समजू लागलो. ती आम्हाला, पूर्वीपेक्षाही आवडू लागली. सकाळी आम्ही तिचे, अजून जोरदार स्वागत करू लागलो.

एक दिवस सैनिक आमच्याकडे थोडा पिऊन आला, बसला व वेड्यासारखा हसू लागला. आम्ही विचारले तेव्हा त्याने, तो का हसतो आहे ते सांगितले.

"माझ्यासाठी दोन मुली भांडत होत्या -- लायडका आणि ग्रुशका -- त्या दोघी एकमेकीना अशा काही ओरबाडत होत्या! ओहो! एकीने दुसरीचे, केस ओढले. जमिनीवर तिला पाडून, तिच्या अंगावर बसली. हा! हा! हा! एकीने नखे काढून

दुसरीचा चेहरा बोचकारला -- खूप मजा आली. पण स्त्रिया, चांगली मारामारी का करू शकत नाहीत? त्या एकमेकीना फक्त ओरबाडतात का?"

तो तिथे बाकावर बसला. इतका सशक्त, ताजातवाना व आनंदी -- तिथे बसून तो हसत राहीला. आम्ही शांत होतो. काही कारणाने आम्हाला तो, यावेळेस हरकत घ्यावी असा वाटला.

"यात नाकारण्यासारखे काही नाही. मी बायकांच्या बाबतीत, भयंकर सुदैवी आहे. काय विनोद आहे! माझ्या एका इशाऱ्याने, त्या मला वश होतात."

त्याने त्याच्या चकाकणाऱ्या केसांनी भरलेले हात, वर केले. आणि मग फटकन आवाज करत, ते परत गुडघ्यांपर्यंत खाली आणले. त्याने आमच्याकडे आश्चर्याने व आनंदाने पाहीले, जसे काही तो बायकांच्या बाबतीत इतका सुदैवी का आहे, हे त्याचे त्यालाच कळत नव्हते. त्याचा गरगरीत लाल चेहरा, आनंदाने व स्वसंतोषाने फुलला. त्याने मस्तीने ओठांवर जीभ फिरवली.

ओव्हन ठेवलेल्या जमिनीवर फोरमनने त्याचे हत्यार, खुनशीपणे चालवले. तो अचानक चिडवल्यासारखे ओरडला, "छोटी फरची झाडे ओढायला फार शक्ती लागत नाही, पण तू एक पाईनचे झाड तोडून दाखव --"

"तुला काय म्हणायचे आहे? हे तू मला, म्हणतो आहेस का?"

"हो. तुलाच."

"म्हणजे काय?"

"काही नाही -- मी चुकून बोलून गेलो."

"नाही. एक मिनिट थांब. तू कशाबद्दल बोलतो आहेस? कुठले पाईनचे झाड?"

व्यग्रपणे त्याचे हत्यार ओव्हनमध्ये ढकलत, फोरमनने उत्तर दिले नाही. त्याने उकळलेली बिस्किटे ओव्हनमध्ये फेकली. आणि झालेली बाहेर काढून, आवाज करत जमिनीवर ओतली. झाडाच्या डहाळीच्या दोऱ्यात ती ओवणाऱ्या मुलांपुढे ती पडली.

असे वाटत होते, की तो सैनिकाबद्दल व त्याच्या चढेल बडबडीबद्दल, विसरला होता. परंतु अचानक, सैनिक अस्वस्थ झाला. हवेमध्ये मागेपुढे होणाऱ्या हत्याराच्या हँडलने छातीवर गुद्दा मारला जायच्या धोका असताना, तो उभा राहून ओव्हनकडे गेला.

“नाही. मला सांग. कोणाला तू पाईनचे झाड, म्हणत होतास? तू माझा, अपमान केला आहेस. माझा! कोणतीच बाई मला, विरोध करू शकत नाही. एकही नाही. तू मला असे अपमानकारक, कसे काय बोलू शकतोस?’

तो खरच गंभीरपणे, दुखावला गेलेला दिसत होता. बायकाना वश करण्याव्यतिरिक्त, त्याला मान द्यावा, असे खरे तर, त्याच्याकडे काही नव्हते. या खुबीशिवाय त्याच्याकडे, काहीच धडाडी नव्हती. आणि केवळ त्याच्या जोरावर सगळयांनी आपल्याला मान द्यावा, असे त्याला वाटत होते. जगात असे लोक आहेत की ज्यांच्यासाठी, आयुष्यातील सर्वात मूल्यवान गोष्ट, मनाच्या वा शरीराच्या आजाराच्या रुपात असते. आयुष्यभर तो आजार त्याना चिकटलेला असतो. आणि त्याचा त्रास सहन करतच, ते वाढत असतात. ते दुसऱ्यांकडे त्याबद्दल, बढाया मारतात. अशा तऱ्हेने लोकांचे लक्ष वेधून घेण्याचा, प्रयत्न करतात. लोकांची सहानुभूती मिळवतात. हा गुण (?) त्यांच्याकडून काढून घेतला, त्याना सुधारले, तर ते दुःखी होतात. कारण त्यांच्याकडे फक्त तेवढेच असते -- त्याशिवाय ते रिकामे असतात. कधीकधी मनुष्य आयुष्यात इतका गरीब बनतो, की तो त्याच्या नकळत त्याच्या दुर्गुणांना किंमती समजू लागतो. आणि तसाच जगत रहातो. अर्थातच तो, नैतिक घसरणीच्या वाटेला लागतो.

सैनिक दुखावला गेला होता. तो आमच्या फोरमनकडे धावत गेला व किंचाळला,

“नाही तू मला सांग -- ते काय आहे?’

“मी तुला सांगू?” फोरमनने, त्याच्याकडे वळून म्हटले,

“सांग.”

“तुला, तान्या माहिती आहे का?”

“हो.”

“हो, तर मग तिच्यासाठी, प्रयत्न कर.”

“मी?”

“हो. तू.”

“तिला? फुस्, त्यात काय मोठेसे?”

“आपण बघूच.”

“तू बघच. हा हा”

“तीच तुला इंगा दाखवेल.”

“मला एक महिना दे.”

“सैनिका, तुझे तुझ्याबद्दल काही मत आहे.”

“एक पंधरवडा! मी तुला ते करून दाखवतोच.”

“चल. चालता हो.’

आमचा फोरमन एकाएकी संतापला व रागाने त्याचे हत्यार चालवू लागला. सैनिक त्याच्यापासून आश्चर्याने दूर झाला. आमच्याकडे पाहिले. तो एक निःशब्द क्षण होता. नंतर शांत, धमकीवजा आवाजात म्हणाला, “बरय, तर मग.” आणि निघून गेला.

भांडण चालू होते, तेव्हा आम्ही सगळे, गप्प होतो. त्यात, गुंग झालो होतो. पण जेव्हा सैनिक बाहेर गेला, तेव्हा गोंधळाचे संभाषण, आमच्यात सुरु झाले. आमच्यापैकी एकजण फोरमनवर ओरडला, ‘पावेल, हे तू काहीतरी, नको ते केलेस.”

फोरमन रानटीपणे ओरडला, “चला. कामाला लागा.” आमच्या लक्षात आले, की आम्ही सैनिकाला डंख केलेला आहे व आता तान्याला धोक्याची धमकी मिळणार. हे समजताच, सर्वांना रागाच्या व आश्चर्याच्या एकाच भावनेने, घेरून टाकले. आता काय होईल? तान्या सैनिकाला विरोध करेल का? आणि जवळजवळ आमच्यापैकी सर्वजण विश्वासपूर्वक ओरडले, “छोटीशी तान्या? ती नक्कीच त्याला विरोध करेल. तुम्ही तिला लेचीपेची समजू नका.”

आमच्या चांगुलपणाची शक्ती किती होती, ते आजमावून बघायला आम्ही, भयंकर उत्सुक होतो. भावनिक जोमात, आम्ही एकमेकाना आश्वस्त केले की बळकट शुचित्व, तिला या प्रसंगातून तारून नेईल. शेवटी आम्ही अशी कल्पना करू लागलो, की त्या सैनिकाला फारसे चिथावले गेलेले नाही. त्यामुळे तो भांडण विसरून जाईल आणि आपण धीमेपणाने त्याचा अहंकार भडकवून दिला पाहिजे. त्या दिवसापासून, आम्ही पूर्वी कधीच जगलो नाही असे, विशेष प्रकारचे उदासीनतेचे आयुष्य एक प्रकारच्या ताणाखाली जगू लागलो. कैक दिवसांच्या शेवटी, आम्ही आपापसात भांडत असू. कसे माहिती नाही पण आमची बुद्धी, धारदार होऊ लागली. आमचे संभाषणकौशल्य सुधारून आम्ही, अधिक सराईततपणे बोलू लागलो. आमच्या लक्षात आले की आमचा त्या राक्षसाविरुद्ध खेळ चालू आहे आणि आमच्या बाजूचा बळकट गडी, तान्या आहे. त्याने आमच्या दुःखदायक साहसावर, आनंद पसरवला. आमची जीवनेच्छा इतकी जबरदस्त वाढली की आमच्या मालकाने आमच्या उद्दीपित अवस्थेचा फायदा घेऊन, आमच्या कामाचे ओझे, दिवसाला पाचशे पौंडाच्या लगद्याने वाढवले. आमच्या कामाने आम्ही पार थकून जात असू. दिवसभर आमच्या ओठी तान्याचे नाव असे. रोज सकाळी आम्ही विशेष अधीरतेने तिची वाट बघत असू. आम्ही अशी कल्पना करत असू, की आता ती जुनी तान्या राहीली नसून, दुसरी, नवीन तान्या बनून आली आहे.

तरीही आम्ही तिला झालेल्या भांडणाबद्दल, अवाक्षरदेखील सांगितले नाही. किंवा तिला काहीही विचारले नाही. आम्ही तिच्यासाठी पूर्वीसारखेच, दयाळू व

प्रेमळ होतो. तरीही आमचा तिच्याबद्दलचा दृष्टीकोन, थोडाफार नवीन होऊ लागला होता. काहीसा परग्रहीय! ही खोलवर उत्सुकता होती एखाद्या सुरीइतकी थंड व धारदार --

एका सकाळी फोरमनने त्याचे काम सुरु केल्यावर तो म्हणाला, “भावानो, आजचे काम सुरु करा.”

त्याने आठवण न करताही आम्हाला ते माहिती होते पण तरीही आम्ही काम सुरु केले.

“आपण तिच्याकडे काळजीपूर्वक लक्ष देऊया. ती एक मिनिटात इथे येईल.” फोरमनने सुचवले. त्यावर एकजण त्रासदायक आवाजात ओरडला, “आणि तू आम्हाला काय जाणवावे, अशी अपेक्षा करतो आहेस?” परत आमच्यात रानटीपणे, जोरात वादावादी सुरु झाली. आपल्यातील सर्व चांगले आपण ज्या ठिकाणी ओतत होतो ती, किती शुद्ध व प्रामाणिक आहे, हे आज आपल्याला समजेल. आजच्या सकाळी आपल्या सगळयाना, पहिल्यांदा, आपण बाळगत असलेली आपल्या देवतेची शुद्धतेबाबतची गोष्ट, खरी आहे की नाही, ते कळेल. ती आपल्या मनातून उतरायची शक्यता आहे. दिवसेंदिवस सैनिक हट्टीपणे व त्रासदायक पद्धतीने, तान्याचे मन जिंकायचा प्रयत्न करत होता. पण आपल्यापैकी कुणीच तिला विचारले कसे नाही की, तिचे याबाबतीतले मत काय आहे? ती दर दिवशी सकाळी नियमितपणे, बिस्कीटांसाठी येतच राहिली.

आणि आजच्या दिवशीही सकाळी, आम्ही तिचा आवाज ऐकला.

“छोट्या कैद्यानो, मी आले.” आम्ही तिच्या स्वागतासाठी धावलो. पण ती आत आली तेव्हा, नेहमीच्या रीतीविरुद्ध, आम्ही काहीच बोललो नाही. तिच्यावर डोळे रोखत, तिला काय बोलावे, ते आम्हाला कळेना. आम्ही तिच्यासमोर, शांतपणे, अस्वस्थतेने गर्दी करून उभे राहिलो. या अनोख्या स्वागताने, तिला नवल वाटले --

आणि अचानक आम्ही तिला मलूल होताना पाहिले. ती अस्वस्थ होऊन, रागावली. आणि कापऱ्या आवाजात तिने विचारले,

“तुम्ही -- असे का आहात?”

“आणि तू?” फोरमनने तिच्यावरील दृष्टी ढळू न देता, ठामपणे जोरात विचारले.

“मी -- काय?”

“अं -- काही नाही -- “

“ठीक आहे तर मग, मला बिस्किटे द्या -- “

यापूर्वी तिने आम्हाला, कधीच घाई केली नव्हती --

तिच्यावर दृष्टी रोखत, उद्दीपित न होता, फोरमन बोलला, “तुला भरपूर वेळ आहे.”

मग अचानक ती वळून दारातून बाहेर पडली. फोरमनने त्याचे हत्यार घेतले व ओव्हनकडे वळत शांतपणे बोलला,

“म्हणजे -- ती गोष्ट झाली -- पण सैनिक -- हलकट -- लबाड -- “

बकऱ्यांच्या कळपासारखे एकमेकाना ढकलत, आम्ही टेबलाशी जाऊन आपापल्या जागा घेतल्या व शांतपणे, शिथिलतेने कामाला लागलो. लगेच आमच्यातील एकजण म्हणाला,

“कदाचित -- शेवटी --”

फोरमन केकाटला, “बरोबर. चला. चला.”

आम्हाला सगळ्याना माहिती होते, तो आमच्यापेक्षा हुशार होता. त्याच्या या ओरडण्यामुळे सैनिकाचा विजय झाल्याची, आमची खात्री झाली -- आम्हाला वाईट वाटले. आम्ही अस्वस्थ झालो.

बारा वाजता, म्हणजे जेवायच्या वेळी -- सैनिक अवतीर्ण झाला. तो नेहमीप्रमाणे, व्यवस्थित होता. त्याने नेहमीप्रमाणे, थेट आमच्या डोळयात बघितले. पण आम्हाला त्याच्याकडे बघताना, शरम वाटत होती.

तर, सभ्य गृहस्थहो, सैनिकी खाक्या कसा असतो, ते मी तुम्हाला दाखवलेले आवडेल का?" तो अहंमन्यतेने हसत बोलला. "मग पॅसेजमध्ये जा व दाराच्या फटीतून बघा -- , समजले का?"

आम्ही गर्दी करून बाहेर गेलो व पॅसेजच्या अंगणाच्या दिशेने उघडणाऱ्या दाराच्या फटीतून पाहीले. आम्हाला फार थांबावे लागले नाही -- लवकरच अंगणातून वितळलेल्या बर्फावरून व चिखलातून उडया मारत, तान्या घाईघाईने चालत आली. तळघराच्या दारातून ती अदृश्य झाली. नंतर, शिट्टी वाजवत, सावकाशीने, त्याच जागी सैनिक आला. त्याचे हात त्याच्या खिशात होते. आणि तो मिशा पिळत होता – पाऊस पडत होता. डबक्यात पडणारे थेंब, पाण्यात तरंग उमटवत होते. तो करडा, ओलसर दिवस होता, फार मेंगळट प्रकारचा. छपरांवर अजून बर्फ साचलेला होता. पण जमिनीवर चिखलाचे गडद डाग दिसत होते. छपरांवरील बर्फावरदेखील मातकट रंगाचा चिखलाचा थर दिसत होता. झिमझिम पावसाने, सर्वत्र उदासी भरून राहीली होती. आम्हाला तिथे थांबणे त्रासदायक व फार थंडी वाजणारे वाटू लागले –

प्रथम आमच्या तळघरातून बाहेर येणारा, सैनिक होता. तो मिशीला पीळ देत, सावकाशीने अंगण ओलांडून गेला. नेहमीप्रमाणे त्याचे हात त्याच्या खिशात होते.

मग तान्याही बाहेर आली. तिचे डोळे -- तिचे डोळे, आनंदाने चकाकत होते. तिच्या ओठांवर हसू होते. अडखळत, सावकाश पाऊले टाकत, ती स्वप्नात असल्यासारखी, चालली होती.

आम्हाला ती शांतता, सहन होईना. आम्ही सर्वजण दाराकडे गेलो व अंगणात धावलो. जोराने ओरडत, अडखळत पाऊले टाकत, रानटीपणे तिला घेराव घातला. आमच्या झुंडीकडे बघून ती, जणू तिच्या पायाला चिखल लागल्यासारखी, मागे

झाली. आम्ही तिला वेढा घातला. तिच्यावर आग ओकत, बेभानपणे तिच्यावर शिव्यांचा वर्षाव करू लागलो. तिच्याबद्दल निलाजरेपणे काहीही गोष्टी बोलू लागलो.

आम्ही हे, आमचा आवाज जास्त न वाढवता केले. तिला पूर्ण वेढून टाकल्यामुळे, ती पळून जाऊ शकत नव्हती. मग आम्ही तिची पुरेपूर खिल्ली उडवली. पण आम्ही तिच्या अंगाला हात लावला नाही -- का? मला माहिती नाही. ती मध्यभागी उभी राहून, आम्ही केलेले अपमान झेलत, तिची मान इकडून तिकडे हलवत राहिली. आम्ही तिच्यावर जास्त जास्त आक्रमक होत, टीकेची झोड उठवली. घाणेरडे, जहाल, शिव्याशाप दिले. तिचा चेहरा, फिका पडला. क्षणापूर्वीचे तिचे आनंदी निळे डोळे, मोठे झाले. छाती धडधडू लागली. तिचे ओठ थरथरू लागले.

तिच्याभोवती कोंडाळे करून आम्ही, तिच्यावर सूड उगवला. कारण तिने आम्हाला लुटले होते. जरी, आम्ही तिला दिलेली बिस्किटे, भिकाऱ्यांचे तुकडे होते तरी, ती आमची होती. आम्ही आमच्यातले चांगले, तिला अर्पण केले होते. फक्त ती एकटी होती आणि आम्ही सव्वीसजण होतो. म्हणूनच आम्ही तिचा तिच्या गुन्ह्याइतका, छळ केला नाही. पण तिचे किती अपमान केले! -- आमच्याकडे डोळे विस्फारून बघत, ती हा सर्व वेळ गप्प होती. ती अंगभर शहारली.

आम्ही हसलो, गर्जना केल्या, किंकाळया मारल्या. -- दुसरीकडून लोक येऊन आम्हाला मिळाले -- आमच्यापैकी एकाने तान्याच्या ब्लाउजच्या हाताला धरून तिला ओढले --

एकाएकी तिचे डोळे चकाकले. तिने सावकाशीने तिचे हात, डोक्याशी नेले आणि तिचे केस सरळ करून ती मोठ्याने, पण शांतपणे, आमच्या समोर म्हणाली, “ओहो, तुम्ही विचित्र कैदी लोक! –”

आणि ती सरळ आमच्याकडे चालत आली, जसे काही आम्ही तिची वाट अडवून, उभेच नव्हतो. आमच्यापैकी कुणीच, तिला विरोध केला नाही. आमच्या कोंडाळयातून बाहेर पडून, आमच्याकडे वळूनदेखील न पाहता, ती अवर्णनीय

तुच्छतेने, जोराने परत ओरडली, “ओहो तुम्ही घाणेरडे -- हलकट!” आणि निघून गेली. आम्ही तिथे मध्येच अंगणात, चिखलात, पावसापाण्यात, करड्या सूर्यविरहीत आकाशाखाली, अजून उभे होतो –

नंतर आम्ही चुपचाप आमच्या दगडी, ओलसर तळघरात परतलो. पूर्वीप्रमाणेच सूर्य कधीच पुन्हा खिडकीतून डोकावला नाही. आणि पुन्हा कधीच, तान्या आली नाही.

**The Pistol Shot,**

**by**

**Alexander Pushkin**

# पिस्तुलाचा नेम



आम्ही -- या लहानशा गावात मुक्काम केला. सैन्यातील ऑफिसरचे आयुष्य कसे असते, हे सर्वांना माहिती आहे. सकाळी कवायत, घोडेस्वारीची शाळा, प्रादेशिक कमांडरबरोबर किंवा ज्यूनी बांधलेल्या खाण्याच्या ठिकाणी जेवण, संध्याकाळी -- या ठिकाणी एखादे पेय आणि पत्ते. तिथे एकही क्लब नव्हता वा लग्नाळू मुलगी नव्हती. आम्ही एकमेकांच्या रहायच्या ठिकाणी जमत असू. तिथे आम्ही केवळ आमच्या गणवेषाकडे बघत बसत असू.

आमच्या कंपूत एकच मनुष्य असा होता, की जो सैन्यातील मनुष्य नव्हता. तो पस्तीस वर्षांचा होता. त्यामुळे आम्ही त्याला, जवळजवळ म्हातारा म्हणत असू.

वयामुळे त्याला आमच्यापेक्षा खूप फायदे मिळत. तो सतत उदास असे. तो स्वभावाने कडक होता व तिखट जिभेमुळे त्याचा, आमच्या तुकडीतील तरूण सैनिकांच्या मनावर जबरदस्त परिणाम होत असे. काही गूढ किंवा छुप्या नशिबाने, तो रशियन असून परदेशी नाव लावत असे. एके काळी त्याने हंगेरियन घोडेस्वार म्हणून काम केले होते आणि त्यात तो अव्वल ठरला होता. ती नोकरी सोडून अशा भिकार जागी गरीबासारखे, तरीही श्रीमंती डौलात तो का जगत होता, ते कुणालाच माहिती नव्हते. जीर्ण, काळा लांब कोट घालून तो कधीकधी चालायला जाई. पण सगळयांसाठी, त्याचे दार खुले असे. एका वयस्क सैनिकाने केलेले फक्त तीन कोर्सचे जेवण तो घेई. तरी सर्वांबरोबर तो भरपूर शँपेन घेई. त्याचे उत्पन्न किंवा मिळकत किती होती, ते कुणालाच माहिती नव्हते. त्या विषयावर त्याच्याशी बोलायची कुणाची टाप नव्हती. त्याच्याकडे सैन्यातील कामासंबंधीची बरीच पुस्तके व कादंबऱ्या होत्या. तो ती खुशीने कोणालाही वाचायला देत असे व परत मागत नसे. त्याचप्रमाणे त्याने कोणाकडून घेतलेले पुस्तक तो कधी परत करत नसे. त्याला पिस्तुलातून नेमबाजी करायचा शौक होता. त्याच्या खोलीच्या भिंती पिस्तुलाच्या गोळयांनी खराब झालेल्या होत्या. त्याना मधमाशीच्या पोळयांसारखी भोके पडली होती. त्याच्या गरीब झोपडीत, पिस्तुलांचा उत्तम संग्रह होता. त्यात त्याने फारच प्राविण्य मिळवले होते. प्रयोग म्हणून कोणाच्या डोक्यावरील पेरला लक्ष्य करायचे त्याने ठरवले, तर कोणी हरकत घेत नसे.

आमचे संभाषण नेहमी शस्त्रास्त्राने करायच्या स्पर्धेशी येऊन ठेपे. सिल्व्हियो (ते मी त्याला दिलेले नाव होते.) त्यात कधीही भाग घेत नसे. त्याला विचारले की तो कधी लढला आहे का, तर तो तसे केल्याचे सांगे, पण काही खुलासा करत नसे. हे उघड होते की त्याला असले प्रश्न आवडत नसत. आम्ही असा निष्कर्ष काढला होता की, त्याच्या अबोध मनात त्याच्या त्या भयंकर कौशल्याने, कुणाचा तरी बळी घेतला

गेल्याची दुःखद आठवण उमटत असणार. पण त्याला भीतीची भावना घेरून टाकते आहे की काय, असा संशय देखील आम्हाला कधी आला नाही. काही लोकांच्या बाह्य रुपामुळे आपण असा संशय घेऊ शकत नाही. पण अचानक काहीतरी झाले व त्यामुळे आमची करमणूक झाली. एका संध्याकाळी आम्ही दहा ऑफिसर्स सिल्व्हियोबरोबर जेवत होतो. आम्ही नेहमीएवढी दारू घेतली -- म्हणजे बरीच. जेवणानंतर आम्ही आमच्या यजमानाला आमच्यासाठी काही खेळांची तजवीज करायची विनंती केली. तो कधी विशेष खेळत नसे, त्यामुळे त्याने प्रथम विरोध केला. पण शेवटी त्याने पत्ते घेऊन यायला सांगितले. त्याने टेबलावर, एकशे पन्नास सोन्याचे रुबल्स पसरून ठेवले आणि खेळायला बसला. आम्ही त्याच्याभोवती गोळा झालो व खेळ सुरु झाला. सिल्व्हियोला खेळताना पूर्ण शांतता लागे. तो कधी स्पष्टीकरण करण्यात वा भांडणात पडत नसे. जर प्रतिस्पर्धी मोजायला चुकला, तर तो ताबडतोब फरकाचे पैसे भरत असे किंवा जास्तीचे पैसे लिहून ठेवत असे. आम्हाला हे माहिती होते. आम्ही त्याला त्याच्या पद्धतीने हिशेब ठेवायची परवानगी दिली होती. परंतु आमच्या तुकडीत नुकताच सामील झालेला एक ऑफिसर होता. खेळादरम्यान त्याने चुकून, एक आकडा जास्त वेळा मोजला. सिल्व्हियोने त्याच्या सवयीप्रमाणे, खडूने तो आकडा दुरुस्त केला. सिल्व्हियोने चूक केली आहे असे समजून त्या ऑफिसरने स्पष्टीकरण द्यायला सुरवात केली. सिल्व्हियो शांत होता. त्या ऑफिसरने चिडून, त्याला चुकीचा वाटणारा आकडा खोडला. सिल्व्हियोने खडू घेऊन, तो आकडा परत लिहिला. दारूमुळे भडकलेला ऑफिसर त्याच्या मित्रांचे हसणे ऐकून अपमानित झाला. त्याने टेबलावरील मेणबत्ती ठेवायचा स्टँड उचलून, तो सिल्व्हियोला मारायचा प्रयत्न केला पण सिल्व्हियोने खाली वाकून तो चुकवला. या प्रकाराने आम्ही गोंधळून गेलो. सिल्व्हियो रागाने उभा राहिला आणि डोळयातून आग ओकत बोलला, “प्रिय सर, कृपया येथून निघून जा. हे माझ्या घरात घडले, म्हणून देवाचे आभार माना.”

आता काय होणार अशा विचारात आम्ही पडलो. आम्हाला आमचा नवीन मित्र आधीच मेल्यासारखा वाटत होता. तो निघून गेला पण जाताजाता एवढे बोलला, की बँकरची इच्छा असेल त्याप्रमाणे, तो त्याच्या अपमानाला उत्तर देणे पसंत करेल. अजून काही मिनिटे खेळ चालू राहिला पण आमच्या यजमानाला तो पुढे चालू ठेवण्याची इच्छा दिसत नाही, असे वाटल्याने आम्ही एकेकजण तिथून काढता पाय घेऊन, आमच्या तुकडीत एक जागा रिकामी होण्याच्या शक्यतेबद्दल चर्चा करत, आमच्या रहायच्या जागी आलो.

दुसऱ्या दिवशी घोडेस्वारीच्या शाळेत, आम्ही विचारत होतो की बिचारा लेफ्टनंट अजून जिवंत आहे का. जेव्हा तो आमच्यात अवतीर्ण झाला, तेव्हा तोच प्रश्न आम्ही त्याला विचारला. तो म्हणाला की त्याला सिल्व्हियोबद्दल काही माहीत नाही. ते ऐकून आम्हाला नवल वाटले. आम्ही सिल्व्हियोला भेटायला गेलो, तेव्हा तो अंगणातील गेटला फावडे अडकवून नेमबाजी करत होता. त्याने आमचे नेहमीप्रमाणे स्वागत केले. काल रात्रीच्या घटनेबद्दल त्याने अवाक्षरही काढले नाही. तीन दिवस गेले. लेफ्टनंट अजून जिवंत होता. आम्ही नवल वाटून विचारले, “सिल्व्हियोला मारामारी करायची इच्छा नव्हती, अशी शक्यता असेल का?

सिल्व्हियोने मारामारी केली नाही. त्याने अगदी वरवरचे स्पष्टीकरण दिले व भांडण केले. आमचे तरुण मंडळींचे असे मत झाले, की हे त्याला गंभीर रीत्या जखमी केल्यासारखेच झाले. आमच्या दृष्टीने कशाहीपेक्षा तितके धाडस करणे, हे माफ करण्याजोगे होते. या तरुण मंडळींनी शूरपणात पुरुषार्थाच्या गुणांचा कळस गाठलेला असतो आणि अपयशाच्या शक्यतेसाठी सूट मिळवलेली असते. तरीही हळूहळू सर्व काही विसरले गेले व सिल्व्हियो पुन्हा त्याचे प्रभुत्व प्रस्थापित करू लागला.

मी एकटाच पुन्हा त्याच्याशी जवळीक साधू शकलो नाही. अद्भुततेत व कल्पनेत रमण्याचा माझा स्वभाव असल्याने, पूर्वी मी इतरांपेक्षा त्याच्याशी जास्त घसट असलेला होतो. त्याचे आयुष्य अद्भुतरम्य होते. मला तो एखाद्या गूढ गोष्टीतील नायक वाटे. त्यालाही माझा लळा होता -- निदान फक्त माझा. माझ्याशी बोलताना तो त्याचा नेहमीचा विरोधाभासात्मक सूर बदलून, विविध विषयांवर गंभीरतेने व वेगळयाच गोडव्याने बोले. पण त्या दुर्दैवी संध्याकाळनंतर त्याच्या स्वाभिमानाला धक्का लागल्याने आणि त्याची स्वतंत्र वृत्ती डागाळली गेल्याने, त्याबद्दलचा विचार सतत माझ्या मनात असे. त्यामुळे मी त्याच्याशी पूर्वीसारखा वागू शकत नव्हतो. मला त्याच्याकडे बघायला देखील नको वाटे. यावर काही बोलून कारण विचारायला, तो फार चलाख आणि अनुभवी होता. त्याचे त्याला दुःख होत असल्यासारखे वाटे -- एकदोन वेळा मला असे वाटले की त्याला माझ्याकडून स्पष्टीकरण हवे आहे. पण मी त्याला तशी संधीच दिली नाही. सिल्व्हियो खजील झाला. यानंतर मी त्याला फक्त माझ्या सहकाऱ्यांबरोबरच भेटलो. आमचे पूर्वीसारखे खुलेपणाने बोलणे संपले.

राजधानीसारख्या शहरात रहाणाऱ्या लोकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या अनेक गोष्टी असतात. पण लहान गावात किंवा खेड्यात रहाणाऱ्या लोकांची मनस्थिती फक्त तिथे रहाणारे लोकच जाणून घेऊ शकतात. उदाहरणार्थ, पोस्टाच्या दिवसाची वाट बघणे. मंगळवारी व शुक्रवारी आमचे ऑफीस, ऑफीसर्सनी भरलेले असे. कुणी पैशासाठी तर कुणी पत्रासाठी थांबलेले असत. पाकिटे बहुधा जागच्या जागी फोडली जात. बातम्या एकमेकाना सांगितल्या जात. त्यामुळे ऑफीस एकदम जिवंत झाल्यासारखे वाटे. आमच्या तुकडीच्या पत्त्यावर सिल्व्हियोला पत्रे येत आणि त्याकरता तो तिथे थांबलेला असे. एकदा त्याला मिळालेल्या पत्राचे सील त्याने अधीरतेने फाडले. मजकुरावरून नजर फिरवताना, त्याचे डोळे चकाकले. सगळे ऑफीसर्स आपापली पत्रे घेण्यात दंग असल्याने, कुणाच्या काही लक्षात आले नाही. सिल्व्हियो म्हणाला, “सभ्य

गृहस्थहो, अशी परिस्थिती आहे की मला लगेच निघावे लागेल. मी आज रात्री निघेन. मला अशी आशा आहे की आज रात्री तुम्ही माझ्याबरोबर शेवटचे जेवण घेण्यासाठी, नकार देणार नाही. तो माझ्याकडे वळून म्हणाला, "तू येशील अशी मी अपेक्षा करतो आहे. तू नक्की ये." एवढे बोलून तो घाईघाईने निघून गेला. त्याच्याकडे जायचे नक्की करून आम्ही वेगवेगळया मार्गाने निघालो.

मी ठरलेल्या वेळी सिल्व्हियोकडे आलो आणि तिथे आमची पूर्ण तुकडी जमलेली पाहिली. त्याचे सर्व सामान बांधून तयार होते आणि तिथे फक्त पिस्तुलाच्या गोळयांनी भोके पडलेल्या उजाड भिंती उरल्या होत्या. आम्ही टेबलाशी बसलो आमचा यजमान फार उत्साहात होता आणि लवकरच सर्वजण त्याच्या खेळकर आनंदीपणाने भारावून गेले. दर मिनिटाला बाटल्यांची बुचे निघत होती व पेले फेसाळत होते. मोठ्या सदिच्छेने आम्ही त्याला, जलद व सुखरूप प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. आम्ही टेबलावरून उठलो तेव्हा संध्याकाळ उलटून गेली होती. आम्ही आमच्या टोप्या गोळा करत असताना, सिल्व्हियो सर्वांचा निरोप घेत होता. मी निघत असताना त्याने हाताला धरून मला बाजूला घेतले व हळू आवाजात म्हणाला, "मला तुझ्याशी बोलायचे आहे." मी मागे थांबलो.

पाहुणे गेले. मग आम्ही दोघे पाईप ओढत समोरासमोर बसलो. सिल्व्हियो विचारात पडला होता. त्याचे हास्य लोप पावले. त्याचे भयानक मलूल आणि चमकदार डोळे व तोंडातून निघणारा गडद धूर यामुळे तो महाकाय राक्षसासारखा दिसू लागला. काही मिनिटांनी शांततेचा भंग करत, तो बोलला, "कदाचित आपण आयुष्यात पुन्हा भेटणारही नाही. त्यामुळे त्यापूर्वी मला तुला स्पष्टीकरण द्यायचे आहे. मला दुसऱ्या लोकांच्या मताबद्दल फारसा आदर नाही असा तुझा ग्रह झाला असेल पण मला तू आवडायचास आणि तुझे माझ्याबद्दलचे असे चुकीचे मत ठेवून निघून जाणे मला उदास करते."

तो थांबला व पाईप झटकू लागला. मी डोळे खाली वळवून गप्प राहिलो.

“ते तुला विचित्र वाटले असेल की मी प्यायलेल्या मूर्ख -- कडून स्पष्टीकरण मागितले नाही. तू कबूल करशील की मला शस्त्रात्रे निवडण्याचा अधिकार होता. त्याचे आयुष्य माझ्या हातात होते, तर मला काहीच धोका नव्हता. मी माझी सहनशीलता उदारतेत बदलू शकलो असतो. पण मला खोटे बोलायची इच्छा नव्हती. जर मी माझे आयुष्य उघड न करता -- ला शिक्षा करू शकलो असतो तरी मी त्याला या जगातून नाहीसे केले नसते.”

मी सिल्व्हियोकडे आश्चर्याने पाहीले. अशी कबुलीने मला पूर्णपणे गोंधळवून टाकले.

सिल्व्हियोने सुरु ठेवले, “असेच झाले. मला स्वतःचे मरण ओढवून घ्यायचे नव्हते. सहा वर्षांपूर्वी मी थोबाडीत खाल्ली आणि माझा शत्रू अजून जगतो आहे.”

मला काय झाले याची उत्सुकता लागून राहीली. मी बोललो, “मग तू त्याच्याबरोबर मारामारी केली नाहीस? नक्कीच परिस्थितीने तुम्हाला एकमेकांपासून अलग ठेवले.”

“हो. मी त्याच्याबरोबर मारामारी केली आणि हा त्याचा पुरावा.”

सिल्व्हियो उठला व एका पेटीतून लाल टोपी काढली. फ्रेंच लोक ज्याला ‘पोलिसांची टोपी’ म्हणत असत ती! ती त्याने घातली. कपाळापासून दोन इंचावर तिला गोळीने भोक पडले होते. “तुला माहिती आहे, मी एके काळी -- हंगेरियन घोडेस्वार म्हणून काम केले होते. माझे चारित्र्य तुला माहिती आहे. सगळ्या गोष्टीत माझा पहीला नंबर असे. माझ्या तारुण्यात ती माझी लालसा होती. त्या काळी रानटीपणाची फॅशन होती -- आणि मी सैन्यातील सर्वात धारदार पाते होतो. आम्ही जास्त दारू पिण्यावर गर्व करत असू. एकदा मी प्रमाणाबाहेर प्यायलो. ज्यात डेनिश

डॅव्हिडोव्ह्ची या रशियन कवीची गाणी गातात तो ब्यूर्टसेव्ह उत्सव आम्ही साजरा केला. आमच्या तुकडीत लढाया नेहमी होत असत -- त्या सर्वात मी नेहमी पहीला किंवा दुसरा असे. माझे सहकारी मला आदर्श मानत. सारखे बदलणारे कमांडिंग ऑफिसर माझ्यावर खार खाऊन असत.

"मी शांतपणे -- किंवा आतून चिडून -- मी मिळवलेले नाव मी मोठ्या रुबाबात मिरवत असे. तेव्हा आमच्या तुकडीत एक श्रीमंत व कीर्तिवान कुटुंबातील कमांडिंग ऑफिसर नव्याने आला. ( मी त्याचे नाव सांगणार नाही. ) मी माझ्या आयुष्यात इतक्या असामान्य व नशीबवान व्यक्तीला भेटलो नव्हतो. तारुण्य, शहाणपण, देखणेपण आणि एकदम बेदरकार धाडस; या सर्वांनी युक्त असे एक प्रसिद्ध नाव! आणि संपत्ती तर मोजदाद करता येणार नाही इतकी! कल्पना कर त्यांने आमच्यावर काय प्रभाव टाकला असेल.

"माझ्या आधीच्या किर्तीला धक्का लागला. माझा एकंदर बोलबाला बघून तो माझ्याशी मैत्री करायला बघू लागला. मी त्याचे थंडे स्वागत केले आणि मग तो खंत न करता माझ्यापासून फटकून राहू लागला. मी त्याचा द्वेष करू लागलो. त्याचे आमच्या तुकडीतले यश व स्त्रियांमधील मानसन्मान, माझे स्थान डळमळीत करून गेला. मी त्याच्याशी भांडायची संधी शोधू लागलो. माझ्या टोमण्यांना तो अधिक हजरजबाबीपणे दुसऱ्यांकरवी उत्तर देई. ते फारच मनोरंजक असे. तो विनोद करे आणि मी चवताळून उठे.

"शेवटी एका संध्याकाळी एका पोलीश राजदूताकडील नाचाच्या प्रसंगी, सगळया महिलांच्या आकर्षणाचा, विशेषतः तरूण यजमानीण बाईसाहेबांच्या, आकर्षणाचा केंद्रबिदू तो झालेला बघून, मी त्याच्या कानात काही अपमानास्पद बोललो. खास करून यजमानीण बाईसाहेबांच्याबरोबर माझे सूत जुळलेले असताना, असे होणे मला

सहन झाले नाही. त्याने चिडून माझ्या मुस्काटात लगावली. आमचे हात आमच्या तलवारीकडे वळले. महिला चक्कर येऊन खाली पडल्या. आम्हाला बाजूला करण्यात आले. त्याच रात्री आमचे युद्ध सुरु झाले.

“दिवस उजाडताना मी माझ्या नियोजित जागेवर, तीन सेकंद उभा राहिलो. स्पष्टीकरण देण्यास अवघड अशा अधीरतेने मी मला विरोध करणाऱ्यांची वाट पहात होतो. उन्हाळयातील सूर्योदय झाला व वर येऊन तापू लागला. मी काही अंतरावर त्याला पाहीले. तो चालत होता. त्याच्या कोटाखाली तलवार होती. एका सेकंदात आम्ही त्याला भेटायला गेलो. चेरीने भरलेली टोपी घेऊन, तो आला. एका सेकंदाची वेळ आम्हाला बारा तासांसारखी वाटत होती. पहीला बार मला लावायचा होता पण माझी असूया इतकी वाढली होती व रागाचा पारा इतका चढला होता, की मला माझा हात स्थिर राहील याची खात्री वाटेना. मी मला शांत होण्यासाठी स्वतःला वेळ दिला व त्याला प्रथम बार उडवायला सांगितले. माझा विरोधक त्यासाठी तयार होईना. असे ठरले की त्यासाठी चिठ्ठ्या टाकल्या जाव्यात. पहीला नंबर त्याचा लागला. नेहमी त्याचा भविष्यकाळ उज्वल होता. त्याने नेम धरला व गोळी माझ्या टोपीच्या आरपार गेली.

“आता माझी पाळी होती. शेवटी त्याचे आयुष्य माझ्या हातात होते. मी त्याच्याकडे शोधक नजरेने पाहीले. त्याच्यात मला थोडी अस्वस्थतेची सावली दिसली. तो माझ्या पिस्तुलाकडे तोंड करून उभा राहीला. त्याने त्याच्या टोपीतून पिकलेल्या चेरी काढल्या व खाल्लेल्या चेरीतील बिया थुकला. मी उभा होतो तिथपर्यंत त्या उडाल्या. त्याच्या बेपर्वाईने मी वेडा झालो. मी विचार केला, ‘याचा मला काय फायदा आहे? तो अजिबात अशी अपेक्षा करत नसताना, त्याचा जीव घ्यावा का?” असा दुष्ट विचार माझ्या मनात डोकावला. मी पिस्तुल खाली वळवले.

मी त्याला म्हणालो, “आत्ता तू मरायला जराही तयार वाटत नाहीस. तुला न्याहारी करायची असेल, तर मी तुझ्यामध्ये येणार नाही.”

तो उत्तरला, “ तसे काही नाही. चांगला नेम धर किंवा -- तुला पाहीजे तसे कर. तू नेम धर आणि मी त्यासाठी सदैव तयार आहे.”

मी दोन सेकंदानी असे जाहीर केले की मला आत्ता नेमबाजी करायची नाही. त्यामुळे युद्धाचा शेवट झाला.

मी नोकरीतून निवृत्त झालो व ते छोटे गाव सोडले. त्या दिवसापासून सूड घ्यायच्या भावनेने मी झपाटलो आहे. आता माझी वेळ आली आहे —"

सिल्व्हियोने त्याच्या खिशातून त्याला सकाळी मिळालेले पत्र काढले व मला वाचायला दिले. लेखकाने ( बहुधा त्याचा एजंट ) त्याला मॉस्कोहून कळवले होते की ‘तो मनुष्य’ लवकरच कायदेशीरपणे एका तरुण, सुंदर मुलीशी लग्न करतो आहे.

सिल्व्हियो म्हणाला, “‘तो मनुष्य’ कोण आहे याचा अंदाज तू करू शकतोस. मी मॉस्कोला चाललो आहे. त्याच्या लग्नाच्या क्षणी तो त्याच बेदरकारपणे, मृत्युला सामोरा जायला तयार आहे का ते बघू. एकदा त्याच्या टोपीतील चेरींसकट तो त्यासाठी तयार होता.

एवढे बोलून सिल्व्हियो उठला. त्याची टोपी जमिनीवर फेकली व खोलीत पिंजऱ्यातील वाघासारख्या फेऱ्या मारू लागला. मी स्तब्धपणे त्याचे बोलणे ऐकून घेतले होते पण मी विचित्र भावनेने गोंधळून गेलो होतो.

नोकराने आत येऊन घोडे तयार असल्याचे सांगितले. सिल्व्हियोने माझा हात प्रेमाने दाबला. आम्ही मिठी मारली. त्याने घोडागाडीत त्याची जागा घेतली. प्रवासाच्या बॅगा तिथे ठेवलेल्या होत्या. एकीत पिस्तुले होती व दुसरीमध्ये इतर सामान होते. आम्ही परत एकदा निरोप घेतला व घोडे वेगाने निघाले.

खूप वर्षे गेली. परिस्थितीमुळे, आता मी एका लहानशा टुकार गावात, स्थिरस्थावर झालो होतो. शेती करत होतो. मी माझ्या आधीच्या उत्साहाने सळसळत्या व स्वच्छंदी जीवनाची आठवण काढून, उसासे सोडायला विसरत नव्हतो. उन्हाळयातील व थंडीतील संध्याकाळी एकांतवासात घालवणे, हे मला चिडचिडे बनवणारे होते. मी रात्रीच्या जेवणापर्यंतचा वेळ, कसाबसा तेथील बेलीफबरोबर गप्पा मारण्यात घालवत असे. एक फेरफटका मारून काम कसे चालले आहे ते बघे. किंवा नवीन इमारतीत एखादी चक्कर मारत असे. पण अंधार पडू लागला, की आता एकट्याने कसा वेळ घालवायचा असा विचार करून, मी हताश होत असे. कपाटात व साठवण खोलीत काही पुस्तके असल्याचे माझ्या लक्षात आले होते. माझे घर सांभाळणारी कीरीलोवना मला ज्या गोष्टी सांगे, त्या माझ्याशीच संबंधित असत. शेतकरी बायकांची गाणी मला दुःखी करत. मग मी पित बसे पण त्याने माझे डोके दुखे. 'दारूत दुःख बुडवणारा' असा मी बनत चालल्याची, मला भीती वाटू लागली होती. -- 'सर्वात अट्टल दारुड्या!' अशी अनेक उदाहरणे मी पाहीली होती. एकदोन दारुडे सोडून, मला सख्खे शेजारी कुणी नव्हते. त्या दारुड्यांचे संभाषण म्हणजे सुस्कारे व उसासे असत. त्यापेक्षा माझे एकटेपण मला परवडत असे.

घरापासून थोड्याच अंतरावर, श्रीमंत बाईसाहेब -- च्या मालकीची मोठी इस्टेट होती. तिथे फक्त राखणदार रहात असे. त्या बाईसाहेब त्यांच्या लग्नाच्या पहील्या वर्षी एकदा इथे आल्या होत्या व महिनाभर राहील्या होत्या. माझ्या निवृत्तीनंतरच्या दुसऱ्या उन्हाळयात अशी अफवा पसरली की बाईसाहेब व त्यांचा नवरा आता इथे येणार आहेत. त्याप्रमाणे ते जूनच्या सुरवातीला आले.

त्या प्रदेशात रहाणाऱ्या लोकांसाठी, असे श्रीमंत शेजारी रहायला येणे ही महत्वाची गोष्ट होती. दोन महिने आधी व तीन महिने नंतर त्याची चर्चा होत राहीली.

माझ्या बाबतीत म्हणाल तर मी कबूल करतो की, तरुण व सुंदर शेजारणीच्या वास्तव्याचा, माझ्यावर खोल परिणाम झाला. मी उत्सुकतेने तिची वाट पाहू लागलो. आणि त्याप्रमाणे तिच्या आगमनानंतर पहील्या रविवारी, मी त्यांचा सर्वात जवळील शेजारी व नम्र सेवक म्हणून ओळख करून घ्यायला, रात्रीच्या जेवणानंतर बाहेर पडलो.

एका नोकराने मला त्या बाईसाहेबांच्या खोलीकडे नेले व मी आल्याची वर्दी दिली. तो मोठा हॉल चैनीच्या वस्तूंनी सजवलेला होता. पितळी चौकट असलेली भिंतीवरील कपाटे पुस्तकांनी लगडलेली होती. शेकोटीवरील संगमरवरी कट्ट्यावर मोठा आरसा होता. जमिनीवर हिरवा गालिचा घातला होता. चैनीची सवय नसलेला व छोट्याशा गरीब घरात रहाणाऱ्या मला, असा भपका पहायची वेळ आली नव्हती. माझ्यावर फार दडपण आले. मनातून थोडा घाबरून, मी त्या जमीनदाराची वाट बघू लागलो.

दारे उघडली गेली व आणि साधारण बत्तिशीचा एक देखणा माणूस, माझ्याकडे मोकळेपणे व मित्रत्वाने चालत आला. मी धीर गोळा करून माझी ओळख करून देऊ लागलो, पण मला त्याने अडवले. आम्ही खाली बसलो. त्याच्या सहज व सौहार्दपूर्ण भाषणाने, माझा बुजरेपणा कमी झाला. मी माझा नेहमीचा धीटपणा परत आणायचा प्रयत्न करत होतो, तेवढ्यात अचानक बाईसाहेब आत आल्या आणि मी पूर्वीपेक्षाही गोंधळून गेलो. खरेच, ती फार सुंदर होती. जमीनदाराने माझी तिच्याशी ओळख करून दिली. मी माझ्यावर दडपण न आणण्याचा प्रयत्न केला. पण मी जितका मोकळेपणा दाखवायचा प्रयत्न करू लागलो, तितका मी अधिकाधिक संकोचत गेलो.

मी भानावर येऊन नवीन ओळखीला सरावेपर्यंत, ते एकमेकांशी बोलू लागले. मी एक चांगला शेजारी असल्यासारखे, सहजपणे माझ्याशी वागू लागले.

मध्यंतरीच्या काळात मी पुस्तके व चित्रे न्याहाळत फिरू लागलो. मी काही चित्रातील जाणकार नव्हतो. पण त्यातील एका चित्राने माझे लक्ष वेधून घेतले. त्यात स्विझर्लंडमधील एक दृष्य काढले होते. पण मला ते चित्र बघून नव्हे, तर त्यावर एकाखाली एक पडलेली दोन भोके बघून, धक्का बसला.

मी जमीनदाराकडे वळून म्हणालो, "हा चांगला नेम आहे."

तो उत्तरला, "हो. अतिशय वैशिष्ट्यपूर्ण नेम! तुम्ही पण नेमबाज आहात का?"

"हो. बऱ्यापैकी." माझ्या ओळखीच्या विषयावर संभाषण शेवटी सुरु झालेले बघून मी निःश्वास टाकला. "मी तीस फुट अंतरावरून पत्त्यांमधील चित्रांवर एकदाही न चुकता, गोळी मारू शकतो. अर्थात माझ्या ओळखीच्या पिस्तुलातूनच!"

जागरूकपणे बाईसाहेब उद्गारल्या, "खरे की काय? आणि डार्लिंग, तू असे करू शकतोस का?"

जमीनदार बोलला, "एखादे दिवशी आपण प्रयत्न करून बघू. चार वर्षात मी हातात पिस्तुल घेतले नाही, पण त्यापूर्वी मी बऱ्यापैकी नेमबाज होतो."

मी मल्लीनाथी केली, "ओहो, तर मग मी बेट लावतो, की तुम्ही वीस फूट अंतरावरुनही असा नेम साधू शकणार नाही. पिस्तुलाच्या नेमबाजीसाठी रोजचा सराव आवश्यक असतो. हे मला अनुभवाने माहिती आहे. आमच्या तुकडीतील मी एक नावाजलेला नेमबाज होतो. एकदा असे झाले की मी महिन्याभरात पिस्तुलाला हात लावला नाही. कारण ते दुरुस्तीला गेले होते. आणि तुम्हाला काय वाटते,

जमीनदारसाहेब? मग मी पंचवीस फुटावरील बाटलीला नेम मारायला गेलो तेव्हा तो चार वेळा हुकला. आमचा कॅप्टन फार हुशार माणूस होता. विशेषतः हलणाऱ्या वस्तूवर तो अचूक नेम साधे. तेव्हा तो सहज तिथे आला व मला म्हणाला, “अरे भावा, काय झाले आहे ते मी तुला सांगतो. बाटलीच्या बाबतीत, तुझा हात उचलला जात नाही आहे. नाही. जमीनदारसाहेब, तुमच्या सरावाला कमी लेखू नका. नाहीतर तुमचे कसब वाया जाईल. प्रथितयश नेमबाज रोज सराव करतात -- निदान दिवसातून तीन वेळा. रोजचा व्होडकाचा पेला रिचवण्याइतकेच ते त्याच्या अंगवळणी पडलेले असते.”

मला काहीतरी बोलण्यासारखे सापडले, म्हणून जमीनदार व बाईसाहेब खूष झाले.

जमीनदार म्हणाला, “तो नेम कसा साधत असे?”

“मी तुम्हाला सांगतो, जमीनदारसाहेब. तो भिंतीवर बसलेली माशी बघे. तुम्ही हसता आहात, बाईसाहेब? देवाशपथ हे खरे आहे. तो माशीला बघून नोकराणीला हाक मारे. “कोझका, पिस्तुल!” कोझका त्याला भरलेले पिस्तुल आणून देई. तो नेम साधे व माशी भिंतीवर चिरडली जाई”.

जमीनदार बोलला, “हे अद्‌भुतरम्य आहे. त्याचे नाव काय होते?”

“सिल्व्हियो”

जमीनदार उडी मारून म्हणाला, “तुम्हाला सिल्व्हियो माहिती आहे?

“मला तो कसा माहिती नसेल? मी त्याचा मित्र होतो. आमचा तुकडीत तो एखाद्या भावासारखा किंवा मित्रासारखा होता. पण गेली पाच वर्षे मला त्याची काही बातमी नाही. तुम्हालाही तो माहिती आहे का?”

"हो. मला तो चांगलाच माहिती आहे. त्याने तुम्हाला कधी त्या विचित्र प्रसंगाबद्दल काही सांगितले नाही का?"

"नाचाच्या वेळी एका वेड्या माणसाने त्याला थोबाडीत मारली, त्याबद्दल म्हणता आहात का?"

"आणि त्याने तुम्हाला त्या वेड्या माणसाचे नाव सांगितले का?"

"नाही -- कधीच नाही. मला माफ करा -- मला माहिती नाही -- नक्की ते तुम्ही तर नाही ना?"

असामान्य रीत्या चिडून जमीनदार म्हणाला, "हो. तो मीच होतो. आणि त्या चित्रावर पडलेली दोन भोके हा आमच्या शेवटच्या भेटीचा पुरावा आहे -- "

बाईसाहेब बोलल्या, "ओहो डार्लिंग, कृपया, त्या घटनेची आठवण काढू नकोस. ते ऐकणे हे माझ्यासाठी उबग आणणारे आहे."

जमीनदार उत्तरला, "नाही. मी सर्व काही सांगणार. त्याला माहिती आहे की मी त्याच्या मित्राचा कसा अपमान केला. सिल्व्हियोने त्याचा सूड कसा घेतला, हे त्याला ऐकू दे."

बाईसाहेबानी एक आरामखुर्ची माझ्याकडे ढकलली. आणि मोठ्या चवीने मी ती हकीगत ऐकली.

"पाच वर्षांपूर्वी मी लग्न केले. या गावात आम्ही मधुचंद्र साजरा केला. माझ्या आयुष्यातील उत्तम क्षणांसाठी व काही दुःखद आठवणींसाठी, मी या घराचे ऋण मानतो. एका संध्याकाळी आम्ही दोघे घोड्यावरून रपेट मारायला गेलो. माझ्या बायकोचा घोडा अडला. तिने घाबरून लगाम माझ्याकडे दिला. ती घरी चालत गेली.

मी तिच्यापुढे घोड्यावरून चाललो होतो. आमच्या दारासमोर मी एक प्रवासी गाडी पाहीली. नोकराने सांगितले, की एक माणूस घरात माझी वाट बघतो आहे. मात्र त्या माणसाने त्याचे नाव सांगण्यास नकार दिल्याचे तो म्हणाला. तो एवढेच म्हणाला की त्याचे माझ्याकडे काम आहे. मी आत शिरलो व अर्धवट उजेडात त्या माणसाला बघितले. दाढी वाढलेला व धुळीने माखलेला असा तो होता. तो इथे धुराड्याजवळ उभा होता. मी त्याच्याजवळ जाऊन त्याची ओळख विचारली."

'अरे तू मला ओळखले नाहीस का?' त्याने घाबरट आवाजात विचारले.

मी ओरडलो, "सिल्व्हियो!" मी कबूल करतो, की माझे केसनकेस उभे राहीले.

तो पुढे बोलला, "हो. मी तुझ्यावर एक नेम धरायचे बाकी आहे आणि मी पिस्तुल घेऊन आलो आहे. तू तयार आहेस का?"

त्याच्या खिशातून पिस्तुल डोकावत होते. मी त्याच्यापासून बारा फुट अंतरावर कोपऱ्यात उभा राहिलो. माझी बायको यायच्या आत माझ्यावर नेम धरून गोळी झाडण्यासाठी मी त्याला विनवत होतो. तो थांबला. त्याने दिवे लावायला सांगितले. नोकरांनी मेणबत्त्या आणल्या. मी दारे लावली व कुणाला आत न सोडण्यास सांगितले व परत त्याला लवकर नेम धरण्यास सांगितले. त्याने पिस्तुल काढून नेम धरला -- मी सेकंद मोजू लागलो -- तिचा विचार -- असे एक मिनिट गेले.

सिल्व्हियोने त्याचा हात खाली घेतला.

तो बोलला, "मला खेद होतो की पिस्तुलात चेरीच्या बिया भरलेल्या नाहीत -- गोळया जड आहेत. मला असे वाटते आहे, की आपण इथे लढाईसाठी नव्हे तर खुनासाठी, एकमेकांसमोर उभे आहोत. निःशस्त्र माणसावर शस्त्र चालवायची मला सवय नाही. आपण परत सुरवात करू. कोण आधी गोळी झाडणार यासाठी आपण चिठ्ठ्या टाकू."

“माझे डोके गरगरू लागले -- मला वाटले हे कबूल करू नये. शेवटी आम्ही एक दुसरे पिस्तुल भरले. दोन कागदाचे तुकडे त्या टोपीला लावले ज्याला मी पूर्वी भोक पाडले होते. परत एकदा पहीली चिठ्ठी मी उचलली.

जे हसू मी कधीही विसरणार नाही, असे हसू हसत तो म्हणाला, “अरे, तू तर भलताच सुदैवी निघालास. आता मला समजेना की माझ्या हातून काय होणार आहे.

त्याने मला गोळी मारायला लावली –- मी बार उडवला आणि गोळी चित्राला लागली.”

त्या जमीनदाराने हात उंचावून मला, चित्राला गोळी लागून पडलेली भोके दाखवली. त्याचा चेहरा आगीसारखा लाल झाला होता. बाईसाहेब त्यांच्या पांढऱ्या रुमालापेक्षा पांढऱ्या फटक पडल्या होत्या. मी अवाक झालो.

जमीनदार पुढे बोलला, “मी बार उडवला आणि देवाच्या कृपेने तो चुकला. मग सिल्व्हियो -- त्या क्षणी तो फार भयानक दिसत होता -- त्याने माझ्यावर नेम धरायला सुरवात केली. अचानक दार उघडले व माशाने किंकाळी मारून धावत येत मला गळामिठी घातली. तिच्या येण्याने माझे अवसान गोळा झाले. “प्रिये, तुला दिसत नाही का, की आमचा काही विनोद चालला आहे. तू किती घाबरली आहेस! जा. एक पेलाभर पाणी पिऊन ये. मी तुझी माझ्या जुन्या मित्राशी व सहकाऱ्याशी, ओळख करून देतो.”

माशाचा माझ्या शब्दांवर विश्वास बसेना. ठाम असलेल्या सिल्व्हियोकडे वळत तिने विचारले, “मला सांगा, माझा नवरा खरे बोलतो आहे का? हे खरे आहे का की तुमच्या दोघात काही विनोद चालला आहे?”

सिल्व्हियो उत्तरला, “बाईसाहेब, तो नेहमीच विनोद करत असतो. एकदा विनोद करण्याच्या भरात त्याने माझ्या थोबाडीत मारली. त्याच्याही पुढे जाऊन त्याने माझ्या डोक्यावरील टोपीला नेम धरून गोळी मारली. विनोद करताना माझा जीव थोडक्यात बचावला. आणि आता मला विनोद करायची इच्छा आहे.”

एवढे बोलून तो माझ्यावर नेम धरु लागला होता -- तिच्यासमोर! माशाने त्याच्या पायावर लोळण घेतली.

मी रागाने ओरडलो, “माशा, उठ. हे लाजिरवाणे आहे. आणि तुम्ही सर, त्या गरीब बाईची चेष्टा करणे थांबवाल का? तुम्ही गोळी चालवणार आहात की नाही?”

सिल्व्हियो उद्गारला, “नाही. मी गोळी चालवणार नाही. माझे समाधान झाले. मी तुला रागावलेले व दुःखी झालेले पाहीले. मी तुला माझ्यावर गोळी चालवायला लावले आणि माझे समाधान झाले. मी तुला तुझ्या सद्सदविवेकबुद्धीवर सोडून देतो.”

एवढे बोलून तो निघाला होता. पण दारात थांबला व मी गोळी मारुन भोके पडलेल्या चित्राकडे बघू लागला. त्यावर नेम न धरता त्याने गोळी चालवली व गेला. माझ्या बायकोला चक्कर आली. नोकर त्याला थांबवू शकले नाहीत. ते त्याच्याकडे घाबरून बघत राहीले. तो पायऱ्या उतरून गेला. त्याच्या चालकाला बोलावले. मी भानावर येण्यापूर्वी तो गेलेला होता.”

जमीनदार बोलायचा थांबला. अशा तऱ्हेने मला ज्या गोष्टीच्या सुरवातीने चक्रावून टाकले होते, त्या गोष्टीचा शेवट कळला. त्या गोष्टीचा नायक मला कधीच भेटला नाही. असे ऐकण्यात आले की अलेक्झांडर पिसिलांटी याने सरकारविरुद्ध केलेल्या उठावामध्ये सिल्व्हियोने, स्त्रीकुटुंबप्रधान पलटणीचे नेतृत्व केले आणि स्कुलीॲनीच्या लढाईत तो मारला गेला.

**In Another Country**

**By**

**Arnest Hemingway**

# दुसऱ्या देशात



पानगळीच्या ऋतुत, नेहमीच लढाई चालू असते, पण आता आम्हाला, तिचे काही वाटेनासे झाले. मिलानमध्ये तेव्हा थंडी होती. दिवस खूप लहान होता. मग विजेचे दिवे आले, तेव्हा खिडकीतून बाहेर रस्त्यावर बघणे, आनंददायी झाले. कोल्ह्यांच्या केसाळ कातडीवर बर्फाची भुरभूर पडत होती व शेपटीत वारा भरत

होता. दुकानांच्या बाहेर मोठी मौजमजा चालली होती. हरीणे जडशीळ होऊन, एका जागी खिळल्यासारखी झाली होती. छोटे पक्षी, वाऱ्यावर उडत होते व वारा त्यांची पिसे उडवत होता. ही पानगळीतील, थंडी होती. डोंगराकडून वारा वहात होता.

आम्ही सगळे रोज दुपारी इस्पितळात असू. संधीप्रकाशात गावातून इस्पितळात जाण्याचे अनेक रस्ते होते. दोन रस्ते कालव्याच्या कडेनी होते पण ते लांबचे होते. पण तुम्ही नेहमीच कालव्यावरून पूल ओलांडून, इस्पितळात शिरत होतात. यासाठी तीन पुलांचा पर्याय होता. त्यापैकी एका पुलावर, एक बाई लालसर, तपकिरी, शिंगाडे विकत असे. तिच्यासमोर कोळशाची शेगडी असे. तिथे उभे राहिले, की उबदार वाटे आणि खिशातील शिंगाडे कोमट असत. इस्पितळ खूप जुने व सुंदर होते. तुम्ही गेटमधून आत शिरलात, की अंगण ओलांडून मागच्या गेटच्या बाहेर पडता. जुन्या इस्पितळामागे विटांचे बांधकाम केले होते, तिथे आम्ही दर दुपारी भेटत असू. सर्वजण नम्र होते व दुसऱ्यांना काय दुखापत झाली आहे, त्यात त्याना रुची होती. बराच बदल घडवून आणणाऱ्या फ़िजीओथेरपीच्या ( मसाज, शेक व व्यायामाची मशीन्स ) मशीन्सजवळ, आम्ही बसत असू.

मी बसलेल्या मशिनच्या जवळ डॉक्टर आले व म्हणाले, “या युद्धाच्या पूर्वी तुला, सर्वात जास्त काय करायला आवडायचे? तू काही खेळ खेळायचास का?”

मी म्हणालो, “हो. फूटबॉल.”

ते बोलले, “छान. तू पूर्वीपेक्षादेखील जास्त चांगला, तो खेळ खेळू शकशील.”

माझा गुडघा वाकला नाही आणि गुडघ्यापासून सरळ घोट्यापर्यंत, पोटऱ्यांचे स्नायू नसल्यासारखा पाय खाली पडला. गुडघा वाकवण्यासाठी व तीन चाकांची

सायकल चालवताना होते तशी पायांची गोलगोल हालचाल करण्यासाठी, मी मशीन वापरत होतो. अजून गुडघा नीट वाकत नव्हता. त्याऐवजी वाकवायच्या भागाजवळ आले, की मशीन वेडेवाकडे हलत होते. डॉक्टर बोलले, “हे असे होणे थांबेल. तू सुदैवी, तरुण माणूस आहेस. तू एखाद्या कसबी खेळाडूप्रमाणे, फूटबॉल खेळू शकशील.”

पुढच्या मशीनवर एक मेजर होता. त्याला बाळासारखा लहानसा हात होता. डॉक्टरांनी त्याचा हात तपासला, तेव्हा त्याने माझ्याकडे बघून डोळे मिचकावले. तो हात, दोन चामडी पट्ट्यांमध्ये होता. तो वरखाली होत असे व कडक झालेली बोटे उघडमिट होत असत. “डॉक्टर, मी सुद्धा फूटबॉल खेळू शकेन का?” तो युद्धापूर्वी इटालीतील एक उत्तम फेन्सर ( तलवारबाजी करणारा, त्यासाठी आवश्यक असे, संरक्षक कपडे घालणारा ) होता.

डॉक्टर मागे असलेल्या खोलीतील त्यांच्या कार्यालयात गेले व मेजरप्रमाणे असलेल्या छोट्या हाताचा, फोटो घेऊन आले. मशीनचे उपचार घेण्यापूर्वीचा तो हात होता. नंतर तो थोडा मोठा झाला होता. त्याच्या चांगल्या हाताने मेजरने, तो फोटो धरला व त्याकडे काळजीपूर्वक पाहिले.

त्याने विचारले, “जखम?”

डॉक्टर उत्तरले, “एक औद्योगिक अपघात.”

मेजर म्हणाला, “खूप दिलचस्प आहे. खूपच दिलचस्प.” व फोटो परत डॉक्टरांच्या हातात दिला.

“तुम्हाला आत्मविश्वास आहे?”

मेजर बोलला, “नाही.”

माझ्या वयाची तीन मुले तिथे रोज येत असत. ते मिलानचे होते. त्यातील एकजण वकील होणार होता. एकजण चित्रकार आणि एकाचा कल सैनिक होण्याकडे होता. मशिनचे उपचार घेऊन झाल्यावर, कधीकधी आम्ही, स्कालापासून जवळ असलेल्या, कोव्हा नावाच्या रेस्टॉरंटमध्ये जात असू. आम्ही चौघेजण असल्याने, जवळचा रस्ता म्हणून, कम्युनिस्ट लोकांच्या घरावरून जात असू. आम्ही ऑफिसर असल्याने, ते लोक आमचा द्वेष करत असत. आम्ही तिथून जाताना, दारूचा दुकानातून कोणी ओरडे, “गल्लीतले बसक्या आवाजाचे ऑफिसर” अजून एक मुलगा आमच्याबरोबर कधीकधी येई. मग आम्ही पाचजण होत असू. तो काळा रेशमी रुमाल त्याच्या चेहऱ्याभोवती बांधत असे. कारण त्याला तेव्हा नाक नव्हते. त्याचा चेहरा नव्याने तयार करायला हवा होता. तो मिलिट्री शिक्षणसंस्थेतून, सैन्यात गेला होता. युद्धावर गेल्याच्या पहील्याच दिवशी, एका तासात, तो जखमी झाला. तो एका जुन्या वळणाच्या कुटुंबातून आला होता. त्याच्या चेहऱ्याचे पुनरुज्जीवन करताना, त्याना हुबेहूब त्याचे नाक मिळाले नाही. तो दक्षिण अमेरिकेला गेला व एका बँकेत काम करू लागला. पण ही खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. नंतर त्याची काही खबरबात, कळली नाही. आम्ही एवढेच ऐकून होतो, की तिथे नेहमीच युद्धजन्य परिस्थिती असे. पण आम्हाला त्यात पडायचे काही कारण नव्हते.

काळा रुमालवाला मुलगा सोडून, आम्हाला सगळयाना, शौर्यपदके पण सारखी मिळालेली होती. तो मुलगा शौर्यपदके मिळवण्यासाठी, गेली अनेक वर्षे आघाडीवर गेलेलाच नव्हता. उदास चेहऱ्याच्या उंच मुलाला, वकील व्हायचे होते पण तो, आर्दीतीचा (पहिल्या महायुद्धातील, विशेष इटलिअन सैन्य ) लेफ्टनंट झाला. त्याला

तीन पदके मिळाली, तर आम्हाला प्रत्येकी एकेकच मिळाले होते. तो खूप वर्षे जगला. तो थोडा कशाचेही लागते नसणारा असा होता. आम्ही त्याच्या मानाने आयुष्यात तसे, गुंतलेले होतो. आम्ही रोज दुपारी इस्पितळात येत असल्याने, एकत्र होतो. गावामधील अवघड भाग कोव्हां, येथे अंधारात चालत जात असू, तेव्हा दारुच्या दुकानात उजेड असे व संगीत चालू असे. कधीकधी पदपथावर स्त्री पुरुषांची एवढी गर्दी असे, की आम्हाला त्याना ढकलून चालावे लागे. कधीकधी आमची शारीरिक दुर्बलता लक्षात न घेता, लोक आमच्याबद्दल नावड दाखवत, तेव्हा आम्हाला तिथे अडकल्यासारखे होई, कोव्हा हे श्रीमंत, उबदार व मंद उजेडाचे ठिकाण होते, हे आम्ही सर्वजण जाणून होतो. आता दिवसातील काही वेळ, हा भाग गोंगाटाचा व धुरकट असतो. तिथे टेबलांवर मुलींचा वावर असतो व भिंतींवरील कप्प्यांमध्ये चित्रांचे पेपर असतात. कोव्हामधील मुली टोकाच्या देशभक्त होत्या. आणि माझ्या असे लक्षात आले की, इटालीतील सर्वात जास्त देशभक्ती ही कॅफेमधील मुलींमध्येच आढळते -- आणि मला वाटते की त्या अजूनही देशभक्त असतील. मी पदके मिळवण्यासाठी काय केले, असे मला मुले विचारत व पहिल्यांदा ती माझ्याशी, फार नम्रपणे वागत. मी त्याना सुंदर भाषेत लिहिलेले आपलेपणा  जपणारे कागद दाखवले. पण खरे तर, ते विशेषणे वगळून असे होते, की मी अमेरिकन असल्याने, मला ते शौर्यपदक देण्यात आले होते. जरी बाहेरच्या लोकांपेक्षा, मी त्यांचा मित्र होतो, तरी मग त्यांची, माझ्याशी वागायची पद्धत थोडी बदलली. मी त्यांचा मित्र होतो पण शौर्यपदकावर लिहिलेले वाचल्यावर, मी त्यांच्यापैकी नव्हतो. त्यांनी शौर्यपदक मिळवण्यासाठी माझ्यापेक्षा वेगळ्या गोष्टी केल्या होत्या. मी जखमी होतो, हे खरे आहे पण आम्हा सगळयाना माहिती होते, की तो निव्वळ एक अपघात होता. मला रिबिनीची कधीच लाज

वाटली नाही तरी पण, कॉकटेल पार्टीनंतर मी अशी कल्पना करे, की त्यांनी शौर्यपदकासाठी जे केले आहे ते सर्व, मीदेखील केले आहे. नंतर गार वारा खात, बंद दुकाने बघत, रिकाम्या रस्त्याने घरी परतताना, रस्त्यांवरील दिव्यांच्या उजेडात रहाताना, मी स्वतःशी कबूल करे, की मी असे काहीही केलेले नाही. मग मला मरणाची फार भीती वाटे. मी अंथरुणावर एकटा पडून, मरणाच्या भीतीबद्दल विचार करत राही व असा विचार करे, की मी परत युद्धावर जाईन, तेव्हा मी कसा असेन.

शौर्यपदक मिळवलेले आम्ही तिघे, शिकारी ससाण्यासारखे होतो. मी ससाणा नव्हतो पण, ज्यांनी कधीच शिकार केली नाही त्यांच्यासाठी, मी कदाचित ससाणा असेन. आम्हा तिघाना हे जास्त चांगले माहिती होते. त्यामुळे आम्ही अलग पडलो. पण आम्ही त्या पहिल्याच दिवशी जखमी झालेल्या मुलाचे, चांगले मित्र राहिलो. कारण त्याला हे कधीच माहिती झाले नव्हते, की तो आघाडीवर कसे लढला असता. त्यामुळे त्याला कदाचित, कधीच मान मिळणार नाही. तो मला आवडला, कारण मी असा विचार केला, की तो कदाचित ससाणाही ठरला नसता.

उत्तम फेन्सर असलेला मेजर, शूरपणावर विश्वास ठेवत नसे. आम्ही मशीनचे उपचार घेत असतानाचा त्याचा बराचसा वेळ तो, माझ्या व्याकरणाच्या चुका काढण्यात घालवत असे. मी ज्या तऱ्हेने इटालीयन बोलत असे, त्याबद्दल तो माझे कौतुक करे. आम्ही आपापसात सहजतेने बोलत असू. एकदा मी म्हणालो, “माझ्यासाठी इटालीयन इतकी सोपी भाषा आहे, की मी त्यात फार रुची घेत नाही. प्रत्येक गोष्ट बोलायला सोपी असते.” तेव्हा मेजर म्हणाला, “हो. हो. मग तू तुझे व्याकरण का सुधारत नाहीस?” मग आम्ही, व्याकरणाचा उपयोग करायला सुरवात

केली. मग मला इटालीयन भाषा, इतकी कठीण वाटू लागली, की मी बोलायच्या आधी, प्रथम मनात व्याकरणाचा विचार करु लागलो.

मेजर इस्पितळात अगदी नियमितपणे येत असे. एक दिवससुद्धा त्याने कधी चुकवला नाही. तरीही मला खात्री आहे, की त्याचा मशीन्सवर विश्वास नव्हता. असा एक काळ होता, की जेव्हा आमच्यापैकी कोणीच, मशीन्सवर विश्वास ठेवत नसे. एक दिवस मेजर बोलला, की ही सर्व बकवास आहे. मशीन नवी होती आणि ती कशी आहेत, हे आम्ही सिध्द करणार होतो. तो म्हणाला, “ही मूर्खपणाची कल्पना आहे. निव्वळ पुस्तकी कल्पना!” मी तेव्हा व्याकरण शिकलो नव्हतो आणि तो म्हणाला, की मी मूर्ख व अशक्य गावठी आहे. आणि तो माझ्या नादी लागून अजूनच मूर्खपणा करतो आहे. तो एक छोटासा मनुष्य होता व तो त्याच्या खुर्चीत उजवा हात मशिनमध्ये ठेऊन सरळ बसत असे. त्याचा हात व बोटे वरखाली होत असताना, तो सरळ भिंतीकडे बघे.

तो मला विचारी, “जर युध्द संपले, तर तू काय करणार, म्हणजे जर संपले तर? व्याकरणशुध्द बोल.”

“मी अमेरिकन प्रदेशात जाईन.”

“तुझे लग्न झाले आहे का?”

“नाही. पण मला आशा आहे, की ते होईल.”

तो रागावून म्हणाला, “तू फारच मूर्ख आहेस. मनुष्याने लग्न करता कामा नये.”

“का महाशय?”

“मला, महाशय म्हणू नकोस.”

“मनुष्याने का लग्न करू नये?’

तो रागाने ओरडला, “तो लग्न करू शकत नाही. तो लग्न करू शकत नाही. जर तो सर्वस्व गमावणार असेल, तर त्याने तशी परिस्थिती निर्माण करू नये. सर्व काही निसटून जाईल, अशी परिस्थिती निर्माण करू नये. आपल्याकडून काय निसटून जाणार नाही, याचा त्याने विचार करावा.”

तो फार रागाने व कडूपणे बोलला. आणि बोलताना तो सरळ पुढे बघत होता.

“पण कशावरून तो, काही गमावेल?”

भिंतीकडे बघत, मेजर बोलला, “तो गमावेल.” मग खाली मशीनकडे बघत, त्याने स्वतःच्या छोट्या हाताला धक्का दिला. पट्ट्यांमधून हात बाहेर काढून, मांडीवर आपटला. तो जवळजवळ ओरडला, “तो गमावेल, माझ्याशी वाद घालू नकोस.” त्याने मशीन चालवणाऱ्या माणसाला बोलावले. “इथे ये व ही भिकार गोष्ट बंद कर.”

प्रकाशाचे व चोळण्याचे उपचार घेण्यासाठी तो दुसऱ्या खोलीत गेला. मग मी त्याला डॉक्टरांना विचारताना ऐकले की तो फोन करू शकतो का व त्याने स्वतःला खोलीत बंद करून घेतले. मग तो परत बाहेर आला, तेव्हा मी दुसऱ्या मशीनवर बसलो होतो. त्याने अॅप्रन व टोपी घातली होती  तो सरळ माझ्या मशिनकडे आला व माझ्या खांद्यावर हात ठेवला.

त्याच्या चांगल्या हाताने मला खांद्यावर थोपटत, तो म्हणाला, “मला माफ कर. मी इतके ताठ्याने वागायला नको होते. माझी बायको नुकतीच वारली आहे. तू मला क्षमा केली पाहिजेस.”

त्याचा कंटाळा येऊन मी म्हटले, “ओहो, मला माफ कर.”

तो तिथे, त्याचा खालचा ओठ चावत उभा राहून बोलला, “हे फार अवघड आहे. मी त्यातून बाहेर पडू शकत नाही आहे.”

त्याने खिडकीतून, माझ्या आरपार पाहिले. मग तो रडू लागला. “मी खरच, त्यातून बाहेर पडू शकत नाही आहे.” असे म्हणताना त्याचा घसा दाटून आला. मग रडतरडत, डोके वर करून, भकासपणे कुठेच न बघत, सैनिकी बाण्याने, दोन्ही गालांवर अश्रु घेऊन व ओठ चावत, तो सरळ मशीन्सवरून चालत जाऊन, बाहेर पडला.

डॉक्टरानी मला सांगितले की बरीच तरुण असलेली मेजरची बायको, न्यूमोनियाने वारली. पण अपंगत्वामुळे युद्धात न लढण्याचे नक्की होईपर्यंत, त्याने तिच्याशी लग्न केले नव्हते. ती फक्त काही दिवस आजारी होती. कुणालाच, ती जाईल असे वाटले नव्हते. मेजर तीन दिवस इस्पितळात आला नाही. नंतर तो नेहमीच्या वेळी गणवेषाच्या दंडावर, काळी फीत बांधून आला. जेव्हा तो परत आला, तेव्हा भिंतीवर लोकांच्या आधीचा जखमा व नंतर मशीनमुळे बऱ्या झालेल्या जखमा, यांचे मोठे फोटो लावले होते. मेजर वापरायचा त्या मशीनसमोर, आधी त्याच्यासारखा असणारा व नंतर मशीनने पूर्ण बऱ्या झालेल्या हाताचे फोटो, लावलेले होते. मला माहिती नाही की डॉक्टरांना ते कुठे मिळाले. मला नेहमी हे माहिती होते, की मशीन वापरणारे आम्ही पहीले होतो. त्या फोटोंमुळे मेजरला तसा काही फरक पडलेला वाटला नाही. कारण त्याने फक्त खिडकीतून बाहेर पाहिले.

**Dusk**

**by**

**Saki**

# मावळतीची वेळ



झुडुपांमधील उंच वाढलेल्या गवताला पाठ टेकून नॉर्मन गॉर्ट्सबाय, कुंपण घातलेल्या हाइड बागेच्या कोपऱ्यातील, एका बाकावर बसला. त्याच्या उजव्या हाताला, रहदारीची वर्दळ चालू होती.

मार्चच्या सुरवातीच्या दिवसातील, संध्याकाळचे साडेसहा वाजले होते. सर्वत्र हळूहळू, अंधार पडू लागला होता. पण सौम्य चंद्रप्रकाश व रस्त्यावरच्या खूपशा दिव्यांनी, थोडा उजेड पडला होता. रस्त्यावर व कडेच्या पदपथावर, सुनसानपणा भरून राहिला होता. तरीही अर्धवट उजेडात, बाकांवरील व खुर्च्यांवरील दुर्लक्षित आकृत्या, शांतपणे हलत होत्या. सावल्या व अंधुक उजेड यातून ती माणसे, अभावानेच ओळखू येत होती.

त्याच्या आत्ताच्या मनस्थितीत, या दृष्याने गॉट्र्सबायला आनंद झाला. त्याच्या मते मावळतीची वेळ, ही पराभवाची द्योतक होती. लढा देऊन हरलेले स्त्री पुरुष, काळवंडलेली निराशा व अंधारमय भविष्यकाळ लपवत, अशा मावळतीच्या वेळेस, जणू ओळख हरवलेल्या अवस्थेत, पुढे येत होते. त्यांचे गबाळे कपडे, पडलेले खांदे व दुःखी डोळे, याकडे कुणाचे लक्ष जात नव्हते.

पराभूत राजाची नजर नक्कीच विचित्र असते. मनुष्याच्या भग्न हृदयासारखी कडू गोष्ट नाही.

त्या आनंदी बागेत खरे असायला हवेत तसे लोक सोडून, मावळतीच्या वेळी भटकणाऱ्या या लोकांनी, त्यांच्या नजरेत दिसणारा विचित्रपणा, काही मुद्दाम ओढवून घेतलेला नव्हता. ते खिन्नपणे, वटवाघुळासारखे तिथे फिरत होते. झुडुपांबाहेरील कुंपणापलीकडे झगमगता प्रकाश व गर्दीची रहदारी चालू होती. अंधारातून दिसणाऱ्या प्रकाशमान खिडक्यांचा उजेड, येथील अंधाराला छेदून जात होता. त्या बाजूला आयुष्याच्या झगड्यात यशस्वी ठरलेल्या लोकांच्या, आरोळया ऐकू येत होत्या. सुनसान जागी बाकावर बसून, गॉट्र्सबाय काही कल्पनाचित्रे रंगवित होता. स्वतःची गणना, पराभूत माणसांमध्ये करण्याच्या मनस्थितीत, तो आत्ता होता. पैशांविषयीच्या त्रासामुळे, त्याला ताण येत नव्हता. त्याची इच्छा असती, तर तो प्रकाश व गडबड असलेल्या बाजूकडे जाऊ शकला असता. आणि पैशाचे व सुबत्तेचे सुख अनुभवणाऱ्यांमध्ये किंवा त्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांमध्ये, जागा पटकावू शकला असता. पण या क्षणी तो नाराज झालेला होता. त्याचे हृद्य जड झाले होते. तो काही महत्वाकांक्षा बाळगू शकत नव्हता. दिव्यांच्या खांबांच्या उजेडात व अंधारात इतस्तः

बागडणाऱ्या लोकांचे वर्गीकरण करण्यामध्ये त्याला थोड्या आसुरी प्रकारचा आनंद मिळत होता.

बाकावर त्याच्या शेजारी एक पोक्त सभ्य गृहस्थ, बसला होता. त्याच्यातील स्वाभिमान जवळजवळ संपलेला होता. कुणाची व कसलीही अवज्ञा करणे, त्याला शक्य नव्हते. त्याच्या कपड्याना, गबाळेही म्हणता आले नसते. अर्धवट उजेडात ते, निदान समाधानकारक वाटत होते. कुणी अशी कल्पना करू शकला नसता, की त्याने दोन शिलिंग व सहा पेनीची चॉकलेटची पेटी खरेदी केली असेल, किंवा शर्टाच्या काज्यात गुलाबाचे फूल अडकवले असेल.

ज्यावर कोणीच नाच केला नसता, अशा नक्कीच एखाद्या दयनीय वाद्यवृंदातला, तो वाटत होता. ज्याच्या शोकाने कुणीच दुःखी होत नव्हते, असा या जगातील तो शोकाकुल व्यक्ती होता. तो जाण्यासाठी उठला, तेव्हा गॉट्र्सबायने अशी कल्पना केली, की तो अशा घरी चालला आहे, जिथे त्याचा अपमान होतो व कुणीच त्याला भाव देत नाही. किंवा तो अशा एखाद्या गचाळ लॉजमध्ये चालला आहे, जेथील बिल तो भरू शकत नाही. सावल्यांमध्ये त्याची आकृती हळूहळू नाहीशी झाली. त्याची बाकावरील जागा ताबडतोब एका नीटनेटका पोषाख केलेल्या, तरुण माणसाने घेतली.

पण तो आधीच्या माणसापेक्षा, फार आनंदी नव्हता. तिथे बसल्याबसल्या त्याने, जग जणू त्याच्याशी वाईट वागत असल्यासारखे भासवण्यासाठी, रागारागाने मोठ्या आवाजात आरडाओरडा सुरु केला.

गॉट्र्सबाय म्हणाला, “तू फारशा चांगल्या मनस्थितीत दिसत नाहीस.” असे बोलण्याची तो दखल घेईल, अशी अपेक्षा तो करत होता.

तो तरुण मनुष्य त्याच्याकडे वळला व आल्हाददायक मोकळेपणा दाखवत बोलला, “मी ज्या अडचणीत सापडलो आहे, त्यात तू सापडला असतास, तर नक्कीच चांगल्या मनस्थितीत राहीला नसतास. मी माझ्या आयुष्यातील, घोडचूक केली आहे.”

गॉट्र्सबाय भानावर येत दुःखाने म्हणाला, “हो का?”

तरुण माणसाने, त्याचे बोलणे पुढे चालू ठेवले, “बर्कशायरमधील पॅटागोनिअन हॉटेलमध्ये रहाण्यासाठी म्हणून मी आज दुपारी आलो. पण मी तिथे आलो तेव्हा पाहिले, की काही आठवड्यांपूर्वी ते पाडून तिथे एक सिनेमागृह बांधणे चालू झाले आहे. काही अंतरावरील दुसऱ्या एका हॉटेलची शिफारस, टॅक्सीवाल्याने केली. आणि मी तिथे गेलो. नंतर मी माझ्या घरच्या लोकाना या हॉटेलचा पत्ता कळवला. नंतर मी माझ्या बॅगेत टाकायला विसरलेला साबण आणण्यासाठी बाहेर गेलो. मला हॉटेलचा साबण वापरायला आवडत नाही. मग मी इकडेतिकडे थोडा हिंडलो. दुकाने बघत फिरताना, एके ठिकाणी पेय प्यायलो. आणि मग हॉटेलवर परतायला निघालो, तर मला हॉटेलचा पत्ता, नाव काहीच आठवेना. लंडनमध्ये मला कोणी नातेवाईक वा मित्र नसल्याने, माझी चमत्कारिक अवस्था झाली. अर्थात मी घरच्याना तार करून पत्ता मिळवू शकत होतो. पण त्याना अजून माझे पत्र मिळाले नसेल. कदाचित उद्या मिळेल. मी अगदी किरकोळ रक्कम घेऊन हॉटेलबाहेर पडलो होतो. साबण व पेय खरेदी करण्यात ते संपले, त्यामुळे आता माझ्याकडे पैसे नाहीत. तर असा मी, खिशात

फक्त दोन पेनी असलेल्या अवस्थेत, इथे आलो आहे व रात्री काय करावे हा माझ्यासमोर प्रश्नच आहे.”

गोष्ट सांगितल्यावर त्याने, एक मोठा विराम घेतला. नंतर तो तरुण मनुष्य पश्चात्तापदग्ध आवाजात म्हणाला, “मला वाटते, मी तुम्हाला फारच कोड्यात टाकले आहे.”

गॉट्र्सबाय समंजसपणे म्हणाला, “यात अशक्य, असे काही नाही. परदेशच्या राजधानीत, माझ्यावर एकदा असाच प्रसंग आल्याचे आठवते. आणि तेव्हा आम्ही दोघे होतो. त्यामुळे ती बाब जास्त उल्लेखनीय झाली. नशिबाने आम्हाला एवढे आठवले की आमचे हॉटेल कालव्याशेजारी होते. मग कालव्याजवळ आल्यावर आम्हाला आमचे हॉटेल सापडले.”

त्या जुन्या आठवणीमुळे उद्दीपित होऊन तो तरुण म्हणाला, “परदेशात असे झाले, तर इतके काही नाही, कारण माणूस तेथील कचेरीत जाऊन मदत मागू शकतो. पण इथे स्वतःच्याच देशात, तुम्ही अशा गोंधळात सापडलात, तर तुम्ही उपहासाचा विषय होऊ शकता. माझी गोष्ट ऐकून कोणी चांगल्या माणसाने, मला थोडे पैसे दिले, तर मी कशीबशी रात्र काढू शकेन. तसेही माझी गोष्ट अशक्यप्राय कोटीतील असल्याचे, तुम्हाला वाटत नाही, म्हणून मी आनंदी झालो आहे.”

शेवटचा शेरा असा अदबशीरपणे मारून, गॉट्र्सबाय उमदेपणा दाखवेल अशी आशा, कदाचित त्याला वाटली असावी.

गॉट्र्सबाय सावकाशीने बोलला, “तुझ्या गोष्टीतील कच्चा दुवा असा आहे, की तू साबण दाखवू शकत नाहीस.”

तरुण मनुष्याने घाईघाईने, त्याच्या कोटाचे खिसे चाचपून बघितले. मग तो उडी मारत उभा राहिला.

तो रागाने पुटपुटला, “माझ्या हातून तो, हरवलेला दिसतो आहे.”

गॉट्र्सबाय पुढे बोलला, “एकाच दुपारी हॉटेल व साबण दोन्ही हरवणे, हे निष्काळजीपणे, हेतुपुरस्सर केल्याचे सुचवित आहे.” पण त्याचे बोलणे पुरते ऐकून घेण्यापूर्वीच, तो तरुण मनुष्य चालता झाला. त्याचे डोके ताठ ठेऊन, बहुधा केवळ कंटाळून मौजेखातर केलेल्या या प्रकारानंतर, तो धूम ठोकून, नाहीसा झाला.

मनन करत गॉट्र्सबाय स्वतःशीच बोलला, “हे दयनीय आहे. स्वतःचा साबण दाखवणे हा या गोष्टीतला, खात्री पटवणारा दुवा होता आणि तरीही ज्याने तो दुःखी झाला, असा हा फक्त थोडासा उल्लेख होता, दुकानातून नीट कागदात व्यवस्थित गुंडाळलेला साबण पेश करण्याइतकी हुशारी दाखवण्याचा चाणाक्षपणा जर, त्याने दाखवला असता, तर तो त्या बाबतीतील बुद्धिमान ठरला असता. त्यासाठी खूप काळजीपूर्वक बेत आखावा लागतो.”

असा विचार करत गॉट्र्सबाय, जाण्यासाठी उठला. झालेल्या प्रकारावर, तो काही ताशेरे ओढत राहीला. बाकाच्या शेजारी एका लंबवर्तुळाकार कागदात व्यवस्थित गुंडाळलेली, दुकानातून आत्ताच आणलेली वाटणारी, अशी काही वस्तू पडली होती. तो नक्की साबणच होता. जेव्हा तो तरुण माणूस उभा राहीला तेव्हा, नक्कीच त्याच्या कोटाच्या खिशातून तो साबण पडला होता. दुसऱ्याच क्षणी गॉट्र्सबाय अंधाऱ्या रस्त्याने, हलकासा कोट घातलेल्या तरुणाची आकृती दिसते का, हे उत्सुकतेने बघत चालला होता. तो जवळजवळ त्याचा शोध सोडून द्यायच्या विचारात होता,

तेव्हा त्याने त्या तरुणाला संभ्रमित अवस्थेत, गाडीच्या डब्याच्या कडेला उभे असलेले पाहिले. बागेत शिरून पहावे, की पुलाच्या कोलाहलात मिसळून जावे, हे त्याला कळत नव्हते. बचावात्मक रागाने, तो गरकन वळला आणि गॉट्र्सबायच्या समोर उभा ठाकला. साबण हातात धरत, गॉट्र्सबाय त्याला म्हणाला, “तुझ्या गोष्टीतील महत्वाचा खरेपणाचा पुरावा, सापडला आहे. जेव्हा तू बाकावर बसलास, तेव्हा तुझ्या कोटाच्या खिशातून तो पडला असावा. तू गेल्यावर मला, तो तिथे जमिनीवर पडलेला दिसला. मी तुझ्यावर अविश्वास दाखवला, त्याबद्दल मला माफ कर. पण तू खोटारडा असल्यासारखेच, तेव्हा सर्व काही वाटत होते. पण आता हा पुरावा सापडल्याने, तुला निर्दोषी म्हटले पाहिजे. तर मग तुला कदाचित उपयोगी पडेल, असे हे एक पौंडाचे नाणे -- “

सर्व संशय दूर झाल्याने, त्या तरुण माणसाने घाईघाईने, ते नाणे खिशात टाकले.

गॉट्र्सबायने बोलणे चालू ठेवले, “आणि हे माझा पत्ता असलेले कार्ड. माझे पैसे येत्या आठवड्यात केव्हाही परत केलेस तरी चालेल. हा साबण घे व परत हरवू नकोस. त्याने तुझ्या उत्तम मित्राचे काम, केले आहे.”

“तुम्हाला हा साबण सापडला, हे सुदैवच म्हणायला हवे. स्वरात थोडी अजिजी आणून, आभाराचे एकदोन शब्द बोलत, तो पुलाच्या दिशेने नाहीसा झाला.

गॉट्र्सबाय स्वतःशीच बोलला, “गरीब बिचारा, तो जवळजवळ मोडूनच पडला होता. खूप कठीण परिस्थितीतून बाहेर पडल्याचा, टोकाचा सुटकेचा भाव त्याला जाणवला असेल, याबद्दल मला खात्री आहे.” जिथे हे नाट्य घडले, त्या बाकावरून

गॉट्र्सबाय परत चाललेला असताना त्याने, मगाचच्या पोक्त सभ्य गृहस्थाला त्या बाकाखाली व कडेने काहीतरी शोधताना पाहिले. गॉट्र्सबायने त्याला विचारले, "सर, तुमचे काही हरवले आहे का?"

"हो सर, एक साबण."

"एखाद्याची परिस्थिती जोखण्यात, मी फार चांगला आहे, असे माझे स्वतःबद्दलचे मत मी न बनवणे बरे, असा धडा मला यातून मिळाला आहे."

# Nap

# by

# Walter De La Mare

# डुलकी



हिवाळ्यातील दुपार चोरपावलांनी रात्रीकडे सरकत होती. आता सकाळच्या पावसानंतर सूर्य विरळ ढगांआडून मिस्टर थ्रिप्प यांच्या उपनगरातील घराच्या स्लेटच्या छपरावर व धुराड्यावर मंदसा उजेड पाडत होता. सबंध युरोपभर व इंग्लंडभर शनिवार असल्यामुळे, मानवांचे अगणित मोठमोठे समूह रस्त्यावर उतरले होते. विरळ वस्तीच्या ऑस्ट्रेलियात ते थोडेफार सुरु झाले. आणि अटलांटिकमधून वहात, विशाल अमेरिकेत दाखल झाले. सूर्यप्रकाशित जूनमधील पाइनच्या जंगलातील वारूळ बनवणाऱ्या मुंग्यांच्या गर्दीसारखे ते वाटत होते. ख्रिश्चन जग आठवड्यातील अर्ध्या सुट्टीची वाट बघत होते. मिस्टर थ्रिप्पही त्यात सामील झाले होते.

स्वयंपाकघरातील शेगडीच्या वरील जागेत दोन घड्याळे विराजमान झालेली होती. त्यातील एक, लाकडी डागाळलेल्या केसमधील, जुन्या जमान्यातील, भिंगाला डोळा लाऊन बघायच्या चित्रमालिकेसारखे आनंदी, व पुढील काचेवर लाल व निळी फुले असलेले होते, तर दुसऱ्यात "गजर" – होता. तो टीनचा बनवला असला तरी, त्याचा आवाज व दिसणे ब्रासचा बनवल्यासारखेच होते. त्यावर कडी म्हणून की काय, पण एक दुर्लक्षित रागीट राजा एडवर्ड सातवा, कोरड्या कठोर चेहऱ्याने, एका ख्रिसमसचा छापलेल्या चित्रात रोखून बघताना दिसत होता. त्याच्या छातीवर त्याचा राजघराण्यातील हुद्दा लिहिलेला होता.

मिस्टर थ्रिप्प यांच्या स्वयंपाकघरातील टेबल उरलेल्या जेवणाने पसरलेले होते. आठवडाभर चोख सेवा बजावलेल्या टेबलाच्या आच्छादनावर हा पसारा पडलेला होता. त्यांची मुलगी मिली हिच्या नंतर पाच मिनिटांनी, पावणेदोन वाजता, मिस्टर थ्रिप्प कार्यालयातून घरी आले होते. मिली व मिसेस थ्रिप्प यांनी आधीच जेवण सुरु केले होते. चार्ली थ्रिप्प एक तासापूर्वी थोडा वेळ आला होता. आणि जेम्स -- जो कधीच जिम किंवा जिमी झाला नाही -- नंतर लगेचच आला. प्रत्येकाला त्याच्या वाटणीचे जेवण मिळून ते तृप्त झाले.

घाईघाईचे जेवण आता संपले. त्यांच्या साखळीच्या घड्याळाच्या हाताने, शर्टाच्या बाह्या सरसावून मिस्टर थ्रिप्प, त्यांचे भांडी धुण्याचे काम आटपून, घराच्या मागील बाजूस असलेल्या खोलीतून, रिकामा ट्रे घेऊन आले. ते जोराने श्वासोच्छ्वास करत होते. कधीकधी ते कबूल करत त्याप्रमाणे, अलीकडे त्याना दम लागे. बाहू स्नायुंनी फुगलेले असे ते, बेली बेली कंपनीच्या कार्यालयातील बैठे काम करणारे, लेजर कारकून होते. फुगीर पापण्यांनी अर्धवट झाकले गेलेले त्यांचे बारीक डोळे, तेजस्वी व

निळेशार होते. गोल डोक्यावर बारीक केलेले केस होते. मूर्ख भासणारे ओठ होते. शनिवारी संध्याकाळी सुद्धा त्यांची ओघळलेली हनुवटी, आत्ताच दाढी केल्यासारखी दिसे.

शनिवारी दुपारी मिस्टर ग्रिप्प खुश असत. जरी ते हे कबूल करत नसत, (कारण हे ऐकून टिल्डा रागावे.) तरी त्याना घरकामात आनंद मिळे. चहाच्या दुकानातील वेट्रेसची नक्कल करायलाही त्याना आवडे. जेवायची ताटे व डिश जणू काही न मोडणारे व कायम टिकणारे असल्याप्रमाणे, ते बडवत असत. जेव्हा ते एकटे भांडी धुवायच्या सिंकशी उभे असत तेव्हा, पूर्ण वाढ झालेल्या घोडीसारखे खिंकाळत असत. ते परत एकदा खरकट्या भांड्यांनी भरलेला ट्रे घेऊन सिंककडे आले.

ते भांडी कोरड्या करणाऱ्या त्यांच्या बायकोला म्हणाले, “टिल्डा, तू जा. जिच्यामुळे तुला चीड येते, ती मिसेस ब्राऊन एकसारखी दार वाजवते आहे” मिसेस ग्रिप्प चिडली होती, त्यापेक्षा अजूनच चिडलेली दिसली. तिचा चेहरा व हनुवटी टोकेरी झाली होती. डोळे काळेकुट्ट झाले होते व केस सरळ गडद दिसत होते. लांब ओल्या बोटांनी तिने कपाळावर आलेली बट बाजूला सारली.

ती उत्तरली, “मला काय खटकते, तर तू स्वतः थोडासुद्धा आनंद घेत नाहीस. हे आमच्यासाठी बरोबर नाही. मी सकाळ दुपार संध्याकाळ, राबत असते. आहे हे असे आहे. पण इतर नवरे, त्यातून बाहेर पडतात. मग तू का नाही? तिला दार वाजवत बसू दे. तिचे असे आहे, की तिच्याकडे फुकट घालवायला, भरपूर पैसा आहे. मला कळत नाही, की तिच्या नवीन, नखरेल ड्रेसमध्ये तू जास्त लक्ष का घालतोस?

'तिला एवढी नावे ठेवतेस, मग तू तिच्याबरोबर जातेस तरी का?' असे शब्द मिस्टर थ्रिप्पच्या मनात आले होते. 'तू खूप काम केले आहेस, तर मग आता मी तुला, जायला सांगतो आहे ना? अग बाई, थोडी तरी तर्कबुद्धी वापर.' पण तो काही बोलला नाही. त्याऐवजी बेफिकीरीने मित्रत्वाच्या आवाजात म्हणाला, "ते सर्व ठीक आहे. टिल्डा, तू जा. मी हे सगळे आवरतो. तू काळजी करू नकोस. मी माझ्या पद्धतीने आनंद घेत, हे निपटतो. तू कधी स्वार्थी माणसांबद्दल ऐकले नाहीस का? मी तसा आहे."

त्याची बायको रागावल्याचा आव आणत म्हणाली, "मला सर्व ठाऊक आहे. पुरे झाला शहाणपणा. टोमणे मारायची काही गरज नाही. डिश धुताना काळजी घ्या. मी या घरातील नाहीच. मी तर शेजारच्या घरची आहे! मिसेस ब्राऊनने मला पॅनकेक दिला. त्यापेक्षा, वेड्यावाकड्या आकाराचा चामड्याचा तुकडा परवडला. मला वाटते एकदा ती मुख्य खानसामा म्हणून, नोकरी करत होती, ते नुसते दाखवायला. पण त्यात काही दम नाही."

मिस्टर थ्रिप्प मनातल्या मनात म्हणाले, 'मला विचाराल तर, माझा ताशेरा असा असेल, की 'ती म्हातारडी, दुखावणारी व खोड्या काढणारी आहे' वरवर ते शांतपणे म्हणाले, "हो, टिल्डा, ती ठीक म्हणते आहे. तू काळजी करू नकोस. तू जा. शनिवार म्हणजे कठीण वार असतो. पण तू परत येशील, तेव्हा तुला काहीही पसारा दिसणार नाही." जणू काही बळजबरी केल्याप्रमाणे, नापसंती दर्शवत तिने मान उडवली. तिने चहाचे फडके खुर्चीवर वाळत टाकले व आनंदाने निघून गेली.

मिस्टर थ्रिप्पनी परत, गरम पाण्याचा नळ सोडला व शिट्टी वाजवू लागले. गरम पाण्याचा चैनीत वापर -- या गोष्टीवर, त्यांचा भर होता. ते काही संगीतज्ञ नव्हते. ते जी धून शोधत होते, ती फक्त त्यांनाच माहिती होती. पण त्यामुळे जोरात कवायत करत चालणाऱ्या सैनिकासारखा, त्याना काम निपटायला जोर मिळाला व त्यांनी काम वेळेपूर्वीच संपवले. त्यामुळे त्यांच्या अंगात, सट्टा लावल्यासारखा जोम आला. जितके त्याना ते काम करायला आवडत नसे, तितके जास्त जोरात ते शिट्टी वाजवत. लहान मुलगा असताना त्याना अंधाराच्या भीतीचे आव्हान मिळाले होते. तेव्हा ते स्वतःला म्हणत, “चालत रहा. पचका होऊ देऊ नको. ते चांगले नाही.”

त्याच वेळेस त्यांचा मोठा मुलगा, जेम्स भांडी धुण्याच्या खोलीच्या दारात अवतीर्ण झाला. तो त्याच्या आईच्या वळणावर गेला होता. त्याचा निळा लोकरी सूट, फिकट तपकिरी रंगाचे बूट, फिकट जांभळे मोजे व ठिपक्यांचा टाय घालून, तो दाखवून देत होता की उत्तम कपडे माणसाला कसा उठाव आणतात. त्याच्या ओठात सिगरेट होती. त्याचे डोके लंबवर्तुळाकार व चपटे होते. त्याच्या डोळयात, रिकामपणाची ओलसर छटा होती. दारापलीकडील दमट वाफेत त्याने त्याचा चेहरा इंच, दोन इंच वळवला.

तो म्हणाला, “ठीक आहे डॅड, मी चाललो.”

त्याच्या वडीलांनी विचार केला, “अरे बापरे, तू फक्त ती भिकार गोष्ट सोडून द्यायला हवीस. धूर, धूर, धूर, सकाळपासून रात्रीपर्यंत. आणि अशा केकच्या आयसिंगसारख्या दिसणाऱ्या तुझ्यात व तुझ्या नखरेल, चढेल वागण्यात, मुली बघतात तरी काय ते मला कळत नाही.” असा विचार करत, ते प्रत्यक्षात बोलले,

"माझ्या मुला, छान. मी तुला मला मदत करण्यासाठी विचारणार नाही. मी ते सर्व काही सावकाशीने करेन. आज दुपारी तुझा कुठे दौरा आहे?"

"ओहो, इयव्हीच्या लोकांबरोबर चहा. तिथे फारसे उत्साहवर्धक असे काही नसणार." जेम्स तुच्छ भावाने बोलला.

"पण मला वाटते, हा कार्यक्रम काही संध्याकाळभर नसेल." धुतलेली प्लेट जागेवर ठेवत वडील बोलले.

"ओहो, मी सांगू इच्छितो की, आम्ही रीवोकडे जाऊ किंवा काहीतरी करू." त्याचे सिगरेटचे शेवटचे थोटूक त्याने सिंकमध्ये टाकले. पण वडीलांच्या विरोध दर्शवणाऱ्या चेहऱ्याकडे त्याचे लक्ष गेले नाही. मिस्टर थ्रिप्पनी ते चिमट्याने उचलून, त्यासाठी असलेल्या योग्य जागी टाकले. जेम्सने दुसरी सिगरेट पेटवली.

त्याचे वडील म्हणाले, "इतका वेळ इथे उभे राहून, तुझा रविवारच्या सभेला जायचा ड्रेस वाफेने खराब करू नकोस. आणि तसेही, जेम्स, तू माझे सुतारकीचे छोटेसे काम केल्याबद्दल, मी तुला पाच शिलिंग देणे लागतो. ते हॉलमधील कपाटात असतील."

"ओहो डॅड, मी आभारी आहे. मला वाटले, सहा शिलिंग. पण ठीक आहे."

वडीलांनी मुलाकडे एक कटाक्ष टाकला -- जळजळीत कटाक्ष -- "अस्स. मग सहा घे. मग तर झाले?" ते बोलले.

जेम्स डौलदारपणे म्हणाला, "एवढे काही नाही. डॅड, चिडू नका. तुम्ही जास्त, करत आहात."

मिस्टर थ्रिप्प परत त्यांच्या कामाकडे वळले. भावनांची असामान्य मिसळण करून ते विचार करत होते जसे काही ते फक्त मिस्टर थ्रिप्प नसून अनेकजण आहेत.

हे कमी की काय म्हणून, त्याची शिट्टी नव्याने वाजू लागली. जणू काही नळातून जोरात पडणाऱ्या पाण्याच्या आवाजाशी, ती स्पर्धा करत होती. धुतलेली शेवटची भांडी ट्रेमध्ये पालथी घालून, मग त्यानी ती भांडी स्वयंपाक घरातील ओट्यावर व कपाटात ठेवली. सिंकची जाळी साफ केली. सिंक व त्याजवळील तडा गेलेली फरशी साफ केली. फडके वाळत टाकले. हात धुतले व स्वयंपाकघरात आले.

मिली त्या आठवड्यात शिंप्याने शिवलेल्या छान रंग टिकलेल्या कपड्यात स्वयंपाकघराच्या थोड्याशा फुटलेल्या फरशीवर उभे राहून, आरशात स्वतःला बघत होती. ती अशक्त व बारीक होती. मध्यभागी भांग पाडलेले तिचे मऊ सोनेरी केस, तिच्या देवदूतासारख्या चेहऱ्याभोवती असे पसरले होते, की जणू काही मध्ययुगीन फ्रान्समधील शिल्पाचा नमुनाच आहे. तिने जे काही साधे लहानसे कपडे घातले होते, ते फ्लॅनेलच्या निळया छान गाउनसारखे दिसत होते. तिने तिचा टोपी घातलेला, निमुळता सुंदर चेहरा वळवून वडीलांकडे पाहिले. ती प्रत्येक मनुष्यप्राण्याकडे असेच बघे. दुकानातील शोकेसमधील तिच्या प्रतिबिंबाकडे व काचेमागील फुलाकडेही. तिने तिचे सर्व आयुष्य नाजूकपणे, तिच्या प्रेरणांना अनुसरून आणि शब्दातीतपणे, तिच्या चाहत्यांबरोबर फिरण्यात घालवले. जरी ते खूप दिवस तिच्या पदरी टिकत नसले तरी, श्वेतराणीला जेवढे नोकर असतील, तेवढी तरूण मुले तिचे चाहते होते.

तिचे वडील विचार करत होते, 'अग माझ्या मुली, आरशात बघून तुझे नखरे चालले आहेत, ते ठीक आहे. पण पुढचा दृष्टीने तू आईला थोडी मदत केलीस व थोडे पैसे मिळवलेस, तर जास्त बरे होईल. विचार करायला शीक.' हे सगळे मनात, पण प्रत्यक्ष ते असे म्हणाले, "मिली, मी खरे तर तुझ्यासारखी छान दिसणारी मुलगी,

अजून पाहिली नाही. प्रिय मिली, काय ग, या दुपारी हा तारुण्याचा चमचमता अंगार कुठून आला?” अविश्वासाने त्यांनी तिचे अभिनंदन केले.

“चमचमता अंगार! डॅड, तुम्ही काही बोलता. मला काहीच माहिती नाही. डॅड, चमचमता अंगार कसला आला आहे! जलतरंगाचे सूर मखमलीने झाकावेत तसा मिलीचा आवाज खूप खाली गेला. ती तिचे हलणारे तोंड, काचेच्या पेल्यात बघत बोलली, “मी खास कुणाबद्दल असा विचार करत नव्हते. पण मी निली गीब्सला वचन दिले आहे. पण मी एक गोष्ट सांगते की मी आजच्यासारखी दिवसा एवढा वेळ बाहेर रहाणार नाही.”

मिस्टर थ्रिप्पनी चौकशी केली, “आजच्या दिवसाचे एवढे काय मोठेसे?”

“काय मोठेसे? का? इकडे बघा तर खरे! हा दिवसाचा घाणेरडा भाग आहे.” तिच्या सुंदर वळणदार ओठांमधून सॅटीनवरील मोत्यासारखे शब्द घरंगळले. तिच्या डोळयांच्या कोपऱ्यात कृतककोप दिसत होता.

तिच्या वडीलांनी घाईघाईने विचारले, “आपल्याकडे लांब रेनकोट नाही का?”

“रेनकोट! याच्यावर! ओहो, ते एखाद्या पुरुषासारखे दिसेल. मला योग्य असे दिसले पाहिजे.” पाणी पिण्याच्या तळयात कचरा पडलेला बघून एखादा काळवीट दचकावा तसे ती वडिलांकडे बघत राहिली.

तिच्या वडिलांमधील तो खालीवर होणारा आवाज पुन्हा एकदा बाहेर पडला. ‘अस बघ माझ्या मुली, तू एका प्रामाणिक माणसाची मुलगी आहेस. वेड्यावाकड्या व भुलवून जाळयात पकडणाऱ्या गोष्टींवर अर्धी पेनीसुद्धा खर्च करणे म्हणजे मूर्खपणा आहे. अशा तऱ्हेने तुला चांगला नवरा मिळणार नाही.’ मिस्टर थ्रिप्पनी परत हा विचार सोडून दिला व त्यांच्या निळया डोळयांनी मुलीकडे बघून हसत, ते म्हणाले,

“माझ्या आवडत्या मुली, मला विचार की मी तुला काय समजतो. मी तुला छान, समजूतदार व अगदी सरळसाधी तरुण महिला समजतो. कळले का? तू काही काळजी करू नकोस. मी म्हणतो, अगदी उत्तम असेल त्याचीच निवड कर. (अगदी मनाच्या गाभ्यातील उत्तम) आणि अजून एक चालून आलेले चांगले स्थळ जाऊ दे.

त्यांनी शेवटचा चमचा धुऊन, टेबलाच्या खणात टाकला टेबलाचे आच्छादन घडी करून ठेवले.

मिली म्हणाली, “ओहो डॅड, तुम्ही काहीही बोलता. तुम्ही नेहमी माझ्यासाठी लग्नाच्या मुलांचाच विचार करता. जसे काही त्यामुळे मोठा बदल घडून येणार आहे.” खोलीभर नजर टाकत ती बोलली, “मला कळत नाही, की आपले टेबलाचे आच्छादन कधी स्वच्छ का नसते? एखाद्या मैत्रिणीला घरी बोलावले तर काय असल्या टेबलावर बसून तिने खायचे का?”

मिस्टर ग्रिप्पच्या मनामध्ये, नवीन प्रकारचे विचार अंधुकपणे डोकावले. ते एक मिनिट थांबले व टेबलाच्या मातकट आच्छादनाला एक झटका दिला. त्याच्या तीन मुलांपैकी एकानेही गेल्या तेवीस वर्षात, शिक्षा म्हणून सुद्धा ते आच्छादन कधी साफ करण्यासाठी काढले नव्हते. ते त्यांनी त्यांच्या मनाई केलेल्या उजव्या हाताने बराच वेळ झाडले. मग वळून त्यांनी शेगडीतील विस्तवाकडे पाहीले. आणि विचार केला, ‘मी म्हटले काय तर फक्त गुडीगुडी.’

त्यांचे शस्त्र घेऊन, ते म्हणाले, “मी आईला ते ऐकू देणार नाही. प्रिय मुली, अजिबात ऐकू देणार नाही. आपण आपले गुपित राखून ठेऊ. आणि वेळ बघून मग ते सांगायचे. तू मिस्टर राईटना घरी आणलेस तर त्याना फक्त टेबलाचे स्वच्छ

आच्छादनच दिसणार नाही तर, त्यावर बसून काही चटपटीत खायलाही मिळेल. आणि हॉलमध्ये शेकोटीची उबही मिळेल.”

स्वतःचा चेहरा वडीलांना पापा घेण्यासाठी पुढे करत तिच्या मेकप पेटीतील पावडरचे फुल कधीही तिच्या छोट्याशा नाकाच्या शेंड्यावर आघात करेल या पूर्ण विश्वासाने, मिली म्हणाली, “डॅड, तुम्ही किती चांगले आहात. पण मी कशाबद्दल विचार करू शकते, असा विचार तुम्ही केलात यावर माझा विश्वास बसत नाही आहे.”

मिस्टर थ्रिप्प बोलले, “अच्छा, लाडके. जरा थांब. मला जाऊन तोंड धुतले पाहिजे.”

तिचे वडील तिच्यामागे पॅसेजमध्ये येत असताना, मिली किंचाळली, “अच्छा, मी जाते.”

कुणी चौकस जाणारे येणारे लोक बघतील, म्हणून त्यांनी त्यांच्या शर्टाचे हात नीट करत, पुढचे दार उघडले.

घरात परतून त्यांनी लगेच त्यांचा जिना उतरत असलेल्या धाकट्या मुलाला, चार्लीला, हटकले. खरे तर तो पंधरा चार्लींसारखा जिन्याच्या पायऱ्या इतक्या दणादण उतरत होता, की प्रत्येक दणक्याबरोबर, सबंध घर पायावर डुचमळत आहे की काय असे वाटत होते. त्यामुळे वडिलांना खूप त्रास होत होता.

ते ओरडले, “काय रे मुला, मॅचला चाललास का? एक दिवस तू नक्की स्वतः खेळायला लागशील. नुसती मॅच बघण्यापेक्षा त्यात खेळलेले बरे!”

फुटबॉलच्या मोसमात, दर शनिवारी, मिस्टर थ्रिप्प अशी आग्रही आशादायक विधाने करत असत.

चार्लीची त्याला काही हरकत नव्हती. अजिबात नव्हती.

चांगला विनोद करून त्याने वडिलाना आश्वस्त केले, "डॅड, मी नाही. मी लवकरच एखाद्या खेळाडूला जखमी करण्यासाठी पोलिसाला पैसे देणार आहे. तुम्ही मला बहुधा पैसे देऊ शकणार नाही."

"तुला काय द्यायचे?"

"मला काही पैसे उसने द्यायचे."

मिस्टर थ्रिप्पचा आतला आवाज ओरडला, 'हे चांगले आहे. मला एक मिनिटाचीही विश्रांती नको का?' पण ते विचार करणे, फुकट गेले. त्याऐवजी त्यांचा मासल हात त्यांच्या घट्ट पँटच्या खिशात घालत, ते म्हणाले, "माझ्या मुला, तुझे बरोबर आहे." त्यांनी खिशातून मूठभर नाणी काढली. ते पुढे म्हणाले, "ही सर्व घे आणि हे जास्तीचे सहा पेन्स"

"मी फक्त एवढेच सांगतो आहे, चार्ली, जेव्हा उसने द्या असे म्हणायची संधी नसते. तेव्हा फक्त द्या असे म्हणणे बरे, मला तुला काही शिकवायचे नाही पण नेहमी माझा असा नियम आहे व तो मी शक्यतोवर आजपर्यंत पाळत आलो आहे."

चार्लीने नाणी हातात घेऊन मोजली व वडीलांकडे बघितले. तो मैत्रीपूर्णतेने उदास झाला. त्याला त्याचे वडील थोडे विनोदी वाटले. गोष्टी जशा आहेत त्यापासून, ते कशामुळे का होईना, पण फार लांब असलेले वाटले. ते तसे फार जुन्या वळणाचे नव्हते. जसा तांब्या हा तांब्या असतो तसे ते त्याचे वडील होते. चार्लीला त्यांचा लळा होता. त्याला त्यांच्याबरोबर रहायचे असे. लहान असताना त्यांच्याबरोबर तो बागेत जात असे, ते त्याला आठवले. ते पद्धतशीर व काळजी घेणारे असले तरीपण त्यांनी सारखा उपदेश करू नये असे त्याला वाटले.

तो म्हणाला, “वा डॅडी, मला तुमचा अभिमान वाटतो. रेस्टॉरंटमध्ये जेवण घेऊन उरलेल्या पैशातून मी तुम्हाला क्युबन सिगरेटचे पाकीट आणीन. आणि आता मी निघतो. अच्छा डॅड” तो जाण्यासाठी वळला व म्हणाला, “मला अशी आशा आहे की मी लवकरच खूप पैसे मिळवू लागेन. मग मला तुमच्याकडे काही मागावे लागणार नाही.”

मिस्टर थ्रिप्पच्या छोट्या जिवंत डोळयांमध्ये उत्कंठावर्धक चमक आली. त्यांच्या फुगीर गालांवर ती सांडू लागली. गाल थोडेसे रंग उडाल्यासारखेही दिसू लागले.

ते हळू आवाजात म्हणाले, “अरे बाळा चार्ली, तुला जर काही उपयोग होत असेल तर मी तुला माझ्या अंगावरचे कातडेही देईन. ठीक आहे. जास्त ताणून धरु नकोस. पण तुझे काय ते चालू ठेव. मौजमजा प्रदूषित हवेसारखी गिळणाऱ्या तरुणांना मी सहन करू शकत नाही. पण आपले कुटुंब असे नाही, याबद्दल मी देवाचे आभार मानतो.” चांगल्या विनोदी कुरूप माकडासारखे तोंड करत चार्ली म्हणाला, “मी तसला नाही.” व त्याच्या सॉसरच्या मॅचसाठी चालू पडला.

त्याचा पदरव ऐकू येईनासा झाला तोच -- मिस्टर थ्रिप्प पॅसेजमध्ये होते, जसे काही त्याचा पदरव ऐकू येईपर्यंत ते थांबले होते -- जेव्हा दारावर हलकी, गुप्त भासणारी थाप पडली. त्या आवाजाने, त्यांचा गुबगुबीत आनंदी चेहरा मलूल होऊन काळा पडला.

“ओहो, तू आहेस होय? एखाद्या रोगिष्ट जनावरासारखा तो विचार त्यांच्या मनात येऊन गेला. खरच मिस्टर थ्रिप्प स्त्रियांवर प्रेम करणारे नव्हते. त्याना त्यांची भीती किंवा द्वेष वाटे. त्यांच्या टिपेतील आवाजावर त्यामुळे परिणाम होई. मिस्टर

थ्रिप्पच्या मताने तो काटा होता. त्याना वाटे की यापेक्षा दुसरे काही विचार करणे परवडले.

कोणताही शहाणा मनुष्य असे म्हणेल की जास्त कर भरायला लागला तर, त्याने त्यावर काही हालचाल केली पाहिजे.

मोजे घातलेल्या हातांनी पुन्हा टकटक केले. मिस्टर थ्रिप्प चोरपावलांनी परत स्वयंपाकघरात चालत गेले. त्यांचा कोट घातला व दार उघडले.

ते म्हणाले, “ओहो, मिसेस ब्राऊन, तुम्ही आहात होय? टिल्डा वर तयार होते आहे. एका मिनिटात ती येईलच. तुम्ही बसा,” मिसेस ब्राऊनच्या गालावरील गुलाबी पावडरचा थर, ओठांवरील लिपस्टिक व पापण्यांवरील काळया रंगाच्या खोट्या पापण्या, किती इंच जाड आहेत, हे सर्व त्याना मध्यंतरीच्या काळात जाणवत होते. तिने उत्तरादाखल हसून पाहिले तेव्हा, त्या खोट्या पापण्या, हलकासा धक्का बसून गालावर पडल्या. शरीर सजवण्याच्या बाबतीत ती मिलीपेक्षा खूपच सराईत होती. ती खरे तर आता तरुण नव्हती. पण अजून पुरुषांना आकर्षित करणाऱ्या तारुण्याच्या नशेच्या शक्तीची जाणीव, तिच्यात जागी होती. पण आता त्याला मर्यादा होत्या. मिस्टर थ्रिप्प जणू तिच्या कक्षेबाहेरील परग्रह असल्यासारखे थंडीत लांब जाऊन उभे राहिले.

मिसेस ब्राऊन बसेपर्यंत ते हॉलच्या दारात क्षणभर थांबले. ते तिचा फ्रेंच रुमाल, नवीन टोपी, भपकेबाज उंच टाचांचे बूट, बघत होते. पण जेव्हा त्यांना स्वतःच्या टोपीच्या सुंदर कडांकडे ती तिरप्या डोळयांनी बघत असल्याचे लक्षात आले, तेव्हा त्यांच्या पापण्या जड होऊन खाली झुकल्या.

ताबडतोब त्यांनी शेरा मारला, “पावसानंतरची छान दुपार आहे. मला वाटते, तुम्ही सिनेमाला चालला आहात? मला या दिवसात बाहेर जायला व घरात बसायला, दोन्हीही आवडते. पण बाहेरील धुरकट भुरकट अंधारी जागा मला नकोशा वाटतात.”

मिसेस ब्राऊन कुजबुजत्या आवाजापेक्षा जास्त मोठा आवाज क्वचितच चढवे. खरेच असे वाटत होते की बोलण्याचे श्रम सुद्धा तिला जास्त होतील. तिने तिचा चेहरा बाजूला वळवला व गालीच्याकडे पाहिले. “मिस्टर ग्रिप्प, मला तर अंधारात मजा येते. त्यामुळे डोळयांना विश्रांति मिळते.” नजर वर करत, ती बोलली.

क्षणभरासाठी मिस्टर ग्रिप्पना मिली आठवली. पण ते काही बोलले नाहीत.

जिन्यातून ओरडून, ते म्हणाले, “टिल्डा, इथे मिसेस ब्राऊन आल्या आहेत." त्या आवाजावरून असे वाटत होते की ती बाई खरंच आलेली आहे. पण त्यापाठोपाठ शब्द आले, “टिल्डा, तुला हे ऐकून आश्चर्य वाटेल की त्यांनी नवीन टोपी घातली आहे.” हॉलमधून विशिष्ट हळूवार आवाज आला, “ओहो, मिस्टर ग्रिप्प, तुम्ही नेहमी माझे हसे करता. आत्ता हे बोलायची काही जरुरी होती का?”

मिस्टर ग्रिप्पना गरम हवेची झुळूक अंगावरून गेल्यासारखे वाटले. तिथून निघून गेल्यामुळे ते दिसेनासे झाले होते. पण गुप्तपणे त्यांनी मिसेस ब्राऊन यांचा आवाज ऐकला.

शूरपणा दाखवत ते रागाने मनातल्या मनात उत्तरले, ‘मिसेस ब्राऊन, मजा आहे, नाही का? ही आपली माझी एक छोटीशी चुणूक आहे.’ आणि मग सुटकेचा निःश्वास टाकत, त्यांनी त्यांची नजर उचलल्यावर, त्याना टिल्डा जिना उतरताना दिसली.

त्यांनी त्या दोघीना बाहेर पडताना बघितले. गेटजवळ कोटाच्या आडून त्याना कोरड्या रस्त्यावर त्या दोघी स्पष्ट दिसल्या. नवल वाटून त्यांनी विचार केला, दोन महिलांच्या पाठीत किती फरक आहे.! टिल्डा सरळ व सभ्य अशी तर दुसरी वळणदार व उत्तान दिसत होती. मिसेस ब्राऊनचे हसणे, खोट्या लांब पापण्या, याप्रमाणेच तिचे हावभाव सुद्धा फसवे होते. ते स्वतःशीच पुटपुटले, ‘त्या म्हाताऱ्या बाईला स्वतःमध्ये एवढे काय दिसते? जाऊदे, झाले.’ या प्रश्नावर मिस्टर ग्रिप्पनी पुढचे दार बंद केले. गालीच्यावरील छोटेसे पांढरे पीस उचलायला ते वाकले व एक सुस्कारा टाकला. अखेर ते ज्याची वाट बघत होते ती वेळ आली -- प्रत्येक कामाच्या आठवड्यानंतर ते ज्यासाठी तरसलेले असत ती वेळ! एकटेपणाचा आनंद, ते आता मनमुराद लुटणार होते. अनेकदा ते घरकामात इतके अडकलेले असत की त्याना रिकामा वेळ सापडत नसे. पण आज जेवायचे टेबल चकाचक करून झाले. भांडी घासून झाली. स्वयंपाकघर चकचकीत करून झाले आणि घर रिकामे! आता त्याना फक्त टिल्डाच्या व त्यांच्या झोपायच्या खोलीत जायचे होते. ( आणि कदाचित, मुलांच्या खोलीत. ) मग शेकोटीजवळील खुर्चीत बसल्यावर त्याना जाणवले की, शेगडीवर ठेवलेल्या किटलीशी असलेल्या खिडकीपलीकडे नितळ, हळूवार संध्याकाळ हळूहळू रात्रीत बदलत होती.

आपल्या कुटुंबावर इतके प्रेम करणारा माणूस! कोल्ह्याची मादी तिच्या पिल्लांशी जशी प्रामाणिक असते, तसा घरातील प्रत्येक सभासदाबरोबर प्रामाणिक असलेला माणूस! अशा माणसाला आठवड्यातून काही मिनिटे मिळणारे, पण कधीतरी मिळेल की नाही, असे वाटणारे, हे स्वास्थ्य ,म्हणजे स्वर्गसुख होते, चैन होती.

मिस्टर थ्रिप्प वर गेले. त्यांनी फक्त स्वतःचीच नव्हे तर मुलांच्याही दोन्ही झोपायच्या खोल्या आवरल्या. जोरदार पाण्याच्या फवाऱ्याने बाथरूम स्वच्छ केली. चार्ल्सने बेसिनचा जाळीत टाकून दिलेला साबण बाहेर काढून ठेवला. बोळा केलेला ओला टॉवेल नीट पसरून टाकला. तुम्ही तुमचे मनोरंजन करून घरी याल तेव्हा -- घर कसे चकाचक दिसेल! घराचे रूपच पालटून गेलेले असेल. एवढी छोटी छोटी कामे केल्यावर मिस्टर थ्रिप्प त्यांचा ट्वीडचा कोट घालून, स्वयंपाकघरात परतले. पाऊण एक तासात तेदेखील त्यांनी नव्यासारखे करून टाकले.

मग त्यांनी घड्याळाकडे मोर्चा वळवला. त्यात पावणेचार वाजले होते. त्याना नवल वाटले. त्यांनी चहा ठेवला. घरी येताना सर्वांना सुखद धक्का देण्यासाठी आणलेली जामची बाटली काढली. टिल्डाच्या ताटलीजवळ फुलदाणीत फुलांचा गुच्छ रचून ठेवला. पण या तयारीव्यतिरिक्त, मिस्टर थ्रिप्प आता नम्रपणे छोटी चमकती विटकरी रंगाची किटली, चहा भरून तयार ठेवणार होते. हे त्यांचे गुपित होते. ते कौटुंबिक गृहस्थ झाल्यापासून, पहिल्यांदाच अशी सरबराई गुप्तपणे करत होते. त्यांच्यासाठी, टिल्डाचा स्वयंपाक पुरेसा होता. पण इतरांचे छोटे छोटे, येता जाता तोंडात टाकायचे खाणे चालू असे. ते बिअर घेऊन खूष असत, मित्राबरोबर मधून मधून, जेवणातले काही पदार्थही करत. पण शनिवार संध्याकाळच्या एकांतवासाने आजच चहाचा थाटमाट उडवून, त्यांनी कळस गाठला होता. पहिल्यांदा आरामखुर्चीत निर्वाणाइतकी गोड डुलकी, मग चहा आणि कोणी येण्यापूर्वीचे पाऊण तासाचे विचारचक्र!

थंड हवा घरात घुसू नये म्हणून त्यांनी खिडकीचे पडदे खाली केले. मिस्टर थ्रिप्पनी त्यांच्या बुटांच्या नाड्या सैल केल्या. खुर्चीत बसून, तोंड खिडकीपासून बाजूला वळवले. नेहमी टेबलाखाली असणाऱ्या पेटीवर पाय ठेवले व हात पोटावर

ठेऊन, ते झोपले. पापण्या मिटल्या, ओठ आवळले गेले व अंगठे थोडे मागे पुढे हलवले गेले. खोल श्वास सुरु झाला. किटली शिट्टीचे गाणे म्हणू लागली -- जसे काही हजारो आवाज, न थांबता गात रहावे तसे.

पण आता तो ऐकायला घरात कुणीच नव्हते. त्या लहानशा घरात शांततेपलीकडे दाट, असे काही पसरले होते. ऐकू येणारे थोडेसे आवाज, पुढे असलेल्या अरुंद रस्त्याच्या शेवटाकडून येत होते. धुराड्याच्या वरील बाजूस असलेली दोन घड्याळे, होणाऱ्या टिकटिक आवाजाबरोबर रागाने भांडत होती. मध्येच एखाद्या ठोक्याला त्यांचे एकमत होई. हळूहळू सगळे आवाज कमी झाले. जर मिलीची पुसट प्रतिमा, -- काही मिनिटांपूर्वीच्या तिच्या प्रत्यक्ष आस्तित्वापेक्षा ठळक अशी, तिथल्या अंधारात, तिच्या वडिलांसमोर घट्ट मिटलेल्या डोळयांसमोर, तरळली नसती, तर मिस्टर थ्रिप्पचा आत्मा हळूहळू तरंगत, या मर्त्य जगापासून दूर गेला असता.

पण मिस्टर थ्रिप्पना, मिली नेहमी दिसे, तशी ही प्रतिमा नव्हती. देवदूतासारखी गात्रे असलेली, सुंदर पण पार्थिव, उदास व दयनीय अशी ती वाटत होती. उत्फुल्ल गाल आत ओढले गेले होते. डोळयात चमक नव्हती. दुःखी, नजर खाली वळलेली व वडीलांना सामोरी न जाणारी. जणू काही तिला कसला तरी पश्चात्ताप होत होता किंवा ती त्यांच्या चौकशीला घाबरत होती.

मिस्टर थ्रिप्पच्या अर्धवट जाग्या मनाला, मोठ्या काळजीने ग्रासून टाकले. त्यांचे हृदय व कपाळावरील शीर, जोरात धडधडू लागली. आता ती कुठे होती? कुठल्या वाईट भविष्याची ही नांदी होती? मिली काही मूर्ख नव्हती. तिला तिचे भलेबुरे माहिती होते. आणि या जगात काही निषिद्ध, दुष्ट मार्ग असतीलच, तर त्यापासून तिला सावध करायला तिची आई होतीच. तुम्ही तिला काही सांगत

राहिलात, तर कदाचित त्या मुलीच्या डोक्यात काही शिरले नसते -- हे धोकादायक होते. प्रेम सुद्धा काळजीने करायला हवे. पण घट्ट लावलेली झाकणे, उत्सुकतेने उघडमिट होतात. मिली होती तरी कुठे? कुठेतरी आतमध्ये. पण कुणाबरोबर?

मिस्टर थ्रिप्पनी प्रथम तिला चहाच्या दुकानात, एका भीतीदायक टायपीन लावलेल्या तरुण माणसाच्या समोर बसलेले पाहिले. त्याची कोपरे संगमरवरी टेबलावर ठेऊन तो मिलीकडे अनुभवी, घाणेरड्या नजरेने, बघत होता. ते सिनेमाला गेले होते का? अर्धवट जागृतावस्थेत त्यांच्या कानावर एक सुखद आवाज पडला, “पण, मिस्टर थ्रिप्प, मला अंधारात मजा येते -- त्यामुळे डोळयांना विश्रांति मिळते.” असे धापा टाकत, ती बाई का बोलली? तिच्या डोळयांना विश्रांति!

तिच्या आसपास असलेल्या कुठल्याही मूर्ख पुरुषाचे डोळे तिला आपल्याकडे लागलेले असायला हवे असत. मिस्टर थ्रिप्प यांच्या कल्पनाराज्यातील सिनेमागृहात आत्ता खूपच अंधार होता. पडद्यावरील लॉस एंजल्सच्या एखाद्या नटीप्रमाणे, मिलीचा तरुण, फिकट व आनंदी चेहरा त्याना अगदी जवळून दिसला. आता तिच्याबरोबरचा माणूसदेखील तिच्याएवढाच उजळ दिसत होता. त्याची हनुवटी लांब असून चेहरा एखाद्या बकरीसारखा होता. पण डोळे नजर खिळवणारे होते. ते दोघे हातात हात घालून, प्रेमालाप करत होते.

मिस्टर थ्रिप्प, कानात बिगुलचा जोरदार आवाज आल्यासारखे, क्षणभर जागच्या जागी खिळले. मग जाणीवपूर्वक डोळे उघडून त्यांनी त्या माणसाकडे पाहीले. नोव्हेंबरमधील दिवस मावळू लागला होता. हो मिलीशी बोलले पाहीजे -- पण आज संध्याकाळी ती घरी येईल, तेव्हा नव्हे. घरी येणाऱ्याचे नेहमी हसतमुखाने स्वागत करणे शहाणपणाचे असते. कदाचित, उद्या सकाळी, उशिरा आल्याबद्दल

तिची आई तिला रागावत नसेल आणि ती निष्काळजीपूर्वक रिकामी असेल, तेव्हा बोललेले बरे. योग्य वेळेला तिच्याशी शांतपणे बरेच काही बोलले पाहीजे. जे बोलल्यानंतर पस्तावण्याची पाळी येणार नाही असे! त्याना हे खूप वर्षांपूर्वीच करायचे होते. पण घर पेटल्याशिवाय पाण्याचा पूर आणून काय उपयोग आहे? ती तर, थोडीशी घसरली होती. एखाद्या फुलासारखी -- रानटी फूल नव्हे -- उमलणारे, गोड, मलूल फूल! त्याला उघड्यावर पडू न देता, त्याच्याबरोबर तुम्ही काळजीपूर्वक वर्तन केले पाहीजे.

आणि तरीही त्यांच्या छोट्याशा जागेची तुलना, एखाद्या उबदार घराशी कशी करता येईल, हे त्याना आयुष्यभर कळले नाही. नाजूक बाब होती. सगळे तेच म्हणाले. कदाचित तिचा निष्काळजीपणा छुप्या सुमधुर गीताची नांदी असू शकेल. देवा रे, तसेच असू दे. देव भले करतो. जर -- तर त्यानी लवकरात लवकर तिला घेऊन, डॉक्टरांकडे जायला हवे. पण त्यातला वाईट भाग म्हणजे, हे तुम्हाला स्वतःच्या जबाबदारीवर करावे लागते. आणि जरी मिस्टर थ्रिप्प आता पन्नाशीजवळ आले असले, तरी त्याना कधीकधी असे वाटते, की त्याना दोघांच्या प्रकरणाची काळजी करणे सहन होणारे नसेल, तर त्यांनी ती करू नये. करायचे असेल तर एका फटकाऱ्यात करून टाकावे. लोक म्हातारे दिसतात. पण आतून खरे तर कोणीच म्हातारे नसते. त्रास हलके होतील किंवा आपण ते थोपवू शकू, बोलणाऱ्या जिभांना आवर घालू शकू किंवा भावनांवर नियंत्रण ठेऊ शकू. यासाठी आपण म्हातारे नसतो.

आणि मग त्याना चार्लीची आठवण झाली. चार्लीच्या बाबतीत काय करावे बरे? जर तो प्रत्येक शनिवारी फुटबॉलच्या मॅचसाठी जात असेल, तर त्याला, त्याच्या चलाखीतून पकडणे सोपे होते. पण त्याचे वय बघता, तोंडात सिगरेट ठेऊन, दारुच्या

गुत्त्याच्या इथे जाण्याच्या बढाया मारणे म्हणजे त्याच्यासाठी पुरुषार्थाचे लक्षण वाटत असणार. तरीही, मिस्टर ग्रिप्पना अशी फारशी शक्यता वाटत नव्हती. रस्त्यावरील पुठ्ठ्याच्या खोक्यातील सिनेमातील स्पष्ट दृष्य  दिसावे तसे त्याना चार्ली फुटबॉल खेळताना दिसला. टोप्या घातलेले, दमलेले व सहकाऱ्यांवर नजर भिरभिरणारे -- जणू सर्वजण एका दोऱ्याला गुंडाळलेले -- आणि स्टेडियममध्ये तो मूर्ख बॉल असहाय्यपणे एका चिखल्या बुटाकडून दुसऱ्या चिखल्या बुटाकडे जात असलेला!

तसे पाहिले तर, मिस्टर ग्रिप्प स्वतः फुटबॉलपेक्षा जास्त चांगले नव्हते. या मूल्यवान आयुष्यात, बुटाची पुढची लाथ तुम्हाला कुठे उडवणार, हे ठरवण्याची संधी फारच कमी असते. ऑफीसमधील तो चढेल, स्वसमाधानी, नवीन हिशेबनीस व त्याची बुक कीपिंगची नवीन पद्धत!

मिस्टर ग्रिप्पनी जांभई देण्यासाठी आ वासला, पण मोठ्या प्रयत्नांनी, त्याचा काही अंशच जांभई देऊ शकले. त्यांनी चेहऱ्यावर खसखसून हात फिरवला. पुन्हा डोळे मिटू लागले. तुमची मुले तुम्हाला प्रत्यक्ष मदत करत नाहीत असे काही नव्हते. त्यांनी असे का असावे? तुम्हाला काय हवे आहे, ते त्याना कधीच समजत नाही. तुम्हाला फक्त प्रत्यक्ष मदत नको असते, तर थोडा अंतस्थ डौलदारपणा, मनाची शुद्धता हे हवे असते. पण, ते तुमच्या दृष्टीकोनाबद्दल अगणित भयानक प्रश्न विचारतात. मिस्टर ग्रिप्पना त्यांच्या मनाप्रमाणे शेवट व्हायला हवा असला, तरी ते नेहमीच काही उपदेशाचे डोस पाजत नसत. युक्तीने असे समजावत की जग हे असेच असते. तरीही ते माणसाला स्वतःबद्दल कितीही खात्री असली --  आत्मविश्वास असला तरी, तुम्हाला तुमचे म्हणणे लाऊन धरावेच लागते. जेम्सशी एखादे अक्षर जरी बोलले तरी, स्वतःचे वजन पडेल असे काही करावेच लागते. डॅडी म्हणजे

पिंजऱ्यातील मागासलेले ओरांग उटान आहेत, असे जेम्स नेहमी समजत असे. फक्त बोलायचे असेल तरच जेम्स त्याच्या तोंडातून सिगरेट काढे, इतका तो बेपर्वा होता. स्वतःची भलावण स्वतःच हसून करे. त्यांच्या मुलाच्या खालच्या ओठाला चिकटून, वरखाली होणारा, तो थोडासा डागाळलेला, कागदाचा तुकडा, बघून मिस्टर थ्रिप्प कधीकधी ठार वेडे दिसू लागत. एकदा त्यांनी खरच त्यांच्या उंच टाकीत साठवलेल्या पाण्यासारख्या कोंडलेल्या धक्कादायक भावनाना वाट करून दिली. त्यानंतर घडलेल्या घटनेच्या आठवणीनेसुद्धा त्याना खुर्चीत बसल्या बसल्या थरथरायला झाले. तरी देवकृपेने त्यांचे भान असे फारदा सुटत नसे.

त्यांनी असा विचार केला, पुढच्या वर्षी यावेळेला जेम्सचे लग्न झालेले असेल. काय नाजूक छानसे लोणचे ते त्याच्यासाठी बनवत होते! मिस्टर थ्रिप्पना त्या प्रकारच्या महिला माहिती होत्या. दबलेली जिवणी, पातळ, कोरडे केस व अरुंद सीट. खरेच ती चांगली व्यवस्थापक असणार. पण विवाहित आयुष्यात एक असा मुद्दा होता, की दोन तटस्थ चेहऱ्याच्या बायका व आपण यामध्ये दोन पाण्याच्या साठ्याना जोडणाऱ्या बारीक नदीप्रमाणे आपण! हे सांभाळताना आपण वेड्यांच्या दवाखान्यात जाऊन पडू  की काय? यातला तथ्यांश एवढाच होता की जेम्सच्या बढाया व नेटकेपणा यात, सारासार विचार नव्हता. जर तुम्ही स्वतःच्या मताप्रमाणे वागणारे व तत्वांसाठी दुसऱ्यांचा अपमान करायला मागेपुढे न बघणारे असाल, तर डोके चांगले तल्लख असून, त्याचा फारसा उपयोग नव्हता. जेम्स, मिस्टर थ्रिप्पच्या कुटुंबातील कुणासारखाच नव्हता. तो सिम्पकिन्स कुटुंबासारखा होता.

मग जणु मिस्टर थ्रिप्पच्या मनातील कुणी विसरलेला प्राणी, जोरात रडू लागला. त्यानी मनात त्याच्या मोठ्या मुलाच्या दयनीय चेहेऱ्याकडे प्रेमाने पाहीले. जेम्ससाठी ते योग्य असे काहीही करू शकत होते -- अगदी काहीही. पण ते जेम्सच्या

दृष्टीने योग्य असले पाहीजे, त्याच्या स्वतःच्या दृष्टीने नव्हे. त्याना माहिती होते की त्यांनी तरुण स्त्रीशी लग्न का केले. ते पुनर्विवाहित असल्यानेच केवळ, जेम्सला त्यापासून वाचवू शकत होते. आणि तरीही -- तरीही जगात तुमच्यापेक्षा अजून वाईट, हट्टी, लहरी, कंजूष, दुसऱ्याचे दोष काढून त्रास देणाऱ्या, धड वागणे नसलेल्या बायका त्यांना माहिती होत्या. मिस्टर थ्रिप्पना पूर्वीच्या काळातील एक त्रासदायक बाई आठवली. त्यांच्या भावाची बायको, फॅनी. आता ती वारलेली होती. आणि जॉर्ज मुक्त माणूस होता. पण तो अति प्रमाणात पित असे.

खुर्चीत बसल्या बसल्या, मिस्टर थ्रिप्पनी ठरवले की संधी मिळताच, ते दुसरा चांगला विचार करतील. पण बहुधा ते पुढच्या शनिवारपर्यंत शक्य नव्हते. तुम्हाला खरे तर ज्या गोष्टी करायच्या नाहीत, त्यापासून स्वतःला दूर ठेवणे, किंवा तुम्ही ऑफिसच्या गजबजाटात असणे, यामुळे तुम्ही वेगवेगळया प्रकारे दुःखी होण्याव्यतिरिक्त -- काही करू शकत नाही. सर्वात वाईट म्हणजे, टिल्डाबरोबर याची चर्चा करणे, फारसे उपयोगी नव्हते. बहुतेक सर्व बायकांसारखा तिला विषय जेमतेम समजत असे. आणि जेव्हा तुम्ही मुद्द्याशी येता व तर्कशुद्ध राहू इच्छिता, तेव्हा चर्चा करण्यासारखे फार थोडेच उरते. शिवाय टिल्डाला स्वतःच्या पुरेशा अडचणी असतात.

या क्षणी, परत एकदा मिस्टर थ्रिप्पनी त्यांचे डोळे सताड उघडले. छोटेसे स्वयंपाकघर सुंदर, गुलाबी दिसत होते व अजूनही उबदार होते. घड्याळाच्या दोन काटयांकडे बघून संध्याकाळ होत आल्याचे त्यांच्या लक्षात येत होते. ब्रासचा लंबक संथपणे वेळाचे तुकडे पाडत, काळाचा पट पुढे पुढे सरकवत होता. ते पुढे झुकले. पाच मिनिटात, त्यांची खासगी चहाची किटली त्याना तयार ठेवायची होती. आता जरी

त्यांनी मान डोलावली, तरी ते वेळेत उठले असते. पण उठण्यासाठी अजून पाच मिनिटाचा वेळ म्हणजे काही फार नव्हता. ते खुर्चीत बसल्यासारखे झाले. आणि अजून एकदा डोळे मिटले. आणि एकदोन मिनिटात त्यांचे मन एकदम पूर्ण रिकामे झाले.

अचानक ते दीन झाले. भयानक रीत्या पूर्ण रिकाम्या मनाकडे ओढले गेले -- वातावरणात एका जागी, हालचाल न होता, लटकले गेले. रानटी वाळूच्या टेकड्या व काटेरी झाडांचे दृष्य त्यांच्यासमोर तरळू लागले -- अथांग वाळवंट -- ते शून्यातून त्यांच्याकडे झेपावले. ते स्थिरपणे लटकलेले होते. पण अजून जोराने पुढे पुढे जात होते. पण कशासाठी व कुठे हे जराही कळत नव्हते. त्यांच्यासमोरची भयानकता अजून अजून एकाकी व धोकादायक होत चालली. ते भयंकर घाबरले, किंचाळले, आतून पार हलले -- आणि त्याना जाणवले की ते व्यवस्थितपणे त्यांच्या खुर्चीत बसलेले आहेत. त्यांनी त्यांचा तो भीतीदायक प्रवास सुरु करायच्या आधी, घड्याळाचे काटे ज्या स्थितीत होते, तसेच अजूनही होते. त्यांचा चेहरा पांढरा फटक पडला. ते अस्वस्थतेने जोरात मारलेल्या किंकाळ्या ऐकत बसले. जणु हजारो राक्षस खिडकीबाहेर त्यांच्या मरणाची वाट बघत थांबले होते. हे मनाचे स्वप्नातील खेळ मांजरांच्या ओरडण्यात बदलले. तरीही अजूनही घाबरत, तो आवाज ते ऐकत होते. ते इतके माणसाच्या आवाजासारखे भासत होते, की जणू हजारो अजून न जन्मलेल्या बाळांचे आवाज त्यांच्या खिडकीच्या काचेवर येऊन आदळत होते. मिस्टर ग्रिप्प खुर्चीतून उठले. त्यांचा चेहरा रागाने व सूडाच्या भावनेने तळपत होता. ते भांडी धुवायच्या जागेतून मागील दाराकडे गेले. ते उघडले. एकाएकी, क्षणार्धात मांजरांचे ओरडणे थांबले.

आणि त्याच क्षणी त्याचा रागही शांत झाला. त्यांच्या कपाळावर, संध्याकाळची गार हवा आली. ते मूर्खासारखे हसले व स्वतःकडे बघितले.

झुडूपांमधून, गुप्त सळसळ ऐकू आली. ते अंधारात हळूवारपणे गाऊ लागले, “ओहो, तू आहेस होय! माझ्या प्रिय सभ्य गृहस्थहो, तुम्हाला शक्य असेल तेवढे तुम्ही खेळा. हा तुमचा सर्वात चांगला काळ समजा, कारण हा लवकरच संपणार आहे.”

त्यांच्या अंगणातील एका वाकड्या, जुन्या, निष्पर्ण झाडामागे, एक चांदणी डोकावत होती. शिळा वास येणारे जमिनीवरील धुके वाढत होते. लंडन व त्याजवळील उपनगरे नेहमीप्रमाणे हिवाळ्यातील धुक्यासाठी तयार झाली होती. वरच्या खिडक्यांवर थोडासा उजेड पडला होता. असे वाटत होते की मिस्टर थ्रिप्प यांचे शेजारीदेखील सिनेमाला किंवा गाण्याच्या कार्यक्रमाला जायची तयारी करत होते. हवा, चिकट, दमट व स्थिर होती.

कोणा अनामिकासारखे ते शांत उभे होते. त्यंच्या मनात खोल उदासी भरून राहीली. त्यांच्या चेहऱ्याला पडलेल्या सुरकुत्यांची त्याना जाणीव होत नव्हती. त्याना अचानक आठवले, की पुढील आठवड्यात त्यांचे कर भरायचे होते. त्याना आठवले की लवकरच नाताळ येईल. आणि त्या सणाचा पूर्वीप्रमाणे आनंद घ्यायला, ते फार वयस्क झाले आहेत. त्यांनी डोळयांची हालचाल केली -- त्यांच्या आतील त्यांचा मित्र त्याना काही सुचवू लागला, पण मिस्टर थ्रिप्प काही शब्दांच्या पुढे त्याना म्हणायचा असलेला ‘त्रास आहे’ हा शब्द उच्चारू शकले नाहीत. त्याऐवजी त्यांनी त्याच्या मजबूत हातांनी चेहरा खसाखसा चोळला. ते स्वतःशी बोलले, “एवढे धुके पडले आहे पण आता पाऊस नको पडायला!”

आणि जसे काही खूण म्हणून त्यांचे, शेजाऱ्यांचे, मिसेस ब्राऊनचे, रंगाऱ्याचे व मागे रहाणाऱ्या अंतर्गत सजावट करणाऱ्याचे, अशी सगळी मांजरे एकदम ओरडू लागली. त्याबरोबरीने, वर्तमानपत्र टाकणाऱ्याचे पिवळे पांढरे मांजरदेखील लांबून

ओरडून शनीवार रविवारच्या प्रार्थनेत, सूर मिसळू लागले. या सर्वांचा एकत्रितपणे उद्दीपित झालेला आवाज, भान हरपून प्रार्थना म्हणणाऱ्या लोकांसारखा, स्वर्गापर्यंत जाऊन पोचला.

मिस्टर थ्रिप्प कठोर चेहऱ्याने हसत म्हणाले, "मी काही तुला दोष देत नाही. माझ्या मित्रा, जर तुला माहिती असते, तर तुझ्या नवीन डोळयाना काही दिसत नसले तरी, किती सुळकन तू बादलीभर गार पाण्यातून तू सटकला असतास व दुप्पट जोरात गायला असतास!"

दार बंद करून ते  शेगडीतील विस्तवाजवळ आले. आज दुपारी आता अजून झोप मिळायची आशा नव्हती. त्यांची निराशा झाल्याबद्दल स्वतःशी मनोरंजन करत ते हसले. माणसे कसे लहान मुलासारखे वागतात! त्यांनी विस्तव ढवळला. ज्वाळा, त्याना खूष करण्यासाठी जणू धडधडून पेटल्या. त्यांनी त्यावर किटली ठेवली. दिवा लावला. ते भांडे गरम केले. कपाटातील काही भांड्यांच्या मागून, छोटेसे, खासगी व दर्जेदार सिलोनच्या चहाचे पाकीट बाहेर काढले. किटलीच्या चोचीतून, जादूभरी, दणदणीत वाफ बाहेर येत होती. मिस्टर थ्रिप्पनी किटली कोळशावरुन बाजूला केली. त्याच क्षणी, चार्लीने मनाच्या वेगळयाच लहरीत, एक दोन वर्षांपूर्वी बसवलेली घंटी, आगीच्या बंबाच्या घंटेसारखी वाजू लागली. मिस्टर थ्रिप्प लगेच जावे का असा विचार करत होते. जर कुटुंबातील कोणी आले असेल, तर त्याना नक्की बोलणी बसणार. जर त्यांची चहा वगैरेची तयारी त्यांनी भरभर आटपली तरच ते वाचू शकत होते. जर टिल्डा असेल तर, शूरपणे गुप्तता पाळणे शहाणपणाचे ठरले असते. त्यांनी भांड्यात पाणी ओतले. आणि परत झाकण लावून ते ओव्हनमध्ये ठेवले. एखाद्या प्रौढ कुमारिकेने खोली व्यवस्थित आवरावी तशा प्रकारे आवरलेल्या खोलीकडे समाधानाचा दृष्टीक्षेप टाकत, ते बाहेर गेले व दार उघडले.

बाहेर उभ्या असलेल्या कृश मिलीकडे बघत ते बोलले, “मिली, तू आहेस  होय? काय ग, काय झाले?”

मिलीने काही उत्तर दिले नाही. तिच्या वडीलाना तिच्या चेहऱ्याकडे बघवेना. तिचे डोके प्रकाशापासून दूर करत, ती एकही शब्द न बोलता चालू पडली.

तिच्या वडीलांचा मनातील राक्षसाने जागे होऊन, त्यांच्या मनगटाभोवती व कमरेभोवती जणू साखळदंड अडकवले. मोहक व आकर्षक पद्धतीने मिस्टर ग्रिप्प म्हणाले, “माझ्या प्रिय मुली, चल इकडे ये. तुझ्यासाठी एक छान आश्चर्य आहे. तुझ्यामाझ्यात अजून काय आहे, तर मी आत्ताच माझ्यासाठी चहा बनवत होतो. तुझ्या आईला मी यातील काही सांगणार नाही. हे तुझेमाझे गुपित! अजून कोणी घरी परतायच्या आत, आपण ते उरकू.”

ती हळूवार आवाजात बोलली, “पा, तुम्ही म्हणजे एक उजेडाची तिरीपच आहात.” एवढे बोलून ती शेकोटीजवळच्या वडीलांच्या खुर्चीत बसली. तिने जाळ इतका कमी केला की शेकोटी विझली. आता तिच्या चेहऱ्यावर उजेड पडला होता. तो पूर्वीपेक्षाही फिकट दिसत होता. तिचा सोनेरी केसांची एक बट निळया शिरा दिसणाऱ्या कपाळावर आली होती. ती रडत असल्यासारखी दिसत होती. उभ्या अस्वलाचे असावेत तसे दोन्ही निरुपयोगी हात बाजूला ठेऊन तिचे वडील धक्का बसल्यासारखे आता पुढे काय वाढून ठेवले आहे, अशा आविर्भावात, उभे होते. हे त्यांच्या स्वप्नांचे रहस्य व नशिबाच्या मांजरांचे एकत्रित ओरडणे होते तर!

“मिली बाळा, काय झाले? तू खूप दमली आहेस का? अग, एकदोन मिनिटे काहीतरी बोल. हे बघ, इथे आपल्या दोघांकरता चहा आहे.”

मिली परत रडायला लागली. तिच्या लहानशा हातरुमालाने डोळे पुसू लागली. मिस्टर थ्रिप्प यांनी त्यांचे हात अवघडल्यासारखे, तिच्या छोट्याशा सुंदर टोपीवर ठेवले. जणू ते हळूवारपणे तिच्या केसातून हात फिरवत होते. ते तिच्या खुर्चीजवळ गुडघे टेकून बसले.

ते उद्दीपित होऊन गुप्तपणे हळूच तिच्या कानात बोलले, 'कृपया! देवाच्या दयेनी, कृपया, तुझ्या वडीलाना काहीतरी सांग." मिलीने तिची सुंदर टोपी काढली व त्यांच्या खांद्यावर मस्तक ठेवले.

ती म्हणाली, "डॅड, विशेष काही नाही. ते सगळे सारखेच आहेत, एवढेच."

"सगळे सारखेच म्हणजे काय?'

"ओहो डॅड, हे तरुण"

त्यांच्यातील राक्षस कुजबुजला, 'त्यातला चांगला सुद्धा? देव त्याला ठार करो."

"तो आर्थर! मी मूर्खासारखी त्याच्यासाठी अर्धा तास वाट बघत थांबले, आणि मग त्याला -- त्या नखरेल मुलीबरोबर पाहीले."

मिस्टर थ्रिप्पने जणू नायगारा वहात गेल्यासारखा एक लांबलचक सुस्कारा टाकला. आवाज न करता! त्यांच्या वादळी मनात सुटकेचे अर्धा डझन तरी आश्चर्यकारक शब्द उमटून गेले. क्षणभर थांबून सातवा शब्द त्यांच्या ओठावर आला.

ते पुटपुटले, "लाडके, एवढेच ना? मी तुझ्या आईबरोबर फिरत होतो, तेव्हा मी पण असे पाहीले होते. तुझ्याइतकी नाजूक व नीटनेटकी नसली, तरी ती एक छोटीशी, सुंदर मुलगी होती. तेव्हा मला वाटले की त्याला जाऊन बुकलून काढावे. पण मी माझ्यातील गोडव्यावर विश्वास ठेऊन, लक्ष नसल्याचे दाखवले."

मिली हुंदके देत म्हणाली, ”हे तुम्ही मस्त केले. पण तुम्ही पुरुष होतात. आम्हाला भांडण केल्यासारखे न दिसता भांडावे लागते. मी त्याची मुळीच पर्वा करत नाही. गेला उडत! पण -- “

तिच्या गालावरून त्यांचे बोट फिरवत, मिस्टर ग्रिप्प मध्येच बोलले, “अरे देवा मिली, तू रागीट डोळयांनी असल्या वीसजणांना, बदडून काढू शकशील. आता अजून दुःख करू नकोस. तो सुरक्षितपणे परत येईल. नाहीतर मग -- मी त्याला जितका चांगला समजतो, तितका तो नाही.”

चामड्याचे बूट घातलेले मिस्टर ग्रिप्प क्षणभर मोठे डोळे करून मिलीच्या अनाकलनीय नजरेला नजर देत राहीले. पण नंतर ठामपणे त्यांनी ते थांबवले.

ते बोलले, “आता तुझ्या गरीब बिचाऱ्या डॅडला एक पापा दे. मिली, एवढी काय नाराज होतेस? हे सर्व लवकरच थांबेल. आणि आता या मस्त चहाचे दोन घुटके घे. मला वाटत होते की मी एकटाच आहे. माझ्याबरोबर चहा घ्यायला कोणीच नाही. पण बरका, यातले काहीही आईला सांगायचे नाही.”

तेव्हा मग तिथे ते वडील व त्यांची मुलगी आरामात बसले. ते शांत करणारे व ती समाधान पावलेली. त्यांच्यासाठी केलेल्या जादुई चहाचे मिस्टर ग्रिप्पनी दोन कप भरले. आणि समाधानी मिली तिच्या आर्थरची वाट बघताना, तिच्याकडे धीटपणे बघणाऱ्या तरुणाचा विचार करू लागली. तिला दिवास्वप्नातून कधी जागे करणे योग्य ठरेल, याचा विचार मिस्टर ग्रिप्प करू लागले. कारण त्याना रात्रीच्या जेवणाच्या कामाकडे वळायचे होते.

ही एकामागून एक त्रासांची व दुःखांची मालिकाच त्यांच्यामागे लागली होती. त्यांनी स्वतःलाच धीर दिला. पण मध्यंतरीच्या काळात त्यांचा कोरा चौकोनी चेहरा शांत व गंभीर होता. मिलीच्या हातावर थोपटत ते घोट घोट चहा पीत होते.

**The Kiss**

**By Aanton Chehov**

# चुंबन



**खास यू बनावटीच्या सहा बॅटऱ्या घेऊन जाणारी शस्त्रविभागाची गाडी कँपला जाताना, २० मेच्या संध्याकाळी, वाटेत मेस्टेको या गावी रात्रीसाठी थांबली. घाईगर्दीत जेव्हा काही ऑफिसर्स, बंदुकींच्या कामात व्यग्र होते व इतरजण मेट्रनचे अहवाल ऐकत आसपास विखुरले होते, तेव्हा साध्या नागरिकाच्या वेषातील एक घोडेस्वार, चर्चच्या मागून आला. तो छोटासा, हलका घोडा म्हणजे एक सुंदर मान व क्लिपा लावलेले शेपूट असलेला, घोडा होता. सरळ चालण्याऐवजी कडेकडेने चालण्याची ढब असलेला व मोठ्या डौलाने चाबूक मारल्यासारख्या दुगाण्या झाडणारा, असा होता. ऑफिसर्सच्या गटाजवळ येऊन, तो घोडेस्वार थांबला व**

त्याची टोपी उंचावत म्हणाला, “जमीनदार, जनरल व्हॉन रॅबेक, ह्यांचा निरोप आहे की तुम्ही सर्वजण त्यांच्याकडे येऊन, त्यांच्याबरोबर चहा घ्यावा.”

घोडा अदबीने मागच्या बाजूस कडेला उभा राहीला. घोडेस्वाराने पुन्हा एकदा त्याची टोपी उंचावली व वळून त्या विचित्र दिसणाऱ्या घोड्यासकट, चर्चगागे नाहीसा झाला.

त्यांच्या रहाण्याच्या जागी जात, काही ऑफिसर्स रागाने पुटपुटले, “गेला खड्ड्यात! चहाला या याचा अर्थ काय, ते आपल्याला माहिती आहे. आपल्याला झोप आली आहे आणि इथे व्हॉन रॅबेकला चहाची पडली आहे.”

सहा बॅटऱ्यांमधील प्रत्येक ऑफिसरने ठळकपणे मागील वर्षी त्यांच्या बाबतीत मॅनोकुव्हर्समध्ये घडलेली एक घटना, परत आठवून पाहीली. एका कोसॅक तुकडीतील ऑफिसर्सना अशाच प्रकारे चहासाठी निवृत्त ऑफिसर्सकडून बोलावले गेले आणि त्या अगत्यशील लोकांनी मित्रत्वाने त्यांचा पाहुणचार केला व रात्र त्यांच्याकडे काढण्याची विनंती केली. हे सर्व छानच होते. अर्थात, याहून जास्त कसली अपेक्षा नव्हतीच. फक्त तरुण लोकांच्या सहवासाने, यजमान फार खूष झाला होता. रात्रभर तो त्याना, त्याच्या गतकाळातील आनंदी प्रसंग सांगत राहिला. खोल्याखोल्यांमधून त्यांना त्याची महाग चित्रे, कडक पृष्ठभागावर कोरलेली नक्षी व क्वचित आढळणारे चिलखताचे प्रकार दाखवत राहीला. त्याने त्याला अनेक मोठ्या लोकांकडून आलेली पत्रे पण वाचून दाखवली. सर्व ऑफिसर्स त्याचे बोलणे ऐकत राहीले. ते जांभया देत होते व आतून खरे तर, झोपायची वाट बघत होते. शेवटी जेव्हा यजमानाने त्याना सोडले, तेव्हा निजायला फारच उशीर झाला होता. व्हॉन रॅबेकसुद्धा असाच तर नसेल? पण काही पर्याय नव्हता. ऑफिसर्स तोंड धुऊन, कपडे करून, त्याच्या घरी

जायला निघाले. चर्चमागील रस्त्याने गेल्यास, नदी ओलांडावी लागणार नाही, असे कुणीतरी सांगितल्याने, ते चालत राहिले व शेवटी त्याच्या बागेशी आले. आता दिसत असलेल्या रस्त्याने ते दाराशी पोचले असते, पण वळण घेऊन ते त्याच्या शेतघराशी जाऊ शकत होते. मग त्यांनी शेतघराचा मार्ग निवडला.

"हा व्हॉन रॅबेक कोण आहे? वाटेत ते एकमेकाना विचारत होते, "प्लीव्हनामध्ये खास यू बनावटीच्या बंदुकींचा शस्त्रविभाग काढण्यास सांगणारा तो आहे का?"

"नाही. तो व्हॉन रॅबेक नव्हे. तर तो फक्त रॅबे नावाचा होता. व्हॉन नसलेला."

"काय छान हवा, पडली आहे."

पहिल्या शेतघराशी रस्ता दुभंगला. एक सरळ जाऊन संध्याकाळच्या अंधारात विलीन झाला. तर दुसरा उजवीकडे वळून, व्हॉन रॅबेकच्या घराशी पोचत होता. ऑफिसर्स उजवीकडे वळले व त्यांचे आवाज जरा कमी केले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला, सैन्याच्या तुकड्यांची छावणी असावी तशी, लाल छप्पर असलेली दणकट व गडद रंगांची दगडी शेतघरे होती.

"सभ्य गृहस्थहो, हे चांगले लक्षण आहे." एका ऑफिसरने शेरा मारला.

"आपला वाटाड्या पुढे आहे. म्हणजे त्याला घराचा वास आलेला दिसतो आहे."

उंच असलेला, रुंद खांद्यांचा व वरचा ओठ स्वच्छ असलेला, लेफ्टनंट लोबिटको सर्वात पुढे होता. तो फक्त पंचवीस वर्षांचा होता, पण त्याच्या गोल गरगरीत चेहऱ्यावरून, तसे वाटत नव्हते. आसपास कुणी बाई आहे का याचा वास घेण्यात, तो

ब्रिगेडमध्ये प्रसिध्द होता. त्याने एक गिरकी घेतली व म्हणाला, “हो. मला खात्री आहे की इथे महिला आहेत. माझा आतला आवाज, तसे सांगतो आहे.”

घराच्या दारात साठीचा, वयस्क व देखणा व्हॉन रॅबेक साध्या, घरगुती कपड्यात उभा होता. पाहुण्यांशी हातमिळवणी करत त्याने, आनंद व्यक्त केला. पण रात्री मुक्काम करायला न सांगितल्याबद्दल, त्याने खंत व्यक्त केली. त्याच्या दोन बहिणी व मुले आली होती. त्याचे भाऊ व काही शेजारीदेखील, आले होते. आणि त्यामुळे घरात जागा नव्हती. आधी उल्लेख केलेल्या यजमानाइतका, आनंदी झालेला असा तो, दिसत नव्हता. फक्त नम्रपणाने त्याने सर्वांना बोलावले. गालीचा घातलेल्या जिन्याने वर जाताना, त्याने ते सगळयांच्या लक्षात आणून दिले. त्यांच्या मालकाच्या आज्ञा झेलत, जिन्यातील व वरच्या हॉलमधील दिवे लावण्यासाठी, नोकरांची लगबग चालली होती. या घरात येऊन यजमानाला त्रास झाला आहे, असे सर्वांना वाटले. दोघी बहिणी, भाऊ, शेजारीपाजारी, हे सर्व काही घरगुती समारंभासाठी जमलेले असताना, एकदम एकोणीस परक्या लोकांची घरावर धाड पडल्यासारखे झाले. मग घरचे लोक कसे खूष असणार?

लंबवर्तुळाकार चेहरा असलेल्या, दाट भुवया असलेल्या, उंच, डौलदार व वयस्क महिलेने, हॉलच्या दारात पाहुण्यांचे स्वागत केले. ती सम्राज्ञी युजेनीसारखी दिसत होती. मधुर हास्याने, तिने स्वागत केले. तिनेही रात्रीच्या मुक्कामाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. ती वळली व काही उपयोग नसलेल्या खूप ऑफिसर्सना पाहून, तिच्या चेहऱ्यावरचे कृत्रिम हसू मावळले. फक्त तिचे विशिष्ट स्थान व खानदानीपणामुळेच केवळ, तिने हे अगत्य दाखवले होते.

जेव्हा ऑफिसर्स जेवणाच्या खोलीत शिरले, तेव्हा चहा असलेल्या टेबलाच्या एका बाजूला, बरेच तरुण, म्हातारे स्त्रीपुरुष बसलेले होते. त्यांच्या मागे सिगरेटच्या धुरात, माणसांचा एक गट बसला होता. त्यांच्या मध्यभागी लाल मिशा असलेला एक बारीक तरुण जोरात इंग्लिश बोलत होता. त्यांच्यामागे दारातून, फिकट निळे फर्निचर असलेल्या, लखलखाट केलेल्या आतील खोलीचे दृष्य दिसत होते.

आनंदी असण्याचा प्रयत्न करत, जनरल मोठ्याने बोलला, “सभ्य लोकहो, तुम्ही इतकेजण आहात की तुमच्या सगळयांची ओळख करून घेणे शक्य नाही. घरगुती स्वरूपात सर्वांनी आपापली ओळख करून द्या.”

काहीजण औपचारीक चर्या ठेऊन, व उरलेले ओढूनताणून आणलेले हसू हसत, खाली झुकत, टेबलाशेजारील खुर्च्यांवर बसले. सगळे खूपच अस्वस्थ होते. त्यांच्यातील एकाला, गोल खांदे असलेल्या  लहानशा चष्मिस मनुष्याला, तर फारच अस्वस्थ वाटत होते. तो ऑफिसर रियाबोवित्च होता. त्याच्या बरोबरचे काही ऑफिसर्स गंभीर होते तर काही उसने हसू हसत होते. पण रियाबोवित्चच्या रानटी मांजरासारख्या मिशा, चष्मा व एकंदरीत हावभाव असे सुचवत होते, ‘मी ब्रिगेडमधील, सर्वात लाजरा, नम्र व तरुण ऑफिसर आहे.’ जेव्हा तो पहिल्यांदा खोलीत आला व खुर्चीत बसला, तेव्हा त्याचे लक्ष कुठल्याही एका वस्तूवर वा चेहऱ्यावर स्थिर होत नव्हते. -- चेहेरे, कपडे, ब्रँडी भरायचे नक्षीदार पेले, त्यातील फेस, सुशोभित भिंती -- या सर्वाचा मिळून एकत्र परिणाम होऊन, तो गोंधळून गेला होता. स्वतःचे डोके लपवायची इच्छा, त्याच्या मनात उमटली. पहिल्यांदाच श्रोत्यांसमोर भाषण करणाऱ्या शिक्षकाप्रमाणे, सर्व वस्तू त्याच्याभोवती जणू फिरू

लागल्या. त्याला, त्यांचा काही अर्थबोध होईना. (या अवस्थेला मानसिक आंधळेपणा म्हणतात. ) त्याच्याभोवतीच्या वस्तूंचा थोडा सराव झाल्यावर, रियाबोवित्च थोडा भानावर आला. व्हॉन रॅबेक, त्याची बायको, दोन मध्यमवयीन महिला, लीलीसारखा ड्रेस घातलेली एक मुलगी, इतके सगळे अनोळखी लोक एकदम बघून, तो समाजाभिमुख नसलेला लाजाळू, गांगरून गेला. व्हॉन रॅबेकचा धाकटा मुलगा असलेला लाल मिशावाला एका तरुण, जणू आधी सराव केल्यासारखा, अत्यंत हुशारीने, सर्व ऑफिसर्स लोकांमध्ये मिसळून गेला व त्याने त्यांच्याबरोबर काही चर्चा सुरु करून, त्यांना बोलके केले. लीलीसारखा ड्रेस घातलेल्या मुलीने असा आभास निर्माण केला की शस्त्रविभागात काम करणे हे, आघाडीवर लढणाऱ्या सैनिकांपेक्षा खूप सोपे आहे. तर व्हॉन रॅबेक व एका वयस्क महिलेने बरोबर उलटे मत मांडले. उलटसुलट संवाद सुरु झाले.

लीलीसारखा ड्रेस घातलेल्या मुलीला त्या विषयातील काही कळत नसताना व त्यात काही रुची नसताना, चेहऱ्यावर कृत्रिम हास्य ठेवत, बोलताना रियाबोवित्चने पाहिले.

व्हॉन रॅबेकने व त्याच्या पत्नीने, ऑफिसर्सना हुशारीने चर्चेत ओढले. सर्वजण खातपीत आहेत, याकडे देखील त्यांचे जातीने लक्ष होते. रियाबोवित्च जितका पाहू लागला व ऐकू लागला, तितके त्याला, शिस्तशीर व फार गंभीर नसणारे ते कुटुंब, आवडू लागले.

चहानंतर ऑफिसर्स हॉलमध्ये गेले. लेफ्टनंट लोबिटकोला जे जाणवले होते ते खरेच होते. तिथे बऱ्याच मुली व तरुण महिला होत्या. एका काळा ड्रेस घातलेल्या छान मुलीशेजारी तो उभा राहिला. जणू काही तो एका अदृश्य तलवारीवर वाकतो

आहे अशा तऱ्हेने तो त्या मुलीकडे, स्वतःला हिरो समजत, वाकू लागला. तो हसला व त्याचे खांदे लालसेने हलवले. तो नक्कीच काहीतरी मजेदार अर्थहीन बोलत होता. कारण ती मुलगी त्याचा वाटोळया चेहऱ्याकडे अहंमन्यतेने बघत राहिली व बेफिकीरीने म्हणाली, “खर की काय?” अरुची दाखवत उच्चारलेल्या त्या शब्दांनी, लोबिटको समजून चुकला, की आपण तिचे फारसे मनोरंजन आपण करू शकलेलो नाही, कारण तो शहाणा होता.

कोणीतरी पियानोवर करूण वाल्ट्झ वाजवायला सुरवात केली. सताड उघड्या खिडक्यांमधून छान हवा वाहू लागली. प्रत्येकाला जाणवले की मे महिना चालू असून वातावरण उत्फुल्ल आहे आणि हवेत लिली व गुलाबाचा वास भरून राहिलेला आहे.

रियाबोवित्च संगीताबरोबरच ब्रँडीच्याही प्रभावाखाली होता. तो हसत, खिडकीशी वाकला. तो बायकांसारखे हातवारे करू लागला. त्याला असे जाणवू लागले की लिली व गुलाबाचा सुगंध बागेतून येत नसून, मुलींच्या चेहऱ्यांवरून व कपड्यांवरून येतो आहे.

व्हॉन रॅबेकच्या मुलाने, एका उंच व बारीक मुलीला नाचण्यासाठी बोलावले. त्यांनी खोलीत दोन तीन फेऱ्या घेतल्या. लिलीसारखा ड्रेस घातलेल्या मुलीकडे चकचकीत फरशीवरून, लोबिटको तरंगत गेला व तिला ओढत खोलीबाहेर नेले. नाच सुरु झाला -- रियाबोवित्च दाराजवळ न नाचणाऱ्या लोकांमध्ये उभा राहून, निरीक्षण करत होता. तो आयुष्यात कधी नाचला नव्हता किंवा एखाद्या सभ्य स्त्रीच्या कमरेभोवती, स्वतःच्या हातांचा वेढा घालायचे धाडस, दाखवले नव्हते. सगळया लोकांसमोर एखाद्या अनोळखी मुलीला कंबरेला धरुन, स्वतःचे खांदे तिला डोके टेकवण्यासाठी द्यायचे, हे रियाबोवित्चला खूष करणारे होते पण तो स्वतःला अशा

पुरुषाच्या जागी आपण असू, ही कल्पना करू शकत नव्हता. धाडस व कृतीप्रवण असणाऱ्या त्याच्या सहकाऱ्यांचा तो द्वेष करत होता. स्वतःचे गोल खांदे, लाजाळूपणा, रानटी मांजरासारख्या मिशा व साधेपणा या सर्वाबद्दल कमीपणा वाटण्याचा, त्याला वीट आला होता. पण वर्षानुवर्षे असे असल्यामुळे, ते सवयीचे होऊन गेले होते. नाचणाऱ्या जोड्यांकडे बघताना व त्याना एकमेकांशी ठामपणे बोलताना बघून त्याने, त्यांचा द्वेष करणे बंद केले. तो फक्त थोडासा उदास झाला.

जेव्हा चौकोनी नाच सुरु होणार होता, तेव्हा व्हॉन रॅबेक न नाचणाऱ्या लोकांकडे आला व त्यांना बिलीअर्डस खेळायला बोलावले. ऑफिसर्स त्याच्याबरोबर हॉलमधून बाहेर पडले. सर्वसामान्य गर्दीत मिसळण्याची व काहीतरी करण्याची इच्छा असल्याने, रियाबोवित्च त्यांच्या मागोमाग गेला. ते हॉलमधून, काचेच्या अरुंद पॅसेजमधून, दुसऱ्या खोलीत आले. तेथील कोचावर झोपलेले तिघे नोकर, हे लोक आलेले दिसताच, उडी मारून उभे राहिले. त्यांनी सर्वांना वाट दाखवत बिलीअर्डसच्या खोलीत नेले. खेळ सुरु झाला.

रियाबोवित्च पत्ते सोडून, कधीच काही खेळला नव्हता. टेबलाशी उभे राहून, तो खेळणाऱ्यांना तटस्थपणे बघत होता. तर ते कोटाची बटने काढून, काठी हातात घेऊन, विनोद करत व काही निरर्थक शब्द बोलत, चालत होते. खेळणाऱ्यांनी त्याच्याकडे काही लक्ष दिले नाही. फक्त कोणी गडबडीत त्याला, कोपराचा धक्का दिला व चुकून लागल्याचे सांगून, माफी मागितली, तेवढेच! पहिला खेळ संपताना, त्याला त्याचा कंटाळा आला. त्याची तिथे काही गरज नाही, व तो त्यांच्या मध्येमध्ये येतो आहे, असे वाटल्याने, तो बाहेर पडून परत, नाच चाललेल्या ठिकाणी जाण्यासाठी

परतताना, त्याच्या बाबतीत एक साहस घडले. अर्ध्या वाटेत गेल्यावर त्यच्या लक्षात आले, की तो चुकीच्या वाटेने चालला आहे. तीन झोपाळू नोकर असलेल्या खोलीतून तो गेला असल्याचे, त्याला आठवत होते. पण तो सहा खोल्यात फिरला, तरी त्याला ते नोकर दिसले नाहीत. चूक कळल्यामुळे, तो थोडे उलटे चालत गेला. आणि मग उजवीकडे वळून एका मंद उजेड असलेल्या खोलीत शिरला. पण आधी बिलीअर्डसच्या खोलीत जाताना, ही खोली लागली नव्हती. क्षणभर तो शांत उभा राहिला. त्याने निरखून पाहिल्यावर, त्याला दिसलेले पहिले दार त्याने एकदम उघडले. ती एक अंधारी खोली होती. दाराचा फटीतून त्याच्या समोर उजेड पडला आणि दारामागून, उदास स्वर ऐकू आले. नाचाच्या खोलीसारख्याच येथील खिडक्या उघड्या होत्या आणि लिली, गुलाबाचा परिमळ --

रियाबोवित्च गोंधळून थांबला. तेवढ्यात त्याला घाईघाईने टाकलेल्या पाऊलांचा आवाज आला. वस्त्रांची सळसळ झाली व त्यापाठोपाठ एक बाई भावनामयतेने कुजबुजली, “शेवटी!” दोन मऊ, सुगंधी, नक्की बाईचे असलेले हात, त्याच्या मानेभोवती पडले. त्याच्या गालावर एक गाल घासला गेला. आणि तेव्हाच चुंबनाचा आवाज आला. त्याच क्षणी ती बाई किंचाळली व दचकून रियाबोवित्चपासून दूर पळून गेल्याचे त्याला दिसले. तोही जवळजवळ ओरडला आणि दरवाज्याच्या फटीतील उजेडाच्या दिशेने धावला --

जेव्हा तो नाचाच्या खोलीत आला, तेव्हा त्यान्रे हृदय धडधडत होते व हात स्पष्टपणे दिसतील, एवढे थरथरत होते. त्याने पटकन ते स्वतःच्या पाठीमागे लपवले. पहिले काही क्षण तो लाजेने व भीतीने, मोडून गेला. त्याला असे वाटले की खोलीतील प्रत्येकाला हे कळले पाहिजे की, आत्ताच एका बाईने मिठी मारून त्याचे चुंबन घेतले.

त्याने सभोवताली एक उत्सुक कटाक्ष टाकला. पण त्याची खात्री झाली की सर्वजण पूर्वीसारखेच शांतपणे नाचत व गप्पा मारत आहेत. त्याने आयुष्यातील पहिल्यांदा असा आनंद घ्रेतलेल्या त्या अनुभूतीत मश्गुल होऊन रहाणे पसंत केले. त्याच्या बाबतीत काही विचित्र घडले होते -- नुकतेच दोन मऊ, तरुण हाताचा वेढा ज्यावर पडला ती मान, त्याला वाटले ती तेलाने चोळली गेली आहे. डाव्या कानाजवळील गालावर कुणी विचित्र, अनोळखी स्त्रीने त्याचे चुंबन घेतले आहे -- पेपरमिटच्या गोळीसारखी ती गार भावना! त्याने जितका तो भाग चोळला, तितका त्या भावनेचा जोर आपादमस्तक वाढत गेला. एक विचित्र जाणीव वाढत वाढत गेली. -- त्याला नाचायचे होते, बोलायचे होते, बागेत धावत जायचे होते, मोठ्याने हसायचे होते -- तो हे पूर्णपणे विसरून गेला की आपले डोके गोल गरगरीत आहे व आपण अगदी साधे आहोत. त्याचे दिसणे 'उठावदार नाही' ( त्याच्या ओळखीची एक बाई दुसऱ्या बाईबरोबर बोलताना, त्याने तिच्या नकळत हे ऐकले होते. ) जेव्हा व्हॉन रॅबेकची बायको, त्याच्या जवळून गेली, तेव्हा तो तोंड भरून छान हसू हसला. तिने थांबून त्याच्याकडे आश्चर्याने पाहिले.

त्याचा चष्मा नाकावर घट्ट बसवत तो म्हणाला, "मला तुमचे घर, खूपच आवडले."

जनरलची बायको हसून म्हणाली, की हे घर तिच्या वडिलांचे आहे. मग तिने त्याला विचारले की त्याचे आईवडील जिवंत आहेत का, तो किती वर्षे या नोकरीत आहे, तो इतका बारीक का आहे आणि असेच काही -- त्याच्याशी बोलून ती पुढे गेली. आणि मग तर रियाबोवित्च अजूनच तोंडभरून, छान हसू लागला. आणि त्याला वाटू लागले की त्याच्याभोवती असलेले लोक फारच दयाळू आहेत --

जेवणाच्या वेळी, रियाबोवित्चने त्याच्यासमोर जे जे वाढले गेले ते ते सर्व खाल्ले, प्यायले. नुकतेच त्याच्या बाबतीत, जे साहस घडून गेले होते, त्याला आव्हान देणारा असा एकही शब्द, त्याने ऐकला नाही. ते साहस, गूढ व अद्‌भुतरम्य होते, स्पष्ट करायला अवघड नव्हते. एका मुलीने, कदाचित विवाहित स्त्रीने, कुणा माणसाला, त्या अंधाऱ्या खोलीत भेटायला बोलावले होते आणि ती खूप वेळ थांबून त्याची वाट बघत असल्यामुळे, खिन्न मनस्थितीत, तिने चुकून रियाबोवित्चलाच तिचा हिरो मानले होते. विशेषतः रियाबोवित्च खोलीत शिरल्यावर, खात्री न वाटून थांबला, जसे काही त्याला पण, कुणाला तरी भेटायचे होते -- अशा तऱ्हेने रियाबोवित्चला चुंबन मिळाले.

भोवतालच्या बायकांच्या चेहऱ्याकडे बघत, त्याने विचार केला, “पण ती कोण होती? ती तरुण असणार कारण, वयस्क महिला काही असे, कुणा माणसाबरोबर भेटायचे ठरवणार नाहीत. आणि ती बुद्धिमान असली पाहिजे. तिच्या वस्त्रांच्या सळसळीतून बोलण्यातून व सुगंधावरुन, ते समजत होते --

त्याने जेव्हा आजूबाजूला नजर टाकली, तेव्हा लिलीसारखा ड्रेस घातलेली मुलगी, त्याला फार आकर्षक वाटली. तिचे हात व खांदे सुंदर होते. बुद्धिमान चेहरा व सुंदर आवाज. तिच्याकडे बघताना, रियाबोवित्चने ठरवले की हीच त्याची छान, अनोळखी -- पण ती कृत्रिम हसली व तिचे लांब नाक उडवले. त्यामुळे ती वयस्क दिसू लागली. मग त्याने त्याची दृष्टी काळया ड्रेसमधील मुलीकडे वळवली. ती जास्त तरुण व साधी होती. मोठ्या मोहक पद्धतीने, ती तिचे पेय पित होती.

रियाबोवित्चला आता ती, त्याची चुंबनसुंदरी वाटू लागली. पण लवकरच त्याला कळले, की ही फारच बारीक आहे. मग त्याने त्याचे लक्ष, तिच्या शेजारणीकडे वळवले. तो विचारपूर्वक पुटपुटला, “काही सांगता येत नाही. जर लिलीसारखा ड्रेस घातलेल्या मुलीचे खांदे व हात, उजळ मुलीची कानशिले व लोबिटकोच्या डावीकडील मुलीचे डोळे, असे एकत्र केले तर -- “

कल्पनेत त्याने त्याचे चुंबन घेतलेल्या मुलीचे चित्र, उभे केले. त्याच्या इच्छेप्रमाणे असलेली, पण आत्ता टेबलाशी नसलेली.

जेवणानंतर व पेयपानानंतर, यजमानांचे आभार मानून, समाधान पावून, सर्वजण निघाले. पुन्हा एकदा जनरल व त्याच्या बायकोने रात्री त्याना घरी ठेऊन घेणे शक्य नसल्याबद्दल, दिलगिरी व्यक्त केली.

यावेळी जनरल गंभीरपणे म्हणाला, “तुम्हा सर्वांना भेटून, फार मजा आली. ( येणाऱ्या पाहुण्यांपेक्षा जाणाऱ्या पाहुण्यांना जास्त मोकळेपणे वागणूक दिली जाते. ) पुन्हा तुम्ही इथून जाल, तेव्हा नक्की परत भेटू. सहज विचारतो, तुम्ही कुठल्या रस्त्याने जाणार? तुम्ही घोड्यावरून आलात का? नाहीतर मग बागेवरुन जा. तो जवळचा रस्ता आहे.”

ऑफिसर्स बागेत शिरले. उजेड व गजबजाटातून आल्यावर त्याना बाग एकदम अंधारी व शांत वाटली. ते गेटपर्यंत न बोलता, चालत गेले. ते अर्धवट प्यायलेले, आनंदी व समाधानी होते.

रियाबोवित्चच्या डोक्यात जे विचार होते, तेच त्यांच्याही डोक्यात होते. त्यांचेही घर कधीकाळी रॅबेकइतके मोठे असेल का? त्याच्यासारखे कुटुंब, बाग

त्यांच्याकडे असेल का? त्यांनाही अनौपचारीकपणे लोकांचा पाहुणचार करून, त्याना समाधानी करायची संधी मिळेल का?

गेटबाहेर आल्यावर ते सगळे, काही कारणाशिवाय हसू, बोलू लागले. आता ते नदीकडे जाणाऱ्या रस्त्याला लागले. झुडूपांमधून पाण्याच्या कडेने धाऊ लागले. नदीचा किनारा व रस्ता अगदी अंधुक दिसत होते. आणि पलीकडील तीर तर, पूर्ण अंधारात होता. काळोख्या पाण्यात, चांदण्यांची प्रतिबिंबे पडून, हलत होती. आणि त्यांच्या फक्त ह्लण्यावरून, नदी किती जोरात वहात आहे, ते कळत होते. वातावरण शांत होते. वारा पडलेला होता. झोपाळू सुतारपक्षी दुसऱ्या तीरावरून ओरडत होते. ऑफिसर्स लोकांकडे लक्ष न देता, बुलबुल झुडूपांमधून, गाण्यात दंग होते. ऑफिसर्सपैकी एकजणाने थांबून, ते झुडूप हलवले पण बुलबुल गातच राहिले.

त्याच्या आवाजाचे कौतुक करत, एकजण बोलला, “काय शूर पक्षी आहे. त्याच्याजवळ आपण उभे आहोत व तो लबाड आपली, काहीच दखल घेत नाही आहे.”

रस्त्याच्या शेवटी चढ सुरु झाला आणि चर्चपासून मग तो पुन्हा, रस्त्याला जाऊन मिळाला. चढावर ऑफिसर्स धापा टाकू लागले व बसून सिगरेट ओढू लागले. दुसऱ्या तीरावरून, मंद लाल दिवा चमकताना दिसू लागला. आणि काहीतरी करायचे म्हणून ते, असा तर्क करत बसले, की ती बहुधा कँपमध्ये पेटवलेली शेकोटी असावी. खिडकीतून येणारा उजेड की आणखी काहीतरी -- रियाबोवित्चदेखील त्याकडे निरखून बघत होता. त्याला असा भास झाला की तो त्याच्याकडे बघून, जणू त्याला चुंबनाबद्दल माहिती असल्यासारखा, हसतो आहे व उघडमिट केल्यासारखा चमचमतो आहे.

त्यांच्या रहायच्या जागी पोचल्यावर, रियाबोवित्चने लगेच कपडे बदलले व झोपला. त्याच खोलीत लोबिटको व लेफ्टनंट मर्सलीयाकोव्ह होते. मर्सलीयाकोव्ह शांत, अबोल व सुसंस्कृत माणूस होता. तो नेहमी ‘युरोपचा निरोप्या’ हे परीक्षणवजा मासिक वाचत असे व ते नेहमी सगळीकडे स्वतःजवळ बाळगत असे. लोबिटको कपडे बदलून खोलीमध्ये या टोकापासून त्या टोकापर्यंत अस्वस्थपणे चालत राहिला. मग त्याने नोकराला बिअर आणायची आज्ञा दिली. मर्सलीयाकोव्ह उशाशी मेणबत्ती ठेऊन, अंथरुणात शिरला व परीक्षणवजा मासिक वाचू लागला.

डागाळलेल्या छताकडे बघत, रियाबोवित्च विचार करत राहिला, “मला नवल वाटते की ती कोण असावी?”

त्याच्या मानेला अजून तेलाचा मसाज केला जात असल्याचा भास होत होता. अजून तोंडात पेपरमिट असल्यासारखी थंड अशी जाणीव त्याला होत होती. लिलीचा ड्रेस घातलेल्या मुलीच्या खांद्यांची, हातांची व उजळ मुलीचे गाल, कंबर, कपडे व दागिने -- याची कल्पना करण्यात, तो गुंग होता.. त्याने तीन प्रतिमांवर लक्ष एकवटण्याचा प्रयत्न केला. पण त्या त्याच्या डोळयापुढे नाचत व नाहीशा होत. जेव्हा डोळे मिटल्यावर त्या प्रतिमा पूर्णपणे नाहीशा होत, तेव्हा त्याला घाईघाईचा पदरव, कपड्यांची सळसळ व चुंबनाचा आवाज ऐकू येई. अतर्क्य अशा खोलवर आनंदाची भावना, त्याचा ताबा घेई. ही भावना एकदम नाहीशी होऊन, त्याला नोकराचा आवाज आला, की बिअर नाही आहे. लोबिटको रागावला व पुन्हा फेऱ्या मारू लागला.

रियाबोवित्चच्या व मर्सलीयाकोव्हच्या अंथरुणाजवळ उभा राहून, तो गुरगुरला, “तो मूर्ख आहे नाही का? बिअर आणू न शकणारा माणूस, मूर्ख व बिनडोक असला पाहिजे. नाही का? हलकट!”

“अर्थात तो इथे बिअर आणू शकणार नाही.” तो वाचत असलेल्या पुस्तकातून, डोके वर न काढता, मर्सलीयाकोव्हने शेरा मारला.

लोबिटकोने लावून धरत विचारले, “तुला असे का वाटते? तुझ्याशी मी पैज लावतो, की मी बिअर आणूनच दाखवतो व बाईही! आत्ता जातो -- जर मी दोन्ही घेऊन आलो नाही, तर तू मला वाट्टेल त्या नावाने हाक मार.” त्याने कपडे करायला व त्याचे भले मोठे बूट घालायला, खूप वेळ लावला. मग सिगरेट पेटवली. आणि काही न बोलता, बाहेर गेला.

पॅसेजमध्ये थांबून तो बोलला, “रॅबेक, ग्रॅबेक, लॅबेक! मला एकट्याला जावेसे वाटत नाही. जाऊदे. रियाबोवित्च, तू फेरी मारायला येतोस का?”

नाही असे उत्तर ऐकून, तो परत आला. दिरंगाई करत, कपडे बदलले व झोपायला गेला. मर्सलीयाकोव्हने एक सुस्कारा टाकला, पुस्तक बाजूला ठेवले व मेणबत्ती फुंकर मारून, विझवली.

अंधारात सिगरेट ओढत, लोबिटको काहीबाही पुटपुटत राहीला.

रियाबोवित्चने डोक्यावर पांघरूण ओढून घेतले. आणि वळून, त्याच्या डोक्यात चालू असलेली  तुटक तुटक कल्पनाचित्रे, जुळवायला सुरवात केली. पण

त्यातून, काहीच हाती लागेना. लवकरच तो झोपी गेला. तत्पूर्वी शेवटचा विचार असा होता, की कोणीतरी त्याला हळूवारपणे स्पर्श करुन, आनंदित केले आहे. जरी ती जाणवत नसली तरी, काहीतरी चांगली, हर्षोत्फुल्ल गोष्ट त्याच्या आयुष्यात आली होती. हा विचार, झोपेतदेखील त्याची पाठ सोडत नव्हता. तो उठला तेव्हा, मानेवर तेलाचा मसाज केल्याची व ओठांभोवती पेपरमिटचा गारवा पसरल्याची भावना, त्याला सोडून गेली होती. पण कालच्यासारखीच हृदय आनंदाने उचंबळत असल्याची जाणीव, मात्र होत होती. उगवत्या सूर्यामुळे, खिडकीच्या काचा सोनेरी दिसत होत्या त्यातून तो रस्त्यावरील आवाज ऐकत राहीला. त्याच्या खिडकीखाली मोठ्याने संभाषण चालू होते. नुकताच ब्रिगेडमध्ये आलेला त्याचा बॅटरी कमांडर लेबेडटस्की, एका सार्जंटबरोबर शिरा ताणून बोलत होता. तो नेहमी अशाच आवाजात बोलत असे.

“आणि अजून काय?” तो किंचाळला.

“साहेब, गोलुबुश्कला बूट घालताना लागले. सर्जनने त्यावर माती व व्हिनेगार लावले. आणि साहेब, काल रात्री, यंत्रकामगार आर्टीमेव, पिऊन आला होता. आणि लेफ्टनंटने त्याला बंदुकींच्या राखीव डब्यात ठेवायची आज्ञा दिली.”

नोकराने त्याला असेही सांगितले की, घर्षण ट्युबसाठीच्या दोऱ्या व तंबूसाठी कड्या आणायचे कार्पोव्ह विसरला आणि ऑफिसर्सनी संध्याकाळ जनरल व्हॉन रॅबेककडे काढली. संभाषणाच्या वेळी, लेबेडटस्कीची लाल दाढी खिडकीत दिसली. झोपाळू चेहऱ्यांच्या ऑफिसर्सकडे त्याने रोखून पाहिले व अभिवादन केले.

त्याने विचारले, “सर्व काही ठाकठीक आहे?”

लोबिटको जांभई देत म्हणाला, “घोड्याने त्याच्या मानेवरचे खोगीर उडवून लावले आहे.”

कमांडरने सुस्कारा सोडला, थोडा वेळ विचार केला व नंतर मोठ्याने बोलला, “मी अलेक्झांड्रा इव्ह्ग्रॅफोव्ह्नाकडे जायचा विचार करत होतो. मला तिला भेटले पाहिजे. अच्छा. मी संध्याकाळ पर्यंत तुम्हाला गाठतो.”

पाऊण तासात ब्रिगेड मार्गक्रमणा करू लागली. जेव्हा त्यांनी व्हॉन रॅबेकचे शेतघर ओलांडले, तेव्हा रियाबोवित्चने त्याकडे पाहिले. खिडक्यांचे पडदे बंद होते. आतली मंडळी नक्कीच झोपली होती. काल रियाबोवित्चचे चुंबन घेणारी मुलगी, पण झोपली होती. त्याने तिला झोपलेली, डोळयासमोर आणायचा प्रयत्न केला. तिच्या झोपायच्या खोलीची खिडकी सताड उघडी होती. हिरव्या फांद्या आत डोकावत होत्या. सकाळची प्रसन्न हवा, लिली व गुलाबाचा सुगंध, खुर्ची, त्यावर पडलेला तिने काल घातलेला ड्रेस, स्लीपर्स, टेबलावरचे घड्याळ -- या सर्व वस्तू त्याने स्पष्टपणे पाहिल्या. पण त्या मुलीचे नाकडोळे, गोड स्वप्नाळू हसणे, तो जे बघण्यासाठी, तरसला होता ती गोष्ट, त्याच्या हातातून पारा निसटावा तशी निसटली. अर्धा किलोमीटर पुढे जाऊन तो गोल वळला. पिवळे चर्च, नदी, घर व बाग प्रकाशात न्हात होते. हिरवेगार किनारे असलेली, आकाशाचे प्रतिबिंब पडलेली व सूर्यकिरणांचे चांदीचे तुकडे ल्यालेली नदी, सुंदर दिसत होती. रियाबोवित्चने परत एकदा गावाकडे पाहिले आणि उदास भावनेने त्याला घेरून टाकले, जसे काही त्याचे अगदी प्राणप्रिय असे काही, तो सोडून चालला आहे.

रस्त्यावर फारसे लागते नसलेली, ओळखीची दृष्ये, डोळयाना दिसत राहीली. उजवीकडे राईची व गव्हाची शेते होती, समोर व मागे, अर्धवट अंधार व माणसांच्या माना दिसत होत्या. पुढे चार सैनिक, गाडीचे रक्षणकर्ते म्हणून, बंदुका घेऊन चालले होते. मग बँडवाले होते. प्रेत घेऊन चालल्यासारखे ते मूक होते. वाटेत ठराविक वेळ थांबण्याऐवजी, ते कसेही विस्कळीतपणे मागे पुढे होत होते. चार बॅटरी रियाबोवित्वच्या पुढे चालल्या होत्या व तो पाचव्या बॅटरीबरोबर चालला होता.

सर्वसामान्य माणसासाठी कवायत करत जाणारी लांबलचक ब्रिगेड म्हणजे एक रुचीपूर्ण, वेगळाच अनुभव होता. एका बंदुकीसाठी एवढे लोक का लागतात किंवा त्या ओढण्यासाठी एवढे खोगीरबंद घोडे का लागतात, हे समजणे अवघड होते. पण या सर्वांशी चांगली ओळख असलेल्या  रियाबोवित्वसाठी हे रटाळ व कंटाळवाणे होते. प्रत्येक बॅटरीसमोर, ऑफिसरच्या कडेने दणकट सार्जंट मेजर का चालतो, व प्रमुखांचे व मोटारवाल्यांचे चालक त्यांच्या मागून का चालतात, ते खूप वर्षांपूर्वी रियाबोवित्व शिकला होता. रियाबोवित्वला माहिती होते, की जवळचे घोडे खोगीर घातलेले असतात व लांब असलेले घोडे नुसतेच असतात. त्याला ते फार वैताग आणणारे, वाटत होते. एका गाडीत एक सैनिक बसला होता. त्याची पाठ अजून कालच्या धुळीने भरलेली होती. एक बुजलेला बेढब शिपाई, पायी चालत होता. रियाबोवित्वला त्या शिपायाचा उपयोग माहिती होता. त्याला तो, अजिबात बेढब वाटला नाही. प्रत्येक घोडेस्वार सहजपणे, मधूनच ओरडत व चाबूक उडवत चालला होता. बंदुका बघायला काही सुंदर नव्हत्या. संरक्षण म्हणून ओट्सच्या पोत्यांवर, टार्पोलीनचे आच्छादन होते. किटल्यांभोवती, सैनिकांच्या पिशव्यांभोवती व पाकीटांभोवती बंदुका टांगलेल्या होत्या. हे सर्व एखाद्या त्रास न देणाऱ्या

जनावराभोवती, घोडे व माणसे असावी तसे दिसत होते. प्रत्येक बंदुकीच्या वाऱ्याच्या बाजूला, सहा बंदुकधारी सैनिक शस्त्रसज्जतेने झळकत, कवायत करत होते. मागून अजून काही प्रमुख, गाड्या व बंदुका येत होत्या. पुढील बाजूसारख्याच या कुरूप व कंटाळवाण्या होत्या. दुसरी मागून तिसरी, मग चौथी, व त्यावर ऑफिसर आणि असेच -- ब्रिगेडमध्ये सहा बॅटऱ्या होत्या. प्रत्येक बॅटरीत चार बंदुका होत्या. रस्त्यात ही मिरवणूक, अर्ध्या किलोमीटर लांबीची होती. शेवटी वाघीणींची गाडी होती. तिच्याजवळून खाली मान घातलेला, गाढवे पाळणारा चालला होता. कमांडरने त्याला, टर्कीमधून आणले होते.

रियाबोवित्चने पुढील मानांकडे व मागील चेहऱ्यांकडे विशेष लक्ष न देता, पाहीले. दुसऱ्या दिवशी त्याने डोळे मिटून डुलकी काढायचा प्रयत्न केला असता. पण आता त्याने त्याचे नवे, सुखकारक स्वप्नरंजन करायला सुरवात केली. जेव्हा ब्रिगेड पहिल्या दिवशी सुरु झाली, तेव्हा त्याने स्वतःला असे समजवायचा प्रयत्न केला, की चुंबनाची घटना ही केवळ एक मजेशीर, छोटेसे साहस होते आणि ते गंभीरपणे घेण्याचे, काही कारण नाही. पण थोड्याच वेळात त्याने ते तर्कट बाजूला टाकले व परत तीच स्वप्ने बघू लागला -- त्याने स्वतःला रॅबेकच्या हॉलमध्ये बघितले. आता डोळे मिटल्यावर, तो लीलीसारखा ड्रेस घातलेल्या मुलीशेजारी, काळा ड्रेस घातलेल्या उजळ मुलींशेजारी व धूसर, वर्णन करण्यास कठीण अशा अनोळखी मुलीशेजारी, उभा होता, स्वप्नात तो त्यांच्याशी बोलला, त्याना हळूवारपणे स्पर्श केला, जवळ घेतले. तो त्याना मागे ठेऊन लढाईवर चालला असल्याची व मग परतून त्याच्या बायको व मुलांबरोबर जेवण घेत असल्याची कल्पना त्याने केली.

प्रत्येक टेकडीवरून उतरताना, 'ब्रेक लागणार' अशी घोषणा केली जाई, तशी आत्ता झाली. तो पण ओरडला, 'ब्रेक लागणार'. त्याला प्रत्येक वेळी भीती वाटे, की त्याचे स्वप्नजाल तुटून, तो वास्तव जगात येईल.

त्यांनी गावातील एक मोठे घर ओलांडले. रियाबोवित्चने कुंपणावरून बागेकडे पाहिले. व्यवस्थितपणे आखल्यासारखा, छोटी बर्चची झुडुपे व पिवळे शोभिवंत दगड लावलेला सरळ, लांब रस्ता डोळयाना दिसला -- पिवळया रस्त्यावर, छोटी बायकी पाऊले पडत आहेत, असे स्वप्नभास त्याला होऊ लागले. आणि त्याचे चुंबन घेतलेल्या मुलीची अनपेक्षित प्रतिमा, त्याच्या मनात उमटली. काल जेवणाच्या वेळी तो, ते करू शकला नव्हता. ती प्रतिमा त्याच्या मेंदूत पक्की बसली व नंतर ती कधीच पुसली गेली नाही.

दुपारी मागील बाजूने मोठ्याने, एक आज्ञा देण्यात आली. "लक्ष द्या. ऑफिसर्स मंडळी, उजवीकडे बघा."

दोन शुभ्र घोड्यांच्या गाडीमध्ये, ब्रिगेड जनरल होता. तो दुसऱ्या बॅटरीशी थांबला. आणि काहीतरी बोलला, जे कोणालाच कळले नाही. रियाबोवित्चसकट बरेचसे ऑफिसर्स उभे राहीले. त्याचे लाल डोळे मिचकावत, जनरलने विचारले, "काय, कसे काय चालले आहे? कुणी आजारी आहे का?"

उत्तर ऐकून, जनरल क्षणभर विचारात पडला. मग एका ऑफिसर्कडे वळून म्हणाला, "तुमच्या तिसऱ्या बंदुकीच्या गाडीच्या चालकाने त्याचे पायसंरक्षक घातलेले नाही आणि मोठ्या डौलाने ते लोंबत ठेवले आहे. त्याला शिक्षा करा." त्याने डोळे वर करून रियाबोवित्चकडे बघितले व पुढे बोलला, "आणि तुझ्या घोड्याच्या

खोगीरावरील लगाम फार लांबलचक आहे." अजून काही दमवणूक करणाऱ्या शेरेबाजीनंतर जनरल, हसत लोबिटकोकडे वळला. "लेफ्टनंट लोबिटको, आज तू एवढा उदास का आहेस? सभ्य लोकांनो, लोबिटको लोपुकोव्हां बाईसाहेबांसाठी, उसासे सोडतो आहे."

लोपुकोव्हां बाईसाहेब म्हणजे एक साधारण चाळीशीची उंच, जाड बाई होती. जाड बायका म्हणजे  जनरलची थोडी कमजोरी होती. ऑफिसर्सपैकी कोणी त्याच्यासारखे आहे का, याची तो चाचपणी करत होता. ऑफिसर्स त्याला मान देत हसले. जनरल स्वतःच्या शेरेबाजीवर खूष होत, मोठ्याने हसला. मग त्याच्या गाडीच्या चालकाच्या पाठीला हात लावून त्याने, आपण निघू असे सुचवले. गाडी निघून गेली.

जनरलच्या गाडीने उडवलेल्या धुळीकडे बघत रियाबोवित्चने विचार केला, "जरी मला ते अशक्य कोटीतले, रानटी स्वप्न वाटत असले तरी, ती खरे तर अगदी सर्वसाधारण गोष्ट आहे. ती वेगळी असली तरी, ती प्रत्येकाच्या बाबतीत होते -- उदाहरणार्थ, जनरल घ्या. तो सुद्धा नक्की प्रेमात पडला असणार. आता तो विवाहित असून, त्याला मुले आहेत. कॅप्टन बॅचटर कुरूप असला तरी सुद्धा विवाहित असून, संशयातीतपणे, प्रेमात पडलेला होता. आणि साल्मानोव्ह जरा आडदांड असून रागीट आहे. तरीही त्याचे प्रेमप्रकरण होते व नंतर त्याचा शेवट लग्नात झाला. मी इतर माणसांसारखाच आहे. माझेही आज ना उद्या असेच होणार आहे -- "

तो सर्वसामन्य मनुष्य आहे व त्याचे आयुष्यही सामान्य आहे या विचाराने, तो आनंदी होऊन त्याला धीर आला. त्याने त्याच्या कल्पनाशक्तीला, मोकाट सोडले.

त्याला जसे व्हायला आवडले असते तसे त्याने, तिचे आणि त्याचे आनंदी भविष्य रंगवले.

जेव्हा ब्रिगेड गंतव्य स्थानाला पोचली व ऑफिसर्स तंबूत विसावले, तेव्हा रियाबोवित्च, लोबिटको  व मर्सलीयाकोव्ह् एका पेटीभोवती  जेवणासाठी बसले होते. मर्सलीयाकोव्ह् त्याच्या गुडघ्यावरील पुस्तक वाचत, सावकाश जेवत असे. लोबिटको फार बोलत असे व त्याच्या शेजारी बिअरने भरलेला पेला असे. रियाबोवित्च, सदैव डोक्यातील स्वप्नांच्या विचारात गुंग असे. तीन पेले पोटात रिचवल्यावर, तो थोडासा बेभान व कमजोर झाला. त्याला अशी अनावर इच्छा झाली, की आपल्या सहकाऱ्याना आपल्या नवभावनांबद्दल सांगावे.

त्याच्या आवाजाला बेफिकीर व चढेल सूर देण्याचा प्रयत्न करत, त्याने सुरवात केली, “रॅबेकच्या घरी, माझ्याबरोबर एक विनोदी घटना घडली. मी बिलीअर्डच्या खोलीत गेलो, तुम्हाला माहिती आहे -- त्याने चुंबनाचा किस्सा सांगितला. तो सांगायला एका मिनिटापेक्षा अधिक वेळ लागला नाही, हे बघून तो आश्चर्यचकित झाला. खोटारडा लोबिटको सोडून दुसऱ्या कुणीच रियाबोवित्चला हसताना पाहिले नाही. मर्सलीयाकोव्हने त्याच्या भुवया उंचावल्या, आणि पुस्तकातील डोके न काढता म्हणाला, “ही नक्कीच विचित्र गोष्ट आहे. एकही शब्द न बोलता, एखाद्या माणसाला गळामिठी घालणे! मला वाटते ती मुलगी, डोके सरकलेली असावी.”

रियाबोवित्चने कबूल केले.

लोबिटकोने सुरवात केली, “अशीच एक घटना, माझ्या बाबतीत घडली. गेल्या वर्षी मी रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाने, कोव्हनाला चाललो होतो. भयंकर गर्दी होती.

झोपणे शक्य नव्हते. मी तिकीट चेकरला अर्धा रुबल दिल्यावर, त्याने मला झोपायच्या डब्यात, जागा दिली. मी आडवा झालो व रग पांघरून घेतला -- खूप अंधार होता. अचानक माझ्या खांद्याला स्पर्श झाला. माझ्या चेहऱ्यावर मला श्वास जाणवले. मी माझा हात बाहेर काढला, तर मला हाताला, कोपर लागले -- मी डोळे उघडले आणि -- तुम्ही विश्वास ठेवणार नाही. तिथे एक बाई होती. काळे डोळे, लालचुटुक ओठ व  नाकपुड्या थरथरत असलेल्या!

मर्सलीयाकोव्हने विचारले, “तुला अंधारात, लालचुटुक ओठ कसे काय दिसले?”

लोबिटको त्याची थाप, सावरून घ्यायचा प्रयत्न करु लागला व मग मर्सलीयाकोव्हच्या मंद कल्पनाशक्तीला हसू लागला. रियाबोवित्च उदास झाला. तो पेटीपासून दूर गेला, आडवा झाला व परत कोणाशी याबाबतीत, काही बोलायचे नाही असे ठरवून टाकले.

कॅम्पमधील आयुष्य सुरु झाले. दिवसामागून दिवस, सगळे एकसारखे! रियाबोवित्च प्रेमात पडल्यासारखा विचार करत होता व वागत होता. रोज सकाळी जेव्हा नोकर, त्याचे आन्हीक आवरायचे सामान आणत असे, तेव्हा तो गार पाणी डोक्यावर घेई. काहीतरी मूल्यवान व गोड गोष्ट आपल्या आयुष्यात घडून गेली आहे, हे तो आठवे. कधीकधी त्याचे सहकारी प्रेम व बायकांबद्दल बोलू लागत, तेव्हा तो ते ऐकत बसे. एखाद्या सैनिकाने आघाडीवरील त्याच्या अनुभवाचे वर्णन करताना ऐकावे, तसा त्याचा चेहरा ते ऐकताना असे. संध्याकाळी जेव्हा लोबिटकोने सुचवल्यामुळे ऑफिसर्स, गावात जायला बाहेर पडले तेव्हा रियाबोवित्चने त्यांच्यात भाग घेतला, तरी तो अस्वस्थ होता. स्वतःला तो अगणित वेळा दोष देई. विचार

करताना, तो तिची क्षमा मागे -- रिकाम्या वेळी किंवा रात्री झोप येत नसेल तेव्हा, लहानपणीच्या आठवणी त्याच्या डोळ्यासमोर तरळत. आईवडील व सर्व प्रियजनांची आठवण येई, तेव्हा तो मेस्टेचकोचा, त्याच्या चौकस घोड्याचा न चुकता, विचार करे. रॅबेक, सम्राज्ञी युजेनीसारखी दिसणारी त्याची बायको, अंधारी खोली, दारातील उजेडाच्या फटी --

३१ ऑगस्टला तो कँपवरुन परतला. सगळ्या ब्रिगेडबरोबर नव्हे, तर फक्त दोन बॅटऱ्यांबरोबर. सर्व वाटभर तो त्याच्या घरी चालल्यासारखा, खूप उत्तेजित होता. विचित्र घोडा, चर्च, रॅबेकचे प्रेमळ कुटुंब, अंधारी खोली हे सर्व बघण्यासाठी तो व्याकूळ होई. प्रेमात पडलेल्याना नेहमी फसवणारा, तो आतला आवाज, त्याला सांगत राही, की तो ‘तिला’ भेटेल. मग तो गुंग होऊन, कल्पना करे की तो, कसे तिचे स्वागत करेल, कसा तिच्याशी बोलेल. ती चुंबनाविषयी विसरली असेल का? जर अगदी वाईट होऊन, तो तिला भेटलाच नाही, तरी तो अंधाऱ्या खोलीतून चालून येईलच व -- ची आठवण काढेल.

संध्याकाळपर्यंत क्षितिजावर, ओळखीचे चर्च व शेतघरे दिसू लागली. रियाबोवित्चचे हृदय धडधडू लागले. त्याच्याजवळील ऑफिसर काय बोलत होता, ते त्याला ऐकू येत नव्हते. तो सर्व काही विसरला. खूप व्याकूळ होऊन, मावळत्या सूर्यप्रकाशातील लांब अंतरावरील चमचमणारी नदी, घराचे छप्पर, घिरट्या मारणारी कबुतरे बघू लागला.

ते चर्चशी आले. मेट्रनचा अहवाल ऐकला. रियाबोवित्च घोडेस्वार येण्याची वाट बघत होता. तो येईल व जनरलकडे चहासाठी आमंत्रण देईल, असे त्याला वाटत

होते. मेट्रनचे बोलून संपले. ऑफिसर्स गावाकडे जायची घाई करू लागले. तरीही, घोडेस्वार आला नाही --

'रॅबेकला लवकरच शेतकऱ्यांकडून कळेल, की ते इथे आले आहेत. आणि मग तो निरोप पाठवेल. तंबूत शिरताना, रियाबोवित्चने विचार केला. त्याच्या सहकाऱ्यांनी मेणबत्त्या का लावल्या आहेत आणि स्वयंपाकी चहा व काही पदार्थ का बनवत आहेत, ते त्याला कळेना.

तो निराश होऊन, आडवा झाला. मग उठला. घोडेस्वार येतो आहे का, हे खिडकीतून बाहेर पाहिले. पण कोणी दिसले नाही. त्याची उत्कंठा दाबून ठेवणे त्याला अवघड झाल्याने, परत तो आडवा झाला. थोड्या वेळाने तो रस्त्यावर गेला व चर्चकडे जाऊ लागला. चर्चशेजारील भाग अंधारी व सुनसान होता. टेकडीच्या टोकावर, तीन सैनिक शांतपणे उभे होते. रियाबोवित्चला तिथे बघून, दचकून, त्यांनी सलाम केला. त्यानेही सलाम केला व पायाखालच्या असलेल्या वाटेने, टेकडी उतरू लागला.

नदीच्या दुसऱ्या तीरावर आकाश तेजस्वी जांभळे होते. चंद्र उगवला. जोरजोरात बोलत, दोन महिला, परसबागेत कोबीची पाने तोडत होत्या. त्यापलीकडे खूपशा झोपड्यांची काळी किनार दिसत होती -- या बाजूला मे सारखा -- रस्ता, झुडुपे, फक्त कोवळया गवताचा वास येत नव्हता  छोट्याशा, धीट बुलबुलचे गाणेही ऐकू येत नव्हते.

रियाबोवित्च बागेकडे गेला व तेथून गेटमधून आरपार पाहू लागला. आत अंधार व शांतता होती. रस्त्याचा काही भाग व जवळील बर्चच्या पांढऱ्या वृक्षांचे बुंधे दिसत होते. बाकी सर्वत्र अंधाराचे साम्राज्य होते. रियाबोवित्चने कान देऊन ऐकले.

अंधारात डोकावून पाहीले. पण अर्धा तास थांबून, निरीक्षण करून, काही आवाज न ऐकू आल्याने व काही उजेड न दिसल्याने, तो मागे वळला.

तो नदीशी थांबला. त्याच्यासमोर जनरलची अंघोळीची झोपडी होती आणि लहानशा पुलाच्या बारवर एक मोठे कापड लोंबत होते. तो पुलावर गेला व निष्कारण त्या कापडाला स्पर्श केला --

त्याने पाण्यात पाहिले -- त्या झोपडीजवळ नदीचे पाणी गुणगुण करत, जोरात वहात होते. मोठे, लालसर चंद्राचे प्रतिबिंब, पाण्यात पडले होते. त्याच्या बाजूने लहानशा लाटा वहात होत्या. त्यामुळे प्रतिबिंब लांबत होते, तुटत होते. जसे काही त्याना चंद्राला पळवून लावायचे होते --

रियाबोवित्च जोरात उसळणाऱ्या पाण्याकडे बघत उद्गारला, “किती अर्थहीन! फारच अर्थहीन! सगळेच किती अर्थहीन आहे!”

चुंबनाची गोष्ट, त्याची अधीरता, त्याची विफल आशा! आता अजून काही होणे अपेक्षित नसल्याने, त्याच्या फोल आशा व खोटे आभास, त्याच्यापुढे लखकन चमकून गेले. जनरलचा घोडेस्वार आला नाही व कोणाच्यातरीऐवजी त्याचे चुंबन घेतलेली मुलगी, त्याला कधीही भेटणार नाही, हे आता त्याला, काही विचित्र वाटेना. उलट ती भेटली, तरच त्याला नवल वाटले असते --

त्याच्याजवळून पाणी वहात होते, का व कशासाठी, हे कुणालाच माहिती नव्हते. मेमध्येदेखील ते वाहीले होते. लहानशा झऱ्याची मोठी नदी झाली होती. मग ती सागरात विलीन होणार होती. तेथून तिचे ढग होणार होते. मग त्यातून पाऊस

पडणार होता. आत्ता त्याच्याजवळून वाहणारे पाणी कदाचित, तेच ते, मे मधले होते का? कुठले होते?

रियाबोवित्चला सगळे जग, जीवनसुद्धा, अनाकलनीय निरर्थक विनोद, वाटू लागला. त्याने पाण्यावरून त्याची नजर उचलली व आकाशाकडे पाहीले. परत एकदा त्याला असे वाटले, की अनोळखी बाईच्या रुपात त्याचे नशीब त्याला अचानक प्रेमाचा स्पर्श करून गेले. त्याने त्याची स्वप्ने व उन्हाळ्यातील प्रतिमा आठवल्या. आणि त्याचे आयुष्य त्याला बेचव, रंगहीन व बिचारे वाटू लागले --

तो त्याच्या रहायच्या जागी आला, तेव्हा त्याच्या सहकाऱ्यांपैकी, कोणीच तिथे नव्हते. नोकरांनी त्याला सांगितले की, जनरल 'फॉनट्रॅबकिन'ने घोडेस्वाराबरोबर निरोप पाठवल्याने, सर्वजण त्याच्याकडे, गेले आहेत -- क्षणभर आनंदाची लहर त्याच्या हृदयात उसळली. पण त्याने ताबडतोब ती उधळून लावली. जसे काही त्याला इतके वाईट वागवणाऱ्या नशीबाचा, तो धिक्कार करत होता. तो जनरलकडे गेला नाही. तो झोपून गेला.

Schools and Schools

by O Henry

## अशीही शाळा



३५ पूर्व, पन्नास, सोफोर्थ रस्ता येथे, वयस्क जेरोम वॅरेन, एक लाख डॉलरच्या घरात रहायचा. तो गावातील दलाल असून इतका श्रीमंत होता, की तो रोज सकाळी त्याच्या आरोग्यासाठी, काही अंतर चालायचा व मग टॅक्सी करायचा.

त्याने त्याचा मित्र सिरील स्कॉट याचा गिल्बर्ट  नावाचा मुलगा, दत्तक घेतला होता. त्यांचे छान चालले होते. गिल्बर्ट ट्यूबमधून ज्या वेगाने रंग बाहेर काढू शके त्याच वेगाने, एक यशस्वी चित्रकार होऊ घातला होता. जेरोमची सावत्र पुतणी, बार्बारा रॉस पण घरातील सदस्य होती. मनुष्याचा जन्म त्रास घेण्यासाठीच असतो. जेरोमला स्वतःचे कुटुंब नसल्याने, त्याने या दोघाना सांभाळून, खरे तर दुसऱ्यांचे ओझे उचलले होते.

गिल्बर्ट व बार्बारा या दोघांचे एकमेकांशी चांगले जमत असे. हे अध्याहृत होते की ते दोघे एखाद्या चढत्या दुपारी, चर्चमधील फुलांच्या घंटेखाली उभे राहून, एकमेकांचे होतील व वयस्क जेरोमचा पैसा सांभाळायचे वचन, पाद्र्याला देतील. पण काहीतरी गोंधळ होता व या घडीला, गोंधळ कसला व काय ते सांगितले पाहिजे.

तीस वर्षांपूर्वी जेरोम जेव्हा तरुण होता, तेव्हा त्याचा डिक नावाचा भाऊ होता. तो पश्चिमेला त्याचे, की आणखी कुणाचे नशीब काढायला गेला. त्याच्या भावाकडून पत्र येईपर्यंत, वयस्क जेरोमने त्याच्याबद्दल काहीही ऐकले नव्हते. त्याच्या पत्रातून कळल्याप्रमाणे, तो काही अडचणीत सापडला होता. त्याच्या आयुष्याची तीस वर्षे, काही भविष्य न घडवता, त्याला एका मुलीचा पाश देऊन गेली. पत्रात म्हटल्याप्रमाणे त्या एकोणीस वर्षांच्या मुलीला, पैसे भरून तिकीट काढलेल्या जहाजाने पूर्वेला, जेरोमकडे पाठवण्यात आले. यापुढे तिची सर्व जबाबदारी, कपडेलत्ते, शिक्षण, भरणपोषण, सुखसुविधा हे सर्व जेरोमने बघावे, असे त्यात लिहिले होते. तिचे लग्न होईपर्यंत जेरोमने तिला सांभाळावे, अशी अपेक्षा त्यात व्यक्त केली होती.

वयस्क जेरोम हा समाजाचा आधार आहे. सगळ्याना माहिती आहे की जग ॲटलासने स्वतःच्या खांद्यांवर तोलून धरले आहे. आणि ॲटलास रेलच्या कुंपणावर उभा आहे. आणि रेलचे कुंपण कासवाच्या पाठीवर बांधले गेले आहे. आता कासवाला कशावर तरी उभे रहायला पाहिजे. आणि ते म्हणजे जेरोमसारख्या माणसांनी बांधलेला मजबूत रस्ता आहे.

माणसाला अमरत्व मिळेल का, हे मला माहिती नाही. पण तसे जर नसेल, तर मला जाणून घ्यायला आवडेल की, वयस्क जेरोमसारख्या माणसाना ते कधी मिळणार?

त्याना स्टेशनवर नेवाडा वॅरेन भेटली. ती एक दिसायला छान असलेली, लहानशी मुलगी होती. तिला सूर्याच्या उन्हाने भाजले होते. तिला उच्चभ्रू चालीरीती, माहिती नव्हत्या. तरी एखाद्या सिगरेट न ओढणाऱ्याने, दोनदा विचार न करता सुद्धा तिची दखल घेतली असती. तिच्याकडे बघून तुम्ही अशी अपेक्षा केली असेल, की ती

आखूड स्कर्टमध्ये किंवा चामडी घट्ट पँटमध्ये, चेंडूंचा खेळ खेळत असावी किंवा शिंगरु पाळत असावी. पण तिच्या सफेद पांढऱ्या व काळया ड्रेसमध्ये तुम्ही परत तर्क लढवू लागता. गणवेष घातलेले हमाल तिच्याकडून तिची जड बॅग घेऊ बघतात. पण ती ते ओझे सहज वागवते.

सूर्याच्या उन्हाने भाजलेल्या गालावर खाजवत, बार्बारा तिला म्हणाली, “माझी खात्री आहे, की आपण चांगल्या मैत्रिणी होऊ.”

नेवाडा म्हणाली, “मला अशी आशा आहे.”

वयस्क जेरोम म्हणाला, ‘प्रिय छोट्या पुतणे, जसे काही हे तुझ्या वडीलांचेच घर आहे, अशा तऱ्हेने तुझे माझ्या घरात स्वागत आहे.”

नेवाडा म्हणाली, “आभारी आहे.”

आणि गिल्बर्ट त्याचे मोहक हसू हसत म्हणाला, “मी तुला पुतणे, अशी हाक मारणार आहे.”

नेवाडा बार्बाराला स्पष्टीकरण देत बोलली, “कृपया, ही बॅग घे. तिचे वजन एक लाख पौंड आहे. डॅडच्या सहा जुन्या खाणींमधले नमुने, त्यात आहेत. माझ्या मनातील त्याच्या स्थानाप्रमाणे त्यांचे परीक्षण केले, तर ते हजार टनपर्यंतसुद्धा भरेल. पण ते मी घेऊन जाईन, असे वचन मी त्याना दिले होते.”

एक पुरुष व दोन स्त्रिया किंवा एक बाई आणि दोन पुरुष किंवा एक बाई, एक पुरुष व एक उमराव असलेला पुरुष किंवा कुठल्याही त्रिकोणात, काहीतरी भानगडी होणे, ही अगदी सर्वसामान्य बाब आहे. पण ते कधीही, नगण्य त्रिकोण नसतात. ते नेहमी, समद्विभुज त्रिकोण असतात, समभुज नव्हे. तेव्हा नेवाडा वॅरेन, बार्बारा रॉस आणि गिल्बर्ट हे एकत्र येऊन, एक ठाशीव त्रिकोण तयार झाला. आणि त्या त्रिकोणाची, बार्बारा कर्ण झाली. एक दिवस सकाळच्या न्याहारीनंतर, वयस्क जेरोम खूप वेळ शहरातील वर्तमानपत्र वाचत होता. गावात जाण्यासाठी, तो तयार झाला होता. त्याला नेवाडाचा चांगलाच लळा लागला होता. तिच्यात त्याला, त्याच्या मृत भावाचा मोकळा स्वभाव व शांत स्वतंत्रपणा दिसे.

मिस नेवाडा वॅरेनसाठी नोकरांणी एक चिठ्ठी घेऊन आली.

“निरोप आणणाऱ्या मुलाने, दारात ही मला दिली. तो उत्तरासाठी थांबला आहे.” ती म्हणाली.

नेवाडा एक स्पॅनिश धून वाजवत होती व रस्त्यावरील गाड्या बघत होती. तिने चिठ्ठी घेतली. पाकिटाच्या वरील डाव्या कोपऱ्यात रंग तयार करायचे सोनेरी पॅलेट बघून तिला उघडण्यापूर्वीच माहिती होते, की ती गिल्बर्टकडून आलेली आहे. तिने ती उघडली. उघडल्यावर, तिने त्या मजकुरावर मनापासून नजर फिरवली. नंतर गंभीर चेहरा करून ती, तिच्या काकांजवळ गेली.

“जेरोमकाका, गिल्बर्ट हा छान मुलगा आहे, नाही का?”

वर्तमानपत्र बाजूला सारत वयस्क जेरोम म्हणाला, ‘हो. तो गुणी मुलगा आहेच. मी स्वतः त्याला वाढवले आहे.”

“तो कुणाला काहीही, लिहिणार नाही. -- म्हणजे असे मी ठामपणे, म्हणू शकत नाही. पण म्हणजे प्रत्येकाला कळते आणि वाचता येते असे नाही, नाही का?”

“मला त्याने हे करताना बघायचे आहे. पण का? काय झाले?” वर्तमानपत्राचा तुकडा फाडत काका म्हणाले.

“काका, त्याने मला पाठवलेली, ही चिठ्ठी वाचा. आणि ती बरोबर आहे का, त्याचा विचार करा. असे बघा, मला शहरातील लोकांचा व त्यांच्या पद्धतींचा, फारसा अनुभव नाही.”

वयस्क जेरोमने वर्तमानपत्र बाजूला करत, त्यावर त्याचे दोन्ही पाय ठेवले व गिल्बर्टची चिठ्ठी घेऊन, रागाने दोनतीनदा वाचली.

तो म्हणाला, “काय ग मुली, तू तर मला या चिठ्ठीमुळे, उत्तेजित करून सोडले आहेस. तरी मला त्या मुलाबद्दल खात्री होती. तो त्याच्या वडीलांची प्रतिकृती आहे व अपराधीपणाचा गंड असणारा आहे. तो एवढेच विचारतो आहे, की तू व बार्बारा आज दुपारी चार वाजता, त्याच्याबरोबर मोटारीने मोठ्या बेटावर, फिरायला याल

का? मला याच्यात लिहायचे साहित्य सोडून, टीका करण्यासारखे काही दिसत नाही. तो त्या निळया रंगाने लिहितो आणि ती छटा, मला कधीच आवडत नाही."

नेवाडाने उत्सुकतेने विचारले, "असे जाणे, योग्य दिसेल का?

"हो. हो, बाळा. अर्थात. का नाही? तरीही तुला इतकी काळजी करणारी व मोकळेपणाने बोलणारी असल्याचे बघून, मी आनंदी झालो आहे. अगदी खुशाल जा."

नेवाडा आढेवेढे न घेता बोलली, "मला माहिती नव्हते. मला वाटले, मला तुम्हाला विचारले पाहिजे. काका, तुम्ही आमच्याबरोबर, येणार नाही का?"

"मी? नाही. नाही. मी एकदा तो मुलगा चालवत असलेल्या गाडीत, बसलो आहे. आता परत नाही. पण तू आणि बार्बारा नक्की जा. हो. हो. पण मी नाही."

नेवाडा दाराशी धावली व नोकराणीला म्हणाली, "आम्ही जाऊ, हे धरून चाल. मिस बार्बाराच्या वतीने मीच उत्तर देते. तू त्या मुलाला, मिस्टर वॅरेनला ते येणार का, असे विचारायला सांग. पण आम्ही नक्की जाणार."

वयस्क जेरोमने नेवाडाला हाक मारली, 'अग प्रिय मुली, त्याला चिठ्ठी पाठवलेली, बरी नाही का? एखादी ओळ लिहिलीस, तरी चालेल."

नेवाडा आनंदाने म्हणाली, "नाही. मी त्याची काळजी करत नाही. गिल्बर्टला समजेल -- तो नेहमीच समजून घेतो. मी माझ्या आयुष्यात, कधी स्वयंचलीत वाहनात बसले नाही. पण मी डेव्हील नदीतून, छोटीशी बोट वल्हवली आहे. हा मोटारीचा प्रकार, त्याहून जास्त रोमांचक असतो का, हे जाणून घ्यायला मला आवडेल."

त्यानंतर दोन महिने गेले असतील.

बार्बारा एक लाख डॉलर किमतीच्या घरात, बसली होती. ती तिच्यासाठी, चांगली जागा होती. जगामध्ये अशा पुष्कळ जागा आहेत, की जिथे स्त्रीपुरुषांना वेगवेगळया प्रकारच्या त्रासांपासून, स्वतःची सुटका करून घ्यायची संधी असते. तिथे प्रार्थनामंदीर, मोकळेपणे दुःख करायच्या जागा, पाणीदार जागा, वकिलाचे

कार्यालय, पश्चात्तापदग्धतेसाठीच्या जागा, आश्रम, विमाने, सौदर्यवर्धनाच्या जागा व अभ्यासिका हे सर्व काही असते. आणि यातील सर्वात चांगली जागा म्हणजे अभ्यासिका.

त्रिकोणाची सर्वात लांब बाजू म्हणजे कर्ण असतो, हे समजून घ्यायला कर्णाला वेळ लागतो, पण त्या कर्णाला वळणे नसतात, ती सरळ रेष असते.

बार्बारा एकटीच होती. जेरोमकाका व नेवाडा सिनेमाला गेले होते. बार्बाराने जायला नको म्हटले. तिला घरी बसून अभ्यासिकेत, अभ्यास करायचा होता. जर तुम्ही न्यूयॉर्कची आकर्षक मुलगी असाल आणि चॉकलेटी, निष्पाप, पाश्चिमात्य नखरे करत, आपल्या स्वतःला हव्या असलेल्या पुरुषासमोर मुरडताना स्वतःला बघत असाल तर, तुमचीही सिनेमातील रुची निघून गेली असती.

बार्बारा वाचनालयात ओकच्या टेबलाशी बसली होती. आणि तिच्या उजव्या हाताची बोटे, मलूलपणे एका बंद पत्रावरून फिरत होती. ते पत्र नेवाडाला लिहिलेले होते. पाकिटाच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात गिल्बर्टची पॅलेटची खूण होती. नेवाडा गेल्यावर नऊ वाजता, ते तिला मिळाले होते. त्या पत्रात काय होते हे कळण्यासाठी बार्बाराने, तिचा मोत्याचा कंठा दिला असता. पण तिला वाफेने, केसांच्या पिनेने किंवा पेनाच्या टोकाने, ते उघडता आले नसते व त्यामुळे वाचताही कसे येणार? समाजातील तिचे स्थान, तिला दुसऱ्याचे पत्र वाचण्यापासून रोकत होते. तिने उजेडात धरून व काही युक्तीने, त्यातील काही मजकूर वाचण्याचा प्रयत्न केला. पण स्टेशनरीच्या बाबतीत गिल्बर्ट फारच कसबी असल्याने, तो बेतही फसला.

साडेअकरा वाजता सिनेमा सुटला. ती थंडीतील छान रात्र होती. टॅक्सीपासून दारापर्यंत, वयस्क जेरोम रस्त्यातील गर्दीबद्दल व टॅक्सीचालकाच्या बेदरकारपणाबद्दल ओरडत होता. गुलाब पुष्पाप्रमाणे टवटवीत, निळया डोळयांची नेवाडा डोंगरातील वादळी रात्रीप्रमाणे, काकांच्या केबिनभोवती बागडत होती. या गारव्याच्या वातावरणात, बार्बारा स्वतःच्या जड हृदयाचे लाकूड, करवतीने कापत होती -- तिच्या मते तेवढीच गोष्ट करणे, तिच्यासाठी उरले होते. वयस्क जेरोमने वर जाऊन गरम पाणी व क्वीनाइन घेतले. हलक्याशा आनंदाने भरलेल्या अभ्यासिकेत

जाऊन नेवाडा, हाताच्या खुर्चीत विसावली. तिचे कोपरापर्यंतचे मोजे काढायचे न संपणारे काम करताना तिने, सिनेमाच्या अवगुणांवर एक तोंडी पुरावा सादर केला.

बार्बारा उद्गारली, “कधीकधी -- मिस्टर फिल्ड्स ( सिनेमातील नायक ) खरंच मजेशीर वागतो. प्रिय नेवाडा, तुझ्यासाठी हे पत्र आहे. तू गेल्यावर विशेष अशा मार्गे, ते तुझ्यासाठी आले आहे.”

बटणाशी झुंजताना नेवाडा ओरडली, “कोणाकडून आले आहे?”

बार्बारा हसून उत्तरली, “खरे तर, मी फक्त तर्क करू शकते. गिल्बर्ट ज्याला पॅलेट म्हणतो ते, पाकिटाच्या कोपऱ्यात दिसते आहे. पण ती लहानशी गोष्ट, मला तर एका शाळेत जाणाऱ्या मुलीसाठी दिलेली, सोनेरी हृदयाची प्रेमाची भेट आहे, असे वाटते.”

नेवाडा थकल्या आवाजात म्हणाली, “तो मला काय लिहितो आहे, याचे मला आश्चर्य वाटते.”

बार्बारा म्हणाली, “आपण सगळे सारखेच आहोत. सगळया स्त्रिया. पत्रावरचे तिकीट बघून आत काय असेल, याचा आपण तर्क करतो. शेवटचा उपाय म्हणून, आपण कात्री वापरतो. आणि मग ते अथपासून इतिपर्यंत वाचून काढतो. हे ते पत्र.”

तिने टेबलावरून, ते पत्र पुढे केले.

नेवाडा ओरडली, “काय त्रास आहे! ही काडतुसांसारखी बटणे, म्हणजे खरच, फार त्रास आहे. त्यापेक्षा मी मृगाजिन घालणे पसंत करेन. ओहो बार्बारा, कृपया ते पत्र फोडून वाच. हे हातमोजे काढण्यापूर्वी मध्यरात्र झालेली असेल.”

“अग प्रिय मुली, ते तुला आले आहे. ते तू, मला कशाला उघडायला सांगते आहेस? अर्थात, तूच ते उघड.”

नेवाडाने शांतपणे तिचे निळे, शांत व स्थिर डोळे तिच्या मोज्यांवरुन वर उचलले.

ती म्हणाली, “दुसऱ्याने वाचू नये, असे कोणी काहीही, मला लिहित नाही. कदाचित गिल्बर्टला आपण, उद्या परत त्याच्या गाडीने, कुठेतरी जायला हवे असेल.”

सहसा उत्सुकता दाबून ठेवणे, शक्य होत नाही. आणि बाईची भावना गुंतलेली उत्सुकता, तर इतरांसाठी धोकादायकच असते. मग त्यात हेवादावा डोकावू लागला, की मग तर विचारायलाच नको. बार्बाराने उदारपणे, थोडेसे कंटाळून, पत्र फोडले.

ती म्हणाली, “तू म्हणते आहेस, तर मग मी हे पत्र वाचते.”

तिने पाकीट फोडले आणि भरभर मजकूर वाचला. परत वाचला व हळूच एक गर्विष्ठ नजर नेवाडाकडे टाकली. ती तिच्या मोज्यांच्या कामात गर्क होती, जसे काही मोजे हेच तिचे जग आहे. त्या उगवत्या कलाकाराकडून आलेले पत्र, तिच्यासाठी जणू मंगळावरुन आल्याइतके, दूरस्थ होते.

अर्धे मिनिट बार्बाराने, नेवाडाकडे विचित्र शांतपणे पाहिले. मग ती ओठातल्या ओठात हसली. डोळे बारीक करून, तिच्या चेहऱ्यावर काहीतरी उत्तेजना देणारे भाव उमटले. “आता हिची गंमतच करते.” असे काहीसे ती मनाशी पुटपुटली.

सुरवातीपासून एक बाई, ही दुसऱ्या बाईला कधीच गूढ वाटत नाही. प्रकाशकिरण जसा सरळ रेषेत प्रवास करतो, तसे प्रत्येक बाई, दुसरीच्या मनात थेट प्रवेश करते. तिच्या बहिणीच्या लबाड, उबग आणणाऱ्या शब्दांनी, नेवाडा तिला आरपार तपासते. तिच्या लपलेल्या भावना वाचते आणि कंगव्यातून केस काढावेत, व ते मूलभूत संशयाच्या वाऱ्यावर उडून जायच्या आत, अंगठ्यात व चिमटीत पकडून धरावेत, तसे तिच्या टोकेरी बोलण्यातून हुशारीने, काहीही अर्थ काढते. अनेक वर्षांपूर्वी, संध्याकाळच्या सुपुत्राने, हातावर एका वेगळयाच बाईला घेऊन, कुटुंबाच्या स्वर्गाच्या नंदनवनातील दार वाजवले व तिची ओळख करून दिली. संध्याकाळने तिच्या स्नुषेला घरात घेऊन, एक खानदानी भुवई उंचावली.

हात पसरून पामच्या पानाशी चाळा करत नवरदेव बोलला, “माना झुकवून स्वागत करणाऱ्यांची भूमी! अर्थात तू तिथे आहेसच, असे मी धरून चालतो, नाही का?”

अजिबात न डगमगता संध्याकाळ म्हणाली, “अलीकडे तिथे मी नसते. ते तिथे जे सफरचंदाचे सॉस देतात, ते चांगले नसते, असे तुला वाटत नाही का? त्यापेक्षा मला मलबेरी पानांचा ढिसाळ परिणाम आवडतो. पण खऱ्या अंजीरांचा साठा तिथे

नसतोच. या लिलीच्या झुडूपामागून ये. तिथे कुणी सभ्य गृहस्थ, सॅलरीच्या पानांपासून, शक्तिवर्धक औषध तयार करतो आहे. मला वाटते अळयांच्या भोकांमुळे, तुझा ड्रेस मागून जास्त उघडा राहिला आहे.”

नोंदवल्याप्रमाणे, मग तिथे, कुणाच्या कोण अशा जगातील दोन महिलांमध्ये, सलोखा प्रस्थापित झाला. नंतर असे ठरले की त्या दोन महिलांनी कायम काचेप्रमाणे पारदर्शक रहावे व पुरुषांपासून स्वतःला गूढ, अनोळखी ठेवावे -- जरी अजून इतर महिलांना -- काचेचा शोध लागायचा होता.

बार्बारा यासाठी फारशी तयार दिसत नव्हती.

थोडे खजिल झाल्याचे दाखवत ती म्हणाली, “नेवाडा, खरे तर, तू मला ते पत्र उघडायचा आग्रह करायला नको होतास. मी -- माझी खात्री आहे, की हे आणखी

कुणाला कळायला नको.”

क्षणभर नेवाडा तिचे हातमोजे विसरून गेली.

ती म्हणाली, “मग ते मोठ्याने वाच. तू ते आधीच वाचले आहेस, त्यामुळे तुला काय फरक पडतो? जर मिस्टर वॅरेनने मला लिहिलेले पत्र, इतराना कळलेच पाहिजे असे असेल, तर मग ते सगळयाना कळू दे.”

बार्बारा म्हणाली, “ठीक आहे. यात असे लिहिले आहेः ‘प्रिय नेवाडा, तू आज रात्री बारा वाजता, माझ्या स्टुडीओमध्ये ये. नक्की ये.’ बार्बाराने उठून, नेवाडाच्या मांडीवर ते पत्र टाकले व म्हणाली, “मला हे माहिती झाले, त्याबद्दल मी फार दिलगीर आहे. असे गिल्बर्ट नक्कीच लिहिणार नाही. काहीतरी चूक आहे. प्रिय मुली, असे समज, मला काही माहिती नाही. आता मला वरच्या मजल्यावर जायला हवे. माझे डोके दुखते आहे. मला पत्रातले काही माहिती नाही, बरका. कदाचित गिल्बर्ट फार जेवत असेल व स्पष्टीकरण देईल. शुभ रात्री!” असे वरवर म्हणत, पण मनातल्या मनात “आता बघुया नेवाडाची फजिती.” असे म्हणत ती वर गेली.

नेवाडा पाय न वाजवता, हॉलमध्ये गेली. आणि वर बार्बाराचे दार लागल्याचा, आवाज तिने ऐकला. पत्रातील मजकूर बार्बाराने सांगीतल्याप्रमाणे नसेल, असा त्या

निरागस छोट्या, शाळकरी मुलीला संशय देखील आला नाही. अभ्यासिकेतील घड्याळाने, बारा वाजल्याचे सांगितले. ते पंधरा मिनिटे पुढे होते. ती हळूच धावत पुढील दाराकडे गेली. बर्फाच्या वादळात, बाहेर उभी राहिली. गिल्बर्ट वॅरेनचा स्टुडीओ, सहा चौक लांब होता.

पूर्वेकडील फुगलेल्या नदीपासून, आकाशातून पांढऱ्या शांत वादळाचा भीषण जोर, शहराला झोडपून काढत होता.. मोटार घरात आणायच्या रस्त्यावर एक फुटाचा बर्फाचा थर साठला होता. शहराबाहेरील भिंतींवर ढिगांनी बर्फ साचून त्याच्या शिड्या तयार झाल्या होत्या. पॉम्पेमधील रस्त्यांसारखा, रस्ता सुनसान होता. समुद्रावरून चंद्रप्रकाशात उडणाऱ्या पांढऱ्या पंखांच्या समुद्रपक्ष्यांसारख्या बर्फाळ मोटारी, सतत येजा करत होत्या. तर काही मोटारी तुलनात्मक दृष्ट्या पाणबुड्यांप्रमाणे फेसाळ लाटांमधून हिस् आवाज काढत, आनंदी पण धोकादायक प्रवास करत होत्या.

नेवाडा चालताना, वाऱ्यामुळे एखाद्या पक्ष्यासारखी भरकटत होती. ढगांनी वेढलेल्या रस्त्यांवर खड्या असलेल्या, इमारतींकडे तिने वर बघितले. रात्रीच्या दिव्यांनी व गोठलेल्या वाफेनी त्या कधी पुसट रंगहीन, तर कधी फिकट निळा, राखाडी, गडद निळा, अशा बदलत्या रंगांच्या दिसत होत्या. तिच्या पश्चिमेकडील घरासारख्या, हिवाळयातील डोंगरांसारख्या, दिसत होत्या. तिला असे समाधान एक लाख डॉलरच्या घरात राहून कधी मिळाले नव्हते.

एका कोपऱ्यावरच्या पोलिसाने, तिला डोळयांनी हटकले. “हॅलो मुली, तुला बाहेर हिंडायला फार उशीर झाला आहे, नाही का?”

त्याच्या जवळून घाईघाईने जात, नेवाडा उत्तरली, “मी औषधाच्या दुकानात जाते आहे.”

हे कारण म्हणजे जणू तिला जाण्यासाठी पासपोर्टच मिळाला. हे असे सिध्द करत होते का, की महिलांनी काहीच प्रगती केलेली नाही. बुद्धी व चातुर्य असलेल्या त्या, जणू ॲडमच्या फासळीपासून तयार झाल्या आहेत.

पूर्वेला वळल्यावर जोराच्या वाऱ्याने, तिचा चालायचा वेग अर्धा झाला. तिने बर्फातून वेड्यावाकड्या पद्धतीने मार्ग काढला. ती सूचीपर्णी झाडाच्या छोट्या रोपाइतकी, कणखर होती. ती डौलदारपणे वाऱ्याच्या दिशेने लवत होती. अचानक स्टुडीओ इमारतीने तिच्यापुढे एक ओळखीची खूण उभी केली. चांगले आठवणाऱ्या दरीवरील सुळका! व्यापाराने पछाडलेली जागा, नावडता शेजारी, तिथे काळोख आणि शांतता होती. लिफ्ट, दहाव्या मजल्यावर थांबली.

नेवाडा आठ जिने अंधारात चढली. मग ८९ नंबराच्या दारावर, ती धडकली

ती यापूर्वी अनेक वेळा इथे, बार्बारा व जेरोमकाकांबरोबर आलेली होती.

गिल्बर्टने दार उघडले. त्याच्या एका हातात रंगवायची पेन्सिल होती. डोळयांचा रंग हिरवट होता. तोंडात पाईप होता. आश्चर्याने त्याचा पाईप जमिनीवर पडला. नेवाडाने विचारले, “मला उशीर झाला का? मी जितक्या भरभर येता येईल, तेवढी आले. काका व मी संध्याकाळी सिनेमाला, गेलो होतो. गिल्बर्ट, मी आले आहे.”

गिल्बर्टने पिग्मॅलीयन गॅलटी नाटकातील प्रवेश केला. तो जणू अवाक् झालेल्या पुतळयापासून, एका तरुण मनुष्यापर्यंत बदलला. ही समस्या, हाताळायला गंभीर असल्याचे, त्याने नेवाडाकडे कबूल केले. काठीवाला झाडू घेतला. आणि तिच्या कपड्यावरचा बर्फ झाडू लागला. चित्रकार रंगवत असलेल्या लाकडी चौकटीवर, हिरवी शेड असलेला दिवा टांगलेला होता.

नेवाडा साधेपणे म्हणाली, “तुला मी यायला हवी होते आणि मी आले. तसे तू पत्रात, म्हणाला होतास. तू मला कशाला बोलावले आहेस?”

वारा चुकवत गिल्बर्ट म्हणाला, “तू माझे पत्र वाचलेस?”

“बार्बाराने ते माझ्यासाठी वाचले. नंतर मी ते पाहिले. त्यात लिहिले होते, ‘आज रात्री बारा वाजता माझ्या स्टुडीओमध्ये ये. नक्की ये.’ मला वाटले, तू आजारी आहेस. अर्थात तू तसा दिसत नाही आहेस.” गिल्बर्ट बेफिकीरीने बोलला, “ओहो नेवाडा, मी तुला का बोलावले, ते सांगतो. मला तुझ्याशी, ताबडतोब लग्न करायचे

आहे -- आज रात्री. काय छोटेसे बर्फाचे वादळ आहे. ( खरे पाहता पत्रातील मजकुराचा हा किती गोड वादळी पर्याय आहे. ) तू ते करशील का?"

नेवाडा बोलली, "हे मी खूप काळापूर्वीही केले असते, हे कदाचित तुझ्या लक्षात आले असेल. आणि मी स्वतः बर्फवादळाच्या कल्पनेवर खूष आहे. चर्चमधील फुलांनी वेढलेल्या लग्नाचा मला तिरस्कार आहे. गिल्बर्ट, तू अशाप्रकारे मला लग्नाबद्दल विचारण्याचे धैर्य दाखवशील, असे मला वाटले नव्हते. आपण सगळयाना धक्का देऊ. पण आपली नक्कीच तासडमपट्टी होईल, नाही का?"

गिल्बर्ट म्हणाला, "पैज लाव. मी हे उद्गार कुठे बर ऐकले आहेत? नेवाडा, एक मिनिट थांब. मला एक फोन करायचा आहे."

त्याने स्वतःला, एका लहानशा खोलीत बंदिस्त केले व त्याचे मन थुईथुई नाचत असताना, स्वर्गातील विजेच्या अद्भुतरम्यतेत वितळलेल्या लखलखाटात, -- फोन लावला.

"अरे जॅक, झोपाळू माणसा, जागा हो. मी बोलतो आहे. हो. -- आम्ही – जाऊ दे. व्याकरणाकडे जास्त लक्ष देऊ नकोस. मी आत्ता लग्न करतो आहे. हो. तुझ्या बहिणीला उठव. मला काही उत्तर देऊ नकोस. तिला पण, घेऊन ये. तुला, आलेच पाहिजे. त्या गोड मुलीला, आठवण कर की मी तिला, रॉकोनकोमा तळयातून वाचवले होते. हे तुला जरा असेतसे वाटेल, पण तिने तुझ्याबरोबर यायलाच हवे. हो. नेवाडा इथे आहे. थांबली आहे. आम्ही, हे केव्हाच ठरवले होते. तुला माहिती आहे की, नातेवाईकांपैकी कुणाकुणाचा विरोध असल्यामुळे, शेवटी आम्ही हे असे ठरवले. आम्ही इथे तुमची वाट बघत, थांबलो आहोत. अग्नेसला, तुझ्या बहिणीला, काही बोलू देऊ नको. तिला आण. आणशील ना? शहाणा तो बाळ! मी तुझ्यासाठी वेगवान गाडी बोलावतो. मी तुझी वाट बघतो, जॅक. मग ठीक आहे."

नेवाडा थांबलेल्या खोलीत, तो आला.

"माझा जुना मित्र जॅक पेटॉन व त्याची बहीण, इथे सव्वाबारा वाजता येत आहेत. पण जॅक इतका गोंधळलेला व संथ आहे. मी आत्ताच त्याना फोन करून, घाई

केली आहे. काही मिनिटात ते इथे येतील. नेवाडा, मी जगातील, सर्वात आनंदी माणूस आहे. मी तुला पाठवलेल्या पत्राचे, तू काय केलेस?”

तिच्या खिशातून पत्र काढत, नेवाडा बोलली, “ते इथे आहे.”

गिल्बर्टने ते पाकिटातून काढले आणि ते काळजीपूर्वक वाचले. मग विचारपूर्वक नेवाडाकडे बघत, तो बोलला, “तुला मी माझ्या स्टुडीओमध्ये रात्री बारा वाजता बोलावले, हे तुला विचित्र वाटले नाही का?”

तिचे डोळे फिरवत नेवाडा म्हणाली, “का? नाही. जर तुला माझी जरूर असेल, तर नाही. जेव्हा मित्र तुम्हाला घाईने बोलावतो -- आणि तसेच तर, तू बोलावले नव्हतेस का? मी विचार केला, प्रथम तिथे जावे व मग काय ते बोलावे. आणि हे सर्व घडले तेव्हा -- बर्फ पडत होता. पण तरी मी त्याची पर्वा केली नाही.”

गिल्बर्ट दुसऱ्या खोलीत घुसला व वारा, पाउस व बर्फापासून रक्षण करण्यासाठी दोन मोठे कोट घेऊन आला.

तिच्यासाठी तो कोट धरत तो म्हणाला, “हा घाल. आपल्याला पाऊण मैल जायचे आहे. जॅक व त्याची बहीण काही मिनिटात इथे येतील.” तो स्वतःदेखील कोट चढवू लागला. तो म्हणाला, “अग नेवाडा, टेबलावरील या संध्याकाळच्या वर्तमानपत्रातील ठळक बातम्यांवर, नजर टाक. टाकशील का? त्यात तुझ्या पश्चिमेकडील प्रदेशाबद्दल, काही छापून आले आहे व त्यात तुला नक्की रुची असेल.” तो एक मिनिट थांबला. कोट घालायला त्रास होत असल्याचे, ढोंग केले व वळला. ‘तिला जवळ घ्यावे का? – पण नको.’ नेवाडा हलली नाही. ती त्याच्याकडे विचारपूर्वक स्थिर नजरेने, विचित्रपणे बघत राहिली. बर्फ व वाऱ्यामुळे चढेल, त्यापेक्षा जास्त लाली, तिच्या गालांवर चढली. पण तिचे डोळे स्थिर होते.

ती बोलली, “मी तुला सांगणारच होते. तू विचारण्यापूर्वी -- आपण -- त्यापूर्वी -- सगळयाच्या पूर्वी. डॅडनी मला कधीच, एक दिवसही शाळेत घातले नाही. मी कधीच लिहायला, वाचायला शिकले नाही, हे आहे, हे असे आहे. आता जर –– “

त्यांनी झोपाळू जॅकचा व उपकृत अग्रेसचा अनिश्चित आश्चर्याने वर येतानाचा, पदरव ऐकला. जेव्हा समारंभानंतर, मिस्टर व मिसेस गिल्बर्ट बंदिस्त गाडीतून, हळूवारपणे घरी परतत होते तेव्हा, गिल्बर्ट म्हणाला, “नेवाडा, आज रात्री मी तुला जे पत्र पाठवले, त्यात मी काय लिहिले होते, ते तुला खरे जाणून घ्यायचे आहे का?”

“बोल ना.” त्याची नवरी म्हणाली.

गिल्बर्ट म्हणाला, “शब्दासाठी शब्द. ते असे होतेः माझ्या प्रिय वॅरेन -- तू खरे तर एक फूल आहेस. लिली नव्हे तर हायड्रँजिया.”

नेवाडा म्हणाली, “ठीक आहे. जाऊदे. तसेही तो विनोद बार्बारावर होता!”

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. वृषाली जोशी यांचे हे आठवे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (बारा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (४ पुस्तके) उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।